दैनिक

अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक २२७ । रविवार ३१ मे २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com




‘सहजयोग’

भाग ६७

## आत्मसाक्षात्कार हा घडला पाहीजे

आजपर्यंत आम्ही किती देवासाठी काय काय केलं ,केवढी मेहनत केली पारायण केली , त्याच्यासाठी देवाचं नाव घेतलं. इथपर्यंत झालंय आहे की ,आपली मुलं म्हणतात की तुमचा देव-बिव काही दिसत नाही ऊगीचच तुम्ही बेकार ह्याच्यात पडलेले आहेत . तेव्हा त्यांनाही उत्तर द्यायला पाहिजे , ही सर्व धडपड आपण का करतो .आणि हे जे मोठ-मोठे संतसाधु झाले ,ज्यांनी आपल्याला इतकं परमेश्वराबद्दल सांगितलं आहे ते काही खोटं बोलले का ?आज आपण त्यांची भजनं म्हणत बसतो ते काही खोट सांगत होते का ,की असं आहे . आपल्यामधे आत्मसाक्षात्कार हा घडला पाहीजे. जोपर्यंत आत्म साक्षात्कार घडत नाही तोपर्यंत सर्व थोतांड आहे. ही जी कुंडलिनी आहे ती तुमच्यामधे स्थित आहे . म्हणजे अगदी साध्या शब्दामध्ये सांगायचं जस एखादया बी मध्ये त्याच अंकुर असतं ,स्थित असतं सुप्त अवस्थेत ,तशी ही कुंडलिनी तुमच्यामधे आहेच . तिच्यासाठी काही करायला नको द्यायला नको त्याच्यासाठी पैशे नको ,उपास -तापास नको ,पारायणं नको , काही नाही , बाह्यातलं काही करायचं नाही फक्त ही कुंडलिनी जागृत करायची .आता दुसरं साध असं आहे की जर तुम्हाला एखाद्या रोपाला किंवा एखाद्या झाडाला जागृत करायचं असलं किंवा एखाद्या बीतून एखाद रोप काढायचं असलं तर काय करता तुम्ही त्या बी ला तुम्ही असं नुसतं असं जमिनीत घालता कि आपोआप सहजच ते घडतं .सहज म्हणजे तुमच्याबरोबर जन्मलेलं आहे . तुमच्याबरोबर जन्मलेली ही शक्ती आहे ही तुमच्याबरोबर तुमच्यात असलेली ही शक्ती आहे .त्याच्यासाठीच म्हणतात तुज आहे तुजपाशी . ही संपदा तुमच्याजवळ आहे हि सगळी गोष्ट तुमच्याजवळ असतांना तुम्ही स्वतःच हित का मागत नाही. जे तुम्हाला हितकारी आहे.असं तुम च्यात आहे . त्यासाठी पैशे द्यायला नको , काहीही मेहनत नको ,ती फक्त आधी जागृत करून घायची .

०६ जानेवारी १९८६,सांगली

अधिक माहितीसाठी www. sahajayogamumbai. org 8871519191

सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## मुरुम चोरांचा पाठलाग करताना दुचाकीला जेसीबीने चिरडले

**अहिल्यानगर:** तालुक्यातील धनगरवाडी परिसरातून बेकायदेशीरपणे मुरुम चोरी करून पळून जाणाऱ्या चोरांचा पाठलाग करणाऱ्या दोन तरुणांच्या दुचाकीला जेसीबी चालकाने जाणीवपूर्वक जोराची धडक दिली. या भीषण अपघातात प्रदीप चिंचने या तरुणाचा जागीच मृत्यूझाला तर फिर्यादी विजय दत्तु कजबे हे गंभीर जखमी झाले आहेत. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात राम म्हस्के आणि त्याच्या जेसीबी चालकाविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा अपघात आहे की घातपात याची परिसरात जोरदार चर्चा सुरू आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, धनगरवाडी गावच्या शिवारातील हनुमान मंदिराजवळील एका प्लॉटम धून काही लोक जेसीबीच्या सहाय्याने मुरुम चोरी करत असल्याची माहिती फिर्यादी विजय कजबे यांना मिळाली (पान ४ वर)

# अहिल्यानगर विधान परिषद रणसंग्राम रंगणार!

## ससाणे-तनपुरे-पानसरे यांच्या हालचालींमुळे निवडणुकीत चुरस

## स्थानिक स्वराज्य मतदारसंघात समीकरणांना वेग

करण नवले / राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** प्रारंभी बिनविरोध अथवा एकतर्फी होईल, अशी चर्चा असलेली अहिल्यानगर स्थानिक स्वराज्य संस्था म तदारसंघाची विधान परिषद निवडणूक आता अत्यंत रंगतदार आणि चुरशीची होण्याची चिन्हे स्पष्ट दिसू लागली आहेत. काँग्रेसचे नगराध्यक्ष करण ससाणे यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांचा भाजप प्रवेश आणि श्रीगोंद्याचे ज्येष्ठ नेते दत्तात्रय पानसरे यांनी सुरू केलेली जोरदार तयारी यामुळे निवडणुकीचे चित्र दिवसेंदिवस अधिकच रंजक बनत आहे.

महाविकास आघाडीतील जागावाटपात ही जागा काँग्रेसच्या वाट्याला आली आहे. त्याच पार्श्वभूमीवर श्रीरामपूरचे नगराध्यक्ष तथा काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष जयंत ससाणे यांचे सुपुत्र करण ससाणे यांनी उमेदवारी अर्ज दाखल करून राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आणले आहे. विशेष म्हणजे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या सूचनेनुसार अर्ज दाखल केल्याचे ससाणे यांनी स्पष्ट केले असले तरी काँग्रेसने अद्याप अधिकृत उमेदवारी जाहीर केलेली नाही.

दुसरीकडे महायुतीत ही जागा संख्याबळाच्या आधारे भाजपकडे जाणे जवळपास निश्चित झाले आहे. त्यातच राहुरीचे माजी आमदार तथा शरद पवार गटाचे नेते प्राजक्त तनपुरे यांनी भाजपमध्ये प्रवेश करून राजकीय समीकरणांम ध्ये मोठी खळबळ उडवली आहे. भाजपकडून त्यांची उमेदवारी जवळपास निश्चित मानली जात आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्वतः पुढाकार घेऊन तनपुरे यांना भाजपमध्ये आणल्याची चर्चा असून त्यामागे विधान परिषद निवडणुकीचे स्पष्ट राजकारण असल्याचे मानले जात आहे. मात्र या निर्णयामुळे भाजपमधील जुन्या निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचे सूर उम टू लागले आहेत. देवळाली प्रवराचे नगराध्यक्ष सत्यजित कदम यांच्यासह काही स्थानिक नेत्यांनी उमेदवारीसाठी हालचाली केल्या होत्या. विधान परिषदेचे सभापती (पान ४ वर)







### सोमवारी चित्र स्पष्ट होणार

उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम मुदत १ जून असल्याने पुढील दोन दिवसांत अनेक राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता आहे. काँग्रेसचा अंतिम उमेदवार कोण असेल, भाजप अधिकृतपणे तनपुरेंची घोषणा कधी करेल आणि दत्तात्रय पानसरे प्रत्यक्ष रिंगणात उतरतील का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. सोमवारी अर्ज भरण्याच्या अंतिम दिवशी हे चित्र स्पष्ट होईल.

### क्रॉस व्होटिंगचा धोका

**अहिल्यानगरच्या या मतदारसंघाचा इतिहास पाहिला तर पक्षीय गणितांपेक्षा वैयक्तिक संबंध, संपर्क, स्थानिक राजकारण आणि क्रॉस व्होटिंग यांचा प्रभाव अधिक राहिलेला आहे. याच मतदारसंघात यापूर्वी काँग्रेसचे जयंत ससाणे आणि राष्ट्रवादीचे अरुण जगताप यांच्यात झालेल्या लढतीत काँग्रेसची मते फुटल्याने अरुण जगताप विजयी झाले होते. त्यामुळे केवळ पक्षीय संख्याबळाच्या आधारावर निकालाचा अंदाज बांधणे धोकादायक मानले जाते.**

# प्राजक्त तनपुरे यांची राष्ट्रवादीला सोडचिट्ठी

## मुंबई येथे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते भाजपात प्रवेश




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाला सोडचिठ्ठी देऊन भाजपामध्ये प्रवेश केला आहे. राहुरी विधानसभेची पोटनिवडणूकीची घोषणा झाल्यापासूनच प्राजक्त तनपुरे यांनी भगवे उपरणे गळ्यात घेऊन आपण हिंदुत्ववादी असल्याचे दाखवून दिले होते.

त्यानंतर त्यांनी राहुरी विधानसभा पोटनिवडणूकीत भाजपाचे उमेदवार अक्षय कर्डिले यांच्यासाठी माघार घेतली होती.यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, म ाजी खासदार सुजय विखे पाटील, यांनी केलेल्या विनंतीला मान देऊन निवडणुकीतून माघार घेतली होती.व त्या वेळेपासूनच त्यांची भाजपाची जवळीक वाढत चालली होती.अखेर मतदार संघातील विकास कामासाठी आणि मतदारांच्या आग्रहाखातर त्यांनी हजारो कार्यकर्त्यांसह काल (पान ४ वर)


### मामासाठी धक्कादायक

प्राजक्त तनपुरेंचा भाजप प्रवेश झाल्याचं मी काही वेळापूर्वी ऐकलं, माझा आणि त्यांचा काही संपर्क झालेला नाही, त्यांनी भाजपमध्ये प्रवेश करणे आमच्यासाठी धक्कादायक आहे. प्राजक्त यांनी त्यांच्या मतदासंघातील परिस्थिती पाहून हा निर्णय घेतलाय, असं मला वाटतं, त्यांनी सुप्रिया सुळेंची भेट घेतली की नाही मला माहित नाही, मी त्यांना संपर्क केलेला नाही. – **जयंत पाटील**

## पुण्यात १९ जणांचा बळी घेणाऱ्या दारू कांडानंतर भिवंडीतून मिथेनॉलचा मोठा साठा जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील फुगेवाडी, दापोडी आणि हडपसर परिसरात अवघ्या ३० रुपयांत मिळणारी गावठी दारू प्यायल्याने तब्बल १९ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या मृत्यू तांडवामुळे संपूर्ण राज्य हादरले असून अनेकांची प्रकृती अजूनही गंभीर आहे. या दारूत 'मि थेनॉल' हे जीवघेणे विषारी रसायन मिसळल्याचे समोर येताच, अन्न व औषध प्रशासन (पान ४ वर)



### जनतेच्या आरोग्याशी खेळ खपवून घेणार नाही!

अन्न व औषधांच्या बाबतीत बेकायदेशीर कामकाज करणाऱ्या कोणत्याही संस्था वा व्यक्तीला प्रशासनाकडून कोणतीही सवलत दिली जाणार नाही. सुरक्षित अन्न आणि औषध हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे. औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० चे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात थेट न्यायालयीन कारवाई केली जाईल. – **तुकाराम मुंढे, आयुक्त (अन्न व औषध प्रशासन)**

## ब्राह्मणी हत्याकांड : आरोपीला पाच दिवसांची कोठडी

**राहुरी :** तालुक्यातील ब्राह्मणी येथे किरकोळ कारणावरून झालेल्या वादावादीत एक जणांचा मृत्यू झाला. यातील आरोपी सुशील साठे याला न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. फिर्यादी अलका सत्यवान साठे, (वय २२, रा.ब्राम्हणी), यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपी सुशील मधुकर साठे (वय ३३, रा.ब्राम्हणी) यास पोलीस पथकाने अटक केली. त्याला (पान ४ वर)

# एक महिन्यात मराठा आरक्षण कक्ष स्थापणार

## ■ मनोज जरांगे यांच्या मागण्यांबाबत सरकारचा मसुदा तयार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जालना :** मराठा आरक्षणाचे आंदोलन मनोज जरांगे पाटील यांचे तळपत्या उन्हातील आमरण उपोषण सुरू होताच सरकारने त्यांना मागण्या मान्य केल्या जात असल्याचा मसुदा पाठवला. मराठा आरक्षण कक्ष स्थापन करण्याची कार्यवाही पुढील १ महिन्यात केली जाईल. जात पडताळणी प्रमाणपत्र, सातारा गॅझेट ची अंमलबजावणी करतानाच मराठा आंदोलनात मृत्युमुखी पडलेल्या ३०६ पैकी २७५ आंदोलकांच्या वारसांना आधीच अर्थसहाय्य देण्यात आले आहे. उर्वरित ३१ वारसांना पुढील १५ दिवसांमध्ये अर्थसहाय्य दिले जाईल, यासह इतर मागण्या सरकार मान्य करत असल्याचा मसुदा तयार करण्यात आल्याचे मराठा आरक्षण उपसमि तीचे अध्यक्ष मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी शनिवारी सकाळी १० वाजल्यापासून अंतरवाली सराटी येथे पुन्हा एकदा आमरण उपोषण सुरू केले आहे. काल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजप नेते प्रसाद लाड यांनी दीड तास मनधरणी करूनही तोडगा न निघाल्याने जरांगे उपोषणावर ठाम राहिले. दरम्यान, जरांगे पाटील यांनी उपोषण सुरू करताच सरकारची मोठी धावपळ उडाली. त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी शासनाने एक विशेष अधिकृत मसुदा म्हणजेच ड्राफ्ट तयार केला आहे. सरकारच्या शिष्टमंडळाने हा मसुदा अंतर्वली सराटी येथे मनोज जरांगे यांच्याकडे सुपूर्द केला.

सरकारने तयार केलेल्या या ड्राफ्टमध्ये मनोज जरांगे यांच्या मागण्यांवर आश्वासने देण्यात आलेली आहेत. नोंदी शोधणे, प्रमाणपत्र वाटप आणि जात पडताळणीसाठी एक हेल्पलाइन ८ दिवसात सुरू करणार असल्याचे (पान ४ वर)



### १४ मागण्या आणि सरकारची १४ आश्वासने

**मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील स्वत: जरांगेंच्या आंदोलनस्थळी पोहोचले. त्यांनी जरांगे पाटील यांच्या १४ मागण्यांना अनुषंगाने १४ आश्वासनांचा मसुदा तयार केल्याचे सांगितले. जरांगे पाटील यांच्या बहुतेक मागण्या सरकार मान्य करत असल्याचे दिसते. मात्र काही म ागण्यासाठी सरकार वेळ मागत असल्याने जरांगे पाटलांकडून त्यांना सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही.**

# राळेगणसिद्धीला सैन्य दलाकडून ‘टी-५५’ रणगाडा भेट

## देशातील पहिले गाव : अण्णा हजारेंच्या देशसेवेचा गौरव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री


**पारनेर :** देशाला व राज्याला ग्रामविकास, जलसंधारणाचा आदर्श देणारे, समाज व राष्ट्रसेवेचा अखंड संदेश देणारे ज्येष्ठ समाजसेवक किसन बाबुराव हजारे ऊर्फ अण्णा हजारे यांच्या कार्याचा गौरव म्हणून भारतीय संरक्षण मंत्रालय आणि भारतीय सैन्यातर्फे राळेगण सिद्धीला ऐतिहासिक 'टी-५५' रणगाडा भेट दिला आहे.

या अभिमानास्पद सन्मानामुळे महाराष्ट्रात लष्करी गौरव प्राप्त करणारे राळेगण सिद्धी पहिले गाव ठरले आहे. 'टी-५५' हा रणगाडा केवळ युद्धसामग्री नसून, भारताच्या शौर्य, त्याग आणि राष्ट्रभक्तीचे महान प्रतीक आहे. भारतीय सैन्याच्या इतिहासातील अनेक निर्णायक मोहिमांचा तो साक्षीदार आहे. त्यामुळे राळेगणसिद्धीच्या शिरपेचात नव्याने एक मानाचा तुरा रोवला आहे.

हा ऐतिहासिक रणगाडा राळेगणसिद्धीपर्यंत आणण्यासाठी गेल्या एक वर्षापासून सातत्याने प्रयत्न सुरू होते. यात जिल्हा व सत्र न्यायालयाचे नोडल अधिकारी चंद्रकांत शिंदे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्यासह लेफ्टनंट जनरल आर. आर. निंबोरकर (निवृत्त) व दादा पठारे यांनी संरक्षण मंत्रालय, सैन्य प्रशासन (पान ४ वर)







# लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी:

**सुशासनाचा, धर्मकार्याचा आणि स्त्री-सामर्थ्याचा अजरामर प्रकाश**

३१ मे... भारतवर्षाच्या इतिहासातील एक सुवर्णक्षण! आज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती. अठराव्या शतकातील राजकीय अस्थिरता, युद्धांचे सावट आणि सामाजिक रूढी-परंपरांच्या जंजाळातून मार्ग काढत, एका सामान्य कुटुंबातील कन्येने 'लोकमाता' म्हणून घेतलेली उत्तुंग भरारी आजही थक्क करणारी आहे. अहिल्यादेवींचे व्यक्तिमत्त्व केवळ एका कालखंडापुरते मर्यादित नव्हते, तर ते आदर्श राजकारण, लोककल्याणकारी धर्मकार्य आणि पराक्रमी स्त्री-शक्तीचे जिवंत प्रतीक होते. आजच्या गढूळ राजकीय आणि सामाजिक वातावरणात अहिल्यादेवींच्या जीवनप्रवासाचा वेध घेणे आणि त्यांच्या कर्तृत्वातून बोध घेणे, ही काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे.

**अहिल्यादेवींचा प्रजाहितदक्ष राजकार्याचा पायंडा**

आजच्या काळात 'राजकारण' म्हणजे अनेकदा सत्ताकारण, खुर्ची मिळवणे आणि स्वतःचे हित साधणे असे संकुचित समीकरण बनले आहे. अशा वेळी अहिल्यादेवींचे राजकार्य आजच्या राज्यकर्त्यांच्या डोळ्यात अंजन घालणारे ठरते. पती खंडेराव, सासरे सुभेदार मल्हारराव होळकर आणि तरुण पुत्र मालेराव यांच्या अकाली निधनानंतर, संपूर्ण होळकर साम्राज्याची धुरा अहिल्यादेवींवर आली. त्या काळात एका विधवेने सत्ता हाती घेऊन ती यशस्वीपणे चालवणे हे क्रांतीपेक्षा कमी नव्हते.

अहिल्यादेवींनी सत्तेला कधीही उपभोगाचे साधन मानले नाही, तर ते 'प्रजेचे कर्ज' मानून राज्य केले. त्यांच्या राजकारणाचा पाया केवळ तीन सूत्रांवर उभा होता: समान न्यायव्यवस्था हे त्यांच्या न्यायदानाचे वैशिष्ट्य. त्यांच्या दरबारात गरिबातील गरीब माणसालाही थेट न्याय मिळत असे. गुन्हेगार कितीही मोठा असला, तरी कायद्यापुढे तो समानच होता. न्यायाचा हा निवाडा त्यांनी कधीही रक्ताच्या नात्यात अडकू दिला नाही.

आर्थिक समृद्धी आणि शेती विकास याला त्यांनी विशेष प्राधान्य दिले. त्यांनी शेतकऱ्यांना कर सवलती दिल्या, पडीक जमिनी लागवडीखाली आणल्या. व्यापारी आणि कारागिरांना राजाश्रय देऊन व्यापार वाढवला. इंदूरसारख्या एका छोट्या गावाला त्यांनी समृद्ध व्यापारी केंद्र बनवले. गुन्हेगारांना केवळ शिक्षा देण्याऐवजी त्यांनी दरोडेखोरांचे हृदयपरिवर्तन केले. केवळ बळाचा वापर न करता, त्यांनी भिल्ल आणि गोंड जमातीतील दरोडेखोरांचे हृदयपरिवर्तन केले, त्यांना जमिनी दिल्या आणि महामार्गांच्या सुरक्षेची जबाबदारी सोपवून त्यांना मुख्य प्रवाहात आणले. ''प्रजेचे सुख हेच राजाचे सुख आणि प्रजेचे दुःख हेच राजाचे दुःख.'' या एकाच ध्येयाने चालणारे अहिल्यादेवींचे राजकार्य म्हणजेच खऱ्या अर्थाने 'सुशासन' होते.

**धर्मकार्य म्हणजे कर्मकांड नव्हे, तर 'राष्ट्रउभारणी'**

अहिल्यादेवी होळकर यांचे नाव घेताच डोळ्यांसमोर उभी राहतात त्यांनी भारतभर बांधलेली मंदिरे, घाट, धर्मशाळा आणि विहिरी. परंतु, त्यांचे धर्मकार्य हे निव्वळ कर्मकांड किंवा धार्मिक कट्टरता नव्हते, तर ते एकात्मतेचे आणि राष्ट्र उभारणीचे कार्य होते.

अहिल्यादेवींचे धर्मकार्य सर्व समावेशक होते. त्यांनी केवळ हिंदू मंदिरांचा जीर्णोद्धार केला नाही, तर मशीद आणि दर्ग्यांनाही सढळ हाताने देणग्या दिल्या. राष्ट्रीय एकात्मतेला त्यांनी सर्वोच्च प्राधान्य दिले. पूर्वेला जगन्नाथ पुरी, पश्चिमेला द्वारका, उत्तरेला बद्रीनाथ-केदारनाथ आणि दक्षिणेला रामेश्वरमपर्यंत त्यांनी घाट, पानपोया आणि धर्मशाळा बांधल्या. यामुळे संपूर्ण भारत सांस्कृतिकदृष्ट्या जोडला गेला. पायाभूत सुविधांचा विकास कसा साधावा याचे उत्तम उदाहरण त्यांनी सबंध जगापुढे ठेवले. त्यांचे धर्मकार्य प्रवाशांच्या सोयीसाठी होते. रस्ते बांधणे, सावलीसाठी झाडे लावणे, विहिरी खणणे यातून त्यांनी धार्मिक पर्यटनाला चालना दिली, ज्यामुळे व्यापार वाढला. आज जेव्हा धर्माच्या नावावर भिंती उभ्या केल्या जात आहेत, तेव्हा अहिल्यादेवींचा धर्म हा माणसाला माणसाशी जोडणारा, भुकेलेल्याला अन्न आणि तहानलेल्याला पाणी देणारा 'मानवधर्म' होता, हे विसरून चालणार नाही.

**अहिल्यादेवींचे व्यक्तिमत्त्व: एक दीपस्तंभ**

आज आपण २१ व्या शतकात जगत आहोत, स्त्री-पुरुष समानतेच्या मोठ्या गप्पा मारत आहोत; तरीही दररोज




महिलांवरील अत्याचाराच्या आणि कौटुंबिक हिंसेच्या बातम्यांनी वृत्तपत्रे भरलेली असतात. अशा पार्श्वभूमीवर, अठराव्या शतकात जिथे सती जाण्याची जाचक प्रथा होती, तिथे अहिल्यादेवींनी घेतलेले सामाजिक निर्णय आजच्या समाजाला दिशा देणारे आहेत. त्यांनी केवळ स्वतः सती जाण्यास नकार दिला नाही, तर पुढे जाऊन आपल्या मुलीचा (मुक्ताबाई) विवाह आंतरजातीय आणि हुंडा न घेता एका पराक्रमी तरुणाशी लावून दिला. स्त्रियांना संपत्तीचा अधिकार मिळवून दिला. महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी त्यांनी विणकाम आणि वस्त्रोद्योगाला (विशेषतः महेश्वरी साड्या) प्रोत्साहन दिले. आजची आधुनिक स्त्री जेव्हा कॉर्पोरेट जगतात किंवा राजकारणात स्वतःचे स्थान निर्माण करू पाहत आहे, तेव्हा तिला अहिल्यादेवींच्या संघर्षातून आणि धैर्यातून मोठी प्रेरणा मिळते. त्या केवळ राजवाड्यात बसून हुकूम सोडत नव्हत्या, तर गरज पडल्यास हातात तलवार घेऊन युद्धाच्या मैदानात उतरायलाही त्या मागे-पुढे पाहत नव्हत्या. हेच खऱ्या 'महिला शक्ती'चे रूप आहे.

**राज्यकर्त्यांनी बोध घ्यावा**

आजच्या राजकीय नेतृत्वाने आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. अहिल्यादेवींच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वातून आजच्या नेत्यांनी त्यांच्याकडून पारदर्शकता व प्रामाणिकतेचा बोध घ्यावा. होळकर राज्याचा खजिना हा प्रजेचा आहे, स्वतःच्या चैनीसाठी नाही, यावर अहिल्यादेवी ठाम होत्या. आज सरकारी निधीचा होणारा गैरवापर पाहता, अहिल्यादेवींची ही वृत्ती नेत्यांनी अंगीकारणे गरजेचे आहे. सत्तेचा अहंकार विरहित वापर करणे म्हणजे खरे राजकारण. अहिल्यादेवींकडे अफाट सत्ता होती, पण त्या नेहमी नम्र राहिल्या. स्वतःला 'श्रीमंत' न म्हणवता त्यांनी नेहमी 'शिवार्पण' करून कारभार केला. विरोधकांना किंवा गुन्हेगारांना केवळ शिक्षा न देता, त्यांचे पुनर्वसन कसे करता येईल, हा त्यांचा दृष्टिकोन आजच्या राजकीय सूडबुद्धीच्या काळात अत्यंत महत्त्वाचा आहे.

**महिला शक्तीचा उत्तुंग आविष्कार**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या केवळ एका राज्याची राणी नव्हत्या, तर त्या भारताच्या इतिहासातील एक अद्वितीय, कर्तृत्ववान आणि दूरदृष्टी असलेल्या 'प्रशासक' होत्या. कर्तृत्वाला लिंगभेद नसतो, हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले. आज महिला शक्तीचा गौरव करताना, अहिल्यादेवींचे स्मरण करणे म्हणजे केवळ त्यांच्या प्रतिमेचे पूजन करणे नव्हे, तर त्यांनी दाखवलेल्या 'प्रजाहितदक्ष' आणि 'न्यायी' मार्गावर चालणे होय. ३१ मेच्या या पवित्र दिनी, लोकमाता अहिल्यादेवींच्या स्मृतीस कोटी कोटी प्रणाम! त्यांच्या विचारांचा वारसा प्रामाणिकपणे पुढे नेणे, हेच त्यांना खरे अभिवादन ठरेल.

# मुख्यमंत्र्यांकडे अंध बांधवांच्या मागण्यांचा पाठपुरावा करु : डॉ. पिपाडा यांनी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**शिर्डी** :अंध लोकांमध्ये असलेले कलागुणांना प्रोत्साहन देवुन त्यांना सामाजिक प्रवाहात आणणे गरजेचे आहे असे मनोगत भाजपा नेते डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी बोलताना व्यक्त केले. दि बुद्धिस्ट असोसिएशन फॉर द ब्लाइंड, नाशिक यांच्या वतीने दहावी व बारावीच्या परीक्षेमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या दिव्यांग विद्यार्थी व विद्यार्थिनींचा प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यात आला. समाजातील अंध गुणवंत विद्यार्थी- विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत त्यांच्या आत्मविश्वासाला बळ देणारा हा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी व आदर्श ठरला. या कार्यक्रमास उपस्थित दि बुद्धिस्ट असोसिएशन फॉर द ब्लाइंड अध्यक्ष सतिषराव निकम,चिंतामण अहिर, राजाराम गायकवाड, संजय घोडेराव, रनजित बोठे,रामनाथ सदाफळ,पत्रकार अनिल सोमवंशी,नवनाथ सदाफळ यांच्यासह अनेक मान्यवर, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या विशेष कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून भाजप नेते डॉ. राजेंद्र पिपाडा उपस्थित होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, दिव्यांग विद्यार्थी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षणाच्या माध्यमातून यश संपादन करीत आहेत, ही बाब संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे. समाजाने अशा विद्यार्थ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून त्यांना शिक्षण, रोजगार व स्वावलंबनाच्या संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. डॉ. पिपाडा यांनी पुढे सांगितले की, अशा प्रकारचे उपक्रम केवळ सत्कारापुरते मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या मनामध्ये नवचैतन्य निर्माण करणारे आहेत. शिक्षणाच्या जोरावर दिव्यांग विद्यार्थी समाजामध्ये स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करू शकतात, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कै. आर.आर. पाटील यांच्या समवेत अंध बांधवांचे शिष्टमंडळाची चर्चा घडवली होती. यापुढे मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे सुद्धा अंध बांधवांच्या मागण्यांचा पाठपुरावा करु असे भाजपा नेते डॉ.राजेंद्र पिपाडा यांनी बोलताना सांगितले.

कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. संघटनेचे अध्यक्ष सतीशराव निकम यांनी संस्थेच्या विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था सातत्याने कार्यरत असल्याचे त्यांनी नमूद केले.

श्री.दिलीप रोहम यांना या कार्यक्रमा करिता निशुल्क कार्यालय उपलब्ध करुन दिले त्याबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी अध्यक्ष सतिषराव निकम,चिंतामण अहिर, राजाराम गायकवाड, संजय घोडेराव यांच्यासह अनेक मान्यवर, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात गौरव करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त करत संस्थेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

समाजामध्ये सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी अशा प्रेरणादायी उपक्रमांची आवश्यकता असून, दि बुद्धिस्ट असोसिएशन फॉर द ब्लाइंडचा हा उपक्रम अनेकांसाठी दिशादर्शक ठरत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# महाराष्ट्र राज्य युवा शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाच्या बारामती तालुकाध्यक्षपदी अमित गावडे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बारामती**- महाराष्ट्र राज्य युवा शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघ संचलित बारामती तालुका शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाची कार्यकारणी नुकतीच जाहीर झाली. यामध्ये श्री.अमित गावडे तालुकाध्यक्षपदी तर सोमनाथ कोठावळे यांची तर तालुका सचिवपदी यांची निवड सर्वानुमते निवड करण्यात आली. प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील शारीरिक शिक्षण या विषयाच्या प्रगतीसाठी व शारीरिक शिक्षण शिक्षक यांचे विविध प्रश्न सोडवणूकीसाठी या महासंघाच्या माध्यमातून राज्यभर कार्यकारिणीची निवडीची प्रक्रिया सुरू आहे. या मोहिमेचा भाग म्हणून तालुका निवड सभा नुकतीच पार पडली. सदर निवड प्रक्रिया पुणे जिल्ह्याचे अध्यक्ष मार्गदर्शक सचिन नाळे, पुणे जिल्हा सचिव रणजीत देवकर ,जिल्हा मार्गदर्शक सेवा जेष्ठ क्रीडा शिक्षिका साधना खोमणे व सेवा जेष्ठ क्रीडाशिक्षक धनंजय यादव, महासंघाचे संस्थापक संदीप मनोरे, राज्य सचिव प्रा. तायाप्पा शेंडगे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली पार पडली. बारामती तालुका अध्यक्ष अमित गावडे ,उपाध्यक्ष पदी अभिजीत चव्हाण, मंदार कळसकर व ज्योती उदावंत ,कार्याध्यक्ष पदी , मयूर जराड सचिव सोमनाथ कोठावळे सहसचिव , विशाल हंडबर, अमोल नाळे , किरण पवार खजिनदार, मोहन कचरे सहखजिनदारपदी , ऋषिकेश लोणकर ,संगीता कोल्हे तालुका संघटक, शुभम पवार , दत्ता चव्हाण, जयदिप शिर्के , प्रशांत शेंडगे , अनुराग देशमुख , योगेश भोसले , स्वाती भापकर, कामिनी भोसले , रेखा धनगर यांची निवड झाली आहे. तसेच बारामती तालुका सदस्य हर्षद झिटे , मनोज मदने , आप्पा देवकाते , शुभम इंगवले,कु अंकिता धुमाळ , पुनम नाळे यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य युवा शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघ, पुणे संचलित महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यांच्या व तालुक्यांच्या कार्यकारणींची निवड प्रक्रिया चालू आहे.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी रस्त्यावर उतरु : ॲड. अजित काळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगांव** : शेतकरी संघटनेचा पक्ष नेतृत्व हा विषय नसुन शेतकऱ्यांचे प्रश्नावर कुठल्याही राजकीय पक्षाचे पुढाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर रस्त्यावर लढा दिला तर आम्ही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहु असा आत्मविश्वास शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अँड अजित काळे यांनी श्रीरामपूर नेवासा वैजापूर ग्रामीण भागातून आलेल्या कार्यकर्त्यांसमोर बोलताना व्यक्त केला.

भोकर खोकरफाटा येथील अँड अजित काळे यांच्या शेतावरील निवासस्थानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यानी अँड अजित काळे यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन केले होते. या सोहळ्यास श्रीरामपूर नेवासा वैजापूर तालुक्यातील हजारो कार्यकर्त्यांनी उपस्थितीती लावली.यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना अँड अजित काळे अकारी पडीत लढ्याची पार्श्वभूमी सांगताना म्हणाले की भोकर शिवारात महावितरण सबस्टेशन जवळ ही शेती डेव्हलप करताना माजी सभापती दिपक पटारे, उच्च न्यायालयातील याचिकाकर्ते गिरीधर आसने आम्ही तालुक्यातील विविध विषयांवर चर्चा करत बसत असे. या चर्चेत गिरीधर आसने यांनीअकारी पडीत जमिनीचा संघर्षाची कैफियत माझ्यासमोर मांडली.दुसऱ्या दिवशी त्यांनी कागदपत्रांची फाईल माझ्यासमोर ठेवली. या कागदपत्रांच्या पडताळणी नंतर मी अकारी पडीत शेतकऱ्यांचा लढा एक रूपयाचा मोबदला न घेता उच्च न्यायालयात लढण्याचा निर्णय घेतला. त्यावेळचे महसूल मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मदतीने उच्च न्यायालयात हा लढा जिंकलो.मंत्रिमडळ समितीनेही कॅबिनेट मध्ये मंजुरी दिली आहे. प्रशासकीय पातळीवर अडचणी येत असल्या तरी अकारी पडीत शेतकऱ्यांना जमिनी मिळणार याची शाश्वती मी आपणास देत आहे.

कुठल्याही राजकीय नेत्यांसोबत वैयक्तिक मतभेद नाहीत.शेतकऱ्यांचे प्रश्नावर त्यांच्याकडून अडवणूक झाली तर त्यांच्या विरोधात उभे राहण्याची हिंमत आहे . कांदा प्रश्नावर आम्ही वैजापूर श्रीरामपूर बाजार समितीच्या आवारात आंदोलन केले. आता पाच रूपयांचे आत कांदा लिलाव बोली सुरू होत नाही. कांदा लिलाव बोली व्यापाऱ्यांनी नव्हे तर बाजार समितीच्या माणसाने सुरू करण्याचा आग्रह धरला.

या कांदा प्रश्नावर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले.आम्ही त्यांच्या भूमीकेचे स्वागत करतो. कुठल्याही राजकीय पक्षाचे पुढाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर रस्त्यावर उतरून आंदोलन केले. तर नेतृत्व कोण करतो हे न पाहता आम्ही खंबीरपणे पाठीशी उभे राहू असे शेवटी अँड अजित काळे म्हणाले.

या प्रसंगी जिल्हाध्यक्ष अनिल औताडे तालुका अध्यक्ष युवराज जगताप, महिला आघाडी प्रथम नाऊर शाखेच्या अध्यक्षा सौ.प्रतिभा विनोद शिंदे, प्रीती प्रतिक पटारे,सौ.भावना अजित काळे,विठ्ठलराव शेळके,कार्लस साठे, राजेंद्र कोकणे, बबनराव मुठे,सागर मुठे, राधाकृष्ण आहेर,मनोज दुधेडिया, कुलकर्णी, हरिभाऊ तुवर, बंडोपंत चौगुले,साहेबराव चोरमल, नामदेव आदिक, विठ्ठलराव आसने, दिलीप गलांडेयांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास डॉ नितीन आसने, सुरेश आसने,भरत आसने, बाळासाहेब आसने, गोविंद वाघ,कचरू आदिक,अँड सर्जेराव घोडे,प्रकाश ताके, सोपानराव नाईक, बबनराव नाईक,प्रा. रंगनाथ कोळसे , रघुनाथ मुठे, गोकुळ मुठे, संपतराव मुठे, संतोष मुठे, शिवाजी रूपटक्के, प्रशांत शिंदे , धनंजय पवार,शरद पवार, एकनाथ जाधव, अशोक काळे,अँड रत्नाकर रन्नवरे गजानन कोकणे, बंडू बोडखे,प्रा, विजय बोर्डे, अनिल बोडखे,रावसाहेब मुरकुटे, रवींद्र मुरकुटे,भाऊसाहेब गोर्डे, दत्तात्रय शेळके, बापुसाहेब गोरे, संजय वमने, शिवाजी रूपटक्के, मधुकर बनसोडे, बापुसाहेब शिंदे,बंडू पटारे, रमेश धुमाळ, मधुकर गायकवाड, सुजित बोडखे, डॉ नवले, अरविंद साळवे, दादासाहेब तोडमल ,सुभाष भराडे, बाबासाहेब वेताळ,गोरख वेताळ, जितेंद्र चांदगुडे, गंगाधर वेताळ, दत्तात्रय वेताळ, रोहीत वेताळ,बाळासाहेब वेताळ, आदी उपस्थित होते. सचिन वेताळ यांनी सुत्रसंचलन केले तर शरद आसने यांनी आभार मानले.

# श्रीरामपूर सायकलिंग क्लबतर्फे ७ जून रोजी भव्य महा सायकल रॅली

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)** : जागतिक सायकल दिनाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि फिटनेसचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी श्रीरामपूर सायकलिंग क्लबच्या वतीने शनिवार, दि. ७ जून रोजी भव्य महा सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही माहिती क्लबच्या संयोजन समितीने दिली.सायकलिंगची आवड असलेल्या नागरिकांनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. रॅलीसाठी केवळ ३०० सहभागींची नोंदणी स्वीकारली जाणार असून, प्रथम नोंदणी करणाऱ्यांना प्राधान्य दिले जाणार आहे.रॅलीत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांसाठी आकर्षक मेडल, टी-शर्ट, नाश्ता, हायड्रेशन सुविधा तसेच अन्य विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये सायकलिंगबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. विशेष म्हणजे १० वर्षांखालील मुलांसाठी ५ किलोमीटर अंतराची स्वतंत्र रॅली आयोजित करण्यात आली आहे. तर इतर सर्व सहभागींसाठी २५ किलोमीटर अंतराची रॅली ठेवण्यात आली आहे. ही रॅली श्रीरामपूर येथील आझाद मैदानातून सकाळी प्रारंभ होऊन पढेगावपर्यंत जाईल व पुन्हा आझाद मैदानात येऊन समाप्त होईल. श्रीरामपूर ते पढेगाव हे अंतर सुमारे १२.५ किलोमीटर असून ये-जा मिळून एकूण २५ किलोमीटरचे अंतर पूर्ण करण्यात येणार आहे.

रॅलीसाठी पूर्वनोंदणी आवश्यक असून अधिक माहितीसाठी तसेच नोंदणीसाठी पंढरपूर सायकल वारी व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा डॉ. वैशाली बधे (मो. ९०९६७३५१९०) तसेच टेक्निकल इंजिनिअर हर्षद महाजन (मो. ९८६०८३८६१२) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ागरिकांनी आपल्या कुटुंबीयांसह व पाल्यांसह या उपक्रमात सहभागी होऊन सायकलिंगचा आनंद घ्यावा तसेच आरोग्यदायी आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश समाजात पोहोचवावा, असे आवाहन श्रीरामपूर सायकलिंग क्लबच्या वतीने करण्यात आले आहे.

# रेल्वे वसाहतीत बेवारस मृतदेह आढळला; आकस्मात मृत्यूची नोंद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : येथील रेल्वे वसाहत परिसरात शनिवारी एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली. या प्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, रेल्वे वसाहतीत एक बेवारस व्यक्ती पडून असल्याची माहिती रेल्वे कर्मचाऱ्यांनी पोलिसांना दिली. त्यानंतर श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल लक्ष्मण सांगळे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने संबंधित व्यक्तीला उपचारासाठी साखर कामगार रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले.मृत व्यक्ती अंदाजे ५० वर्षे वयोगटातील असून त्याची उंची सुमारे ५ फूट ५ इंच आहे. त्याचा बांधा मध्यम, वर्ण सावळा असून काळी वाढलेली दाढी व मिशी आहे. अंगात पिवळ्या रंगाचा शर्ट आणि पांढऱ्या रंगाची पॅन्ट परिधान केलेली होती. उजव्या हाताच्या मनगटावर लाल रंगाचा धागा बांधलेला असून कंबरेला लाल करगोटा तसेच पोटावर तीळ असल्याचे पोलिसांनी सांगितले.या प्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यू रजिस्टर क्रमांक ७२/२०२६ अन्वये नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल लक्ष्मण सांगळे करीत आहेत.दरम्यान, संबंधित अनोळखी व्यक्तीबाबत कोणाला काही माहिती असल्यास श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# डॉ. हसमुख जैन यांना २०२६ चा 'ब्रेकथ्रू रिसर्च इव्हॉन' पुरस्कार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : मुंबईतील टाटा मेमोरियल सेंटर अंतर्गत कार्यरत असलेल्या कॅन्सरतज्ज्ञ डॉ. हसमुख जैन यांना कर्करोग उपचार क्षेत्रातील उल्लेखनीय संशोधन व नवकल्पनांसाठी २०२६ चा प्रतिष्ठेचा 'ब्रेकथ्रू रिसर्च इव्हॉन' पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. अमेरिकेतील शिकागो येथे आयोजित विशेष सोहळ्यात हा सन्मान त्यांना देण्यात आला.

कर्करोगावरील उपचार अधिक प्रभावी, सुरक्षित आणि सर्वसामान्य रुग्णांना परवडणारे बनविण्यासाठी केलेल्या संशोधनामुळे डॉ. जैन यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला. रक्तविकारांशी संबंधित कर्करोग, सेल थेरपी, क्लिनिकल संशोधन, वैद्यकीय प्रशिक्षण आणि परवडणाऱ्या उपचारपद्धती विकसित करण्याच्या क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची दखल घेत हा गौरव करण्यात आला.

डॉ. जैन यांनी वैद्यकीय शिक्षणानंतर २०१३ मध्ये टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये सहाय्यक प्राध्यापक म्हणून काम सुरू केले. त्यानंतर त्यांनी रक्तविकारांवरील कर्करोग उपचार क्षेत्रात विशेष संशोधन करत प्राध्यापक पदापर्यंत मजल मारली. त्यांच्या कारकीर्दीतील सर्वात मोठी उपलब्धी म्हणजे भारतातील पहिल्या स्वदेशी उअठ-ढ सेल थेरपीच्या विकासाचे नेतृत्व. 'नेक्सकार-१९' (छशुउअठ१९) ही उपचारपद्धती पुनरावृत्ती होणाऱ्या किंवा उपचारांना प्रतिसाद न देणाऱ्या बी-सेल कर्करोग रुग्णांसाठी विकसित करण्यात आली.




खपवळरप खपीीळीींश ेष ढशलहपेश्रेसू इेलरू आणि अमेरिकेच्या नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या प्रकल्पाला अल्पावधीत नियामक मान्यता मिळाली. या यशानंतर त्यांनी इउचअ उअठ-ढ या नव्या उपचारपद्धतीच्या संशोधनाचेही नेतृत्व स्वीकारले असून प्राथमिक चाचण्यांमध्ये सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत.

ग्रामीण आणि दुर्लक्षित भागांमध्ये कर्करोग उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठीही डॉ. जैन यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक ठिकाणी ऑन्कोलॉजी विभाग, प्रतिबंधात्मक कर्करोग कार्यक्रम, ट्यूमर बोर्ड आणि बोन मॅरो प्रत्यारोपण सुविधा सुरू करण्यात आल्या. तसेच वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी आणि डॉक्टरांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम विकसित करून नव्या पिढीतील कर्करोगतज्ज्ञ घडविण्याचे काम त्यांनी केले आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन नियतकालिकांमध्ये त्यांच्या ८५ हून अधिक संशोधन लेखांचे प्रकाशन झाले असून ते विविध राष्ट्रीय संशोधन प्रकल्पांचे प्रमुख संशोधक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखालीटाटा मेमोरियल सेंटरमध्ये भारतातील सर्वात मोठा सेल थेरपी कार्यक्रम उभारण्यात आला असून २०० हून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार करण्यात आले आहेत.डॉ. हसमुख जैन यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल माजी मंत्री बाळासाहेब थोरात, आ. सत्यजित तांबे, माजी आ. सुधीर तांबे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे. त्यांच्या या कार्यामुळे भारतातील कर्करोग उपचार आणि संशोधन क्षेत्राला नवी दिशा मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

# मौल्यवान जीवनापेक्षा शरीर पोकळणाऱ्या व्यसनाधीनतेला महत्त्व?


तंबाखू हे सहज उपलब्ध असलेले एक घातक विष आहे. त्याच्या दुष्परिणामांची माहिती समाजातील बहुसंख्य लोकांना असूनही त्याचे सेवन करणाऱ्यांची संख्या चिंताजनकरीत्या वाढत आहे. शाळकरी मुलांपासून तरुण आणि प्रौढांपर्यंत अनेकजण तंबाखू, गुटखा, सिगारेट आणि इतर तंबाखूजन्य पदार्थांच्या आहारी गेलेले दिसतात. यंदाच्या जागतिक तंबाखू विरोधी दिनाची संकल्पना आकर्षणाचा पर्दाफाश – निकोटीन आणि तंबाखूच्या व्यसनाशी लढा ही आहे.

तंबाखू सेवनाबाबत अनेक गैरसमज समाजात रूढ झाले आहेत. काहींना ते पचनासाठी, तर काहींना कामातील एकाग्रतेसाठी किंवा झोपेसाठी उपयुक्त वाटते. प्रत्यक्षात तंबाखू शरीरातील अवयवांचे नुकसान करून कर्करोग, हृदयरोग, फुफ्फुसांचे आजार, पक्षाघात, मधुमेह आणि इतर गंभीर आजारांना आमंत्रण देते. एकदा व्यसन जडल्यावर त्यातून बाहेर पडणे कठीण होते आणि आयुष्य धोक्यात येते.

तंबाखूचे सेवन विविध स्वरूपात केले जाते. बिडी, सिगारेट, हुक्का, पान, गुटखा, खैनी, खर्रा, पानमसाला यांसह अनेक पदार्थांमधून तंबाखू शरीरात जाते. भारतात सुमारे २६.७ कोटी लोक तंबाखूचे सेवन करतात. तंबाखूमुळे देशात दरवर्षी लाखो लोकांचा अकाली मृत्यू होतो. तोंडाच्या कर्करोगाच्या जवळपास ९० टक्के प्रकरणांमागे धूरविरहित तंबाखू कारणीभूत असल्याचे संशोधनातून स्पष्ट झाले आहे. धूम्रपान करणाऱ्यांपुरतेच हे नुकसान मर्यादित राहत नाही. त्यांच्या धुराच्या संपर्कात येणारे कुटुंबीय आणि इतर नागरिकही 'सेकंड-हँड स्मोकर' बनतात. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, तंबाखूमुळे दरवर्षी जगभरात ७० लाखांहून अधिक लोकांचा मृत्यू होतो. अप्रत्यक्ष धूम्रपानामुळेही लाखो लोकांचे प्राण जातात.

तंबाखू उद्योगातून मोठा महसूल आणि रोजगार निर्माण होत असला, तरी त्याच्या सेवनामुळे आरोग्यसेवा, उपचार आणि उत्पादकतेतील घट यामुळे देशावर प्रचंड आर्थिक भार पडतो. तंबाखूवरून मिळणाऱ्या महसुलापेक्षा त्यातून होणारे सामाजिक आणि आर्थिक नुकसान अधिक असल्याचे अनेक अभ्यासांतून दिसून आले आहे.

तंबाखू किंवा कोणतेही व्यसन सोडण्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे दृढ इच्छाशक्ती. सरकारकडून टोल-फ्री समुपदेशन सेवा, व्यसनमुक्ती केंद्रे आणि वैद्यकीय मदत उपलब्ध आहे. तंबाखू सोडल्याने गंभीर आजारांचा धोका कमी होतो, आर्थिक बचत होते आणि कुटुंबासाठी आदर्श निर्माण होतो. त्यामुळे जीवनाचे मूल्य ओळखून स्वतः सह आपल्या प्रियजनांच्या आरोग्यासाठी आजच तंबाखूमुक्त जीवनाचा संकल्प करणे ही काळाची गरज आहे.



**लेखक –**
**डॉ. प्रितम भि. गेडाम**
**मोबाईल आणि व्हॉट्सॲप क्रमांक –**
**०८२३७४ १७०४१**
pit00786gmail.com

# रेल्वे फाटकाजवळील लोखंडी पाईपमुळे अपघाताची शक्यता



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा** : पुणतांबा –चांगदेव नगर मार्गावर पुणतांबा गावाच्या सार्वजनिक पाणीपुरवठा जलशुध्दीकरण केंद्राच्या जवळ असलेल्या रेल्वे फाटकाजवळ असलेल्या उघडया लोखंडी पाईपमुळे हया ठिकाणी अपघात होण्याची शक्यता आहे अपघात झाल्यानंतर संबधित यंत्रणा जागी होणार का ? असा सवालहया मार्गावर प्रवास करणाऱ्या वाहन धारकांनी केली आहे. रेल्वे फाटकाच्या उत्तर बाजूला गतिरोधकाच्या जवळच अर्धा इंच लोखंडी पाईप उघडा पडला आहे. वाहनचालकाला अगदी जवळ आल्यावर किंवा वाहन पाईपवरून गेल्यावर उघडा लोखंडी पाईप असल्याची जाणीव होते. पाईपवरून जातांना दुचाकी धारक घसरून पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे सध्या हया ठिकाणी ये जा करतांना वाहनचालक अत्यंत त्रस्त झाल्याचे दिसून येत आहे त्यातच पुणतांबा –चांगदेव नगर हा रस्ता अत्यंत अरूंद झाला असून ह्या रस त्याचे रुंदीकरण करण्याची मागणी ह्या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकाकडून केली जात आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# मुळा व ज्ञानेश्वर कारखान्याविरोधात मोट बांधणी

## यंदा तडजोड नाही, निवडणूक लढणारच ▌ प्रस्थापित व्यवस्थापनावर आ. लंघे व शिंदे यांचा घणाघात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा तालुक्यातील ज्ञानेश्वर आणि मुळा सहकारी साखर कारखान्यांच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विरोधकांनी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली असून मुळा व ज्ञानेश्वर कारखान्यांच्या विरोधात विरोधकानी मोट बांधणी सुरू केली आहे यंदा तडजोड नाही, मुळा व ज्ञानेश्वर ची निवडणूक लढणारचअसा निर्धार आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी केला.दोन्ही कारखान्यांच्या विरोधातील सर्व गटातील सभासद पहिल्यांदाच एकत्र आल्याचे प्रतिपादन आमदार विठ्ठलराव लंघे यांनी केले.

प्रस्थापित कारखानदारांच्या विरोधात उभे राहणारे सर्वजण आपले मित्र आहेत. यामध्ये पक्षभेद केला जाणार नाही असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला.ज्ञानेश्वर आणि मुळा सहकारी साखर कारखान्यांच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आमदार विठ्ठलराव लंघे यांच्या कार्यालयात दोन्ही कारखान्यांतील विरोधी सभासदांची पहिली संयुक्त बैठक पार पडली. यावेळी भाजपा, शिवसेना, शेतकरी संघटना, राष्ट्रवादी काँग्रेससह विविध पक्षांचे कार्यकर्ते आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.



अनेक वर्षे ज्ञानेश्वर कारखान्याचे संचालक राहिलेले आमदार लंघे आता विरोधी भूमिकेत असून त्यांच्यासोबत पंचगंगा शुगरचे सर्वेसर्वा प्रभाकर काका शिंदे यांनीही दोन्ही कारखान्यांच्या निवडणुका ताकदीने लढवण्याचा निर्धार व्यक्त केला.सदर बैठकीत प्रभाकर शिंदे यांनी दोन्ही कारखान्यांच्या विद्यमान व्यवस्थापनावर जोरदार टीका करत कोणत्याही परिस्थितीत निवडणुका बिनविरोध किंवा कॉम्प्रमाईज होऊ देणार नाही अशी ठाम भूमिका मांडली. कोणत्याही सभासदाने घाबरण्याची गरज नाही. सभासदांचा ऊस नेण्याची जबाबदारी आमची राहील आणि योग्य सन्मान देऊन तो ऊस घेतला जाईल असे आश्वासन त्यांनी दिले.

कारखाना चालवणे म्हणजे काही रॉकेट सायन्स नाही. ऊस टाकल्यानंतर साखरच बाहेर येते. काटकसर आणि पारदर्शक कारभार केला तर कोणताही कारखाना सक्षमपणे चालू शकतो असे सांगत त्यांनी विद्यमान संचालक मंडळावर अप्रत्यक्ष निशाणा साधला.तालुक्यातील दोन्ही कारखान्यांना ५४ ते ५५ वर्षांचा इतिहास असतानाही प्रत्येकी ५०० ते ६०० कोटी रुपयांचे कर्ज असल्याचा गंभीर आरोपही यावेळी करण्यात आला. कारखानदार कायम कर्जाचा बोभाटा करतात मात्र कारखान्याला झालेला फायदा कधीच सांगत नाहीत. कुठलेही कर्ज घेतल्यानंतर ते फेडले जाते, हे साधे गणित सभासदांना कधी समजावून सांगितले गेले नाही अशी टीका करण्यात आली.सभासदांचा विश्वास संपादन करण्यात दोन्ही कारखाने अपयशी ठरल्याचा आरोप करताना आजही सभासदांनी लावलेला ऊस कारखाना नेईल की नाही, याची शाश्वती नाही. ही बाब कारखानदारांसाठी लाजिरवाणी आहे अशी भावना व्यक्त करण्यात आली. आमदार लंघे यांनी यावेळी सर्व विरोधी गटांनी मतभेद विसरून एकत्र येण्याचे आवाहन केले. सर्वसामान्य सभासदांनी फक्त एक महिना प्रामाणिकपणे दिला तर पुढील पाच वर्षे पश्चातापाची वेळ येणार नाहीअसे ते म्हणाले.

यावेळी झालेल्या बैठकीस नेवासा मार्केट कमिटीचे माजी सभापती शंकरराव लोखंडे,जेष्ठ नेते किसनराव गडाख, भारतीय किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष अंकुश काळे, नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले,शिवसेना नेते भाऊसाहेब वाघ, किरण जाधव, बी. डी. मोटे, दिनकरराव गर्जे, मेजर अरुण फाटके, रामभाऊ खंडागळे, हरीअप्पा तुवर, वाय. डी. कोल्हे, बाबासाहेब पिसोटे, शिवाजीराव मते, आशुतोष डहाळे, राजेंद्र मते, बाळासाहेब पवार, प्रताप चिंधे, आरले, सरपंच ललित मोटे, प्रमोद गजभार आदी उपस्थित होते.

### ऊस नेण्याची गॅरंटी आमचीच

सभासदांचे ऊस नेण्याची गॅरंटी देतो. पंचगंगा कारखान्याप्रमाणे योग्य भाव देऊ. सर्व सभासदांना त्यांच्या मालाचे वजन करण्यास व त्याची पडताळणी करण्यास मुभा राहील अडचणीच्या काळात कारखान्यांनी सभासदांना कायम त्रास दिला. त्यामुळे यावेळी निवडणुका झाल्याच पाहिजेत असे स्पष्ट मत प्रभाकर शिंदे यांनी व्यक्त केले.

---

द-ख-ल

## कृषिदूतांनी रांगोळीतून साकारली देडगाव गावाची प्रतिकृती



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बालाजी देडगाव** : महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत सोनई येथील कृषि महाविद्यालयाती कृषिदूतांनी ग्रामीण जागरूकता व कृषि कार्यानुभव अंतर्गत देडगाव, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर या गावाला भेट दिली.यावेळी ग्रामपंचायत, सोसायटी, मंदिर, जिल्हा परिषद शाळा, पाणी पुरवठा स्त्रोत, अंगणवाडी, पिक-पहाणी, मातीचे प्रकार, शेतीचे क्षेत्र इ. माहिती घेत शेतकऱ्यांशी संवाद साधून गावाचा आढावा घेतला.कृषिदूत-निलेश घोडके , तेजस जायभाय , अथर्व मैड, उदय गाडे, अनुज जगताप, आर्यन कांबळे यांनी देडगाव येथील दत्त मंदिराच्या प्रांगणात रांगोळीच्या माध्यमातून गावाची प्रतिकृती नकाशाच्या स्वरूपात दर्शवली. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरी मोरे, उपप्राचार्य सुनील बोरुडे, कार्यक्रम समन्वयक अनुप दरंदले, कार्यक्रम अधिकारी प्रा. नरेंद्र दहातोंडे, डॉ. दिशा चव्हाण, विषय विशेषज्ञ डॉ. संतोष चौगुले यांचे मार्गदर्शन लाभले.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**वडाळा महादेव** : निपाणी वडगाव येथे रविवार, दिनांक ३१ मे रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाची जय्यत तयारी सध्या गावात सुरू असून, समाज बांधव आणि ग्रामस्थ उत्सव समितीच्या वतीने प्रयत्न केले आहे. सकाळी ९ वा मान्यवरांच्या शुभहस्ते अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात येणार आहे. तसेच सायंकाळी ६ वाजता: ढोल-ताशांच्या गजरात आणि पारंपरिक उत्साहात गावातून भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.हा उत्सव आपल्या सर्वांचा असून अहिल्यादेवींच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे. तरी निपाणी वडगाव परिसरातील जास्तीत जास्त समाज बांधवांनी आणि ग्रामस्थांनी सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे

## माळवाडगांव येथील दोन विद्यार्थिनींची मुंबई पोलीस दलात निवड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगांव** : अशोक कारखाना कार्यक्षेत्रातील माळवाडगांव येथील पल्लवी बबनराव आसने व पायल विजय पवार या विद्यार्थ्यांनीची मुंबई पोलीस दलात निवड झाल्यामुळे अशोक सहकारी साखर कारखान्याचे वतीने चेअरमन व माजी आमदार भानुदास मुरकुटे यांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांचा सत्कार केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी कारखान्याचे व्हा.चेअरमन बाबासाहेब आदिक, कार्यकारी संचालक संतोष देवकर , संचालक हिंमतराव धुमाळ, भाऊसाहेब उंडे,पुंजाहरी शिंदे, आदिनाथ झुराळे, रामभाऊ कासार तसेच माळवाडगाव येथील मुरकुटे यांचे खंदे समर्थक बबनरावआसने, बाळासाहेब आसने सत्कार मुर्तीचे वडील बबनराव किसनराव आसने,व विजय पवार हे उपस्थित होते.

## शिरासगांव येथे ईद-उल-अजहा निमित्त सामूहिक नमाज



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिरासगांव** : येथील मुख्य ईदगाह मैदानावर गावातील सर्व मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने एकत्र आले होते. सर्वांनी मिळून अत्यंत पवित्र आणि शिस्तीच्या वातावरणात ईद-उल-अजहाची विशेष सामूहिक नमाज अदा केली.मौलानांचे विशेष प्रवचन व मार्गदर्शन: नमाजच्या वेळी मुख्य मौलानांनी उपस्थितांना मार्गदर्शन (खुत्बा/बयान) केले. त्यांनी ईद-उल-अजहा सणाचा मुख्य उद्देश, हजरत इब्राहिम आणि हजरत इस्माईल यांच्या त्यागाचा इतिहास आणि मानवी जीवनात बलिदानाचे महत्त्व याबद्दल सविस्तर माहिती दिली. गावात आनंद आणि बंधुभाव: नमाज पठण पूर्ण झाल्यानंतर सर्वांनी एकमेकांना आलिंगन देऊन 'ईद मुबारक' अशा शुभेच्छा दिल्या.

---

# श्रीरामपूर बाजारात कांदा आवकमध्ये घट

## शेतकऱ्यांचा मुक बहिष्कार !

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव :** श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीतील कांदा आवकेत तब्बल ७५ टक्क्यांची घट झाल्याचा दावा शेतकरी संघटना व स्वतंत्र भारत पक्षाच्या वतीने करण्यात आला आहे. बाजार समितीच्या कारभाराविरोधात शेतकऱ्यांनी मुक बहिष्कार टाकत कांदा विक्रीसाठी आणणेच बंद केल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

शेतकरी संघटना आणि स्वतंत्र भारत पक्षाच्या शेतकरी महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बाजार समितीचे सभापती, संचालक व अधिकारी बाजार समिती प्रगती करत असल्याचे कोट्यवधी रुपयांच्या उलाढालीचे आकडे सांगत असले तरी प्रत्यक्षातील कांदा आवकेची घट ही वेगळीच परिस्थिती दर्शवत आहे. या आकडेवारीमुळे बाजार समितीच्या कारभाराचे वास्तव समोर आल्याचा दावा संघटनेने केला आहे.संघटनेच्या मते, बाजार समितीतील कथित शेतकरीविरोधी धोरणांमुळे भुसार बाजार बंद पडला असून, एकेकाळी देशभरात नावाजलेला जनावरांचा बाजारही कायमचा बंद झाला आहे. तसेच पान बाजार बंद झाला असून फळ व भाजीपाला बाजारदेखील बंद होण्याच्या मार्गावर असल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, बाजार समिती प्रशासन विकासकामांपेक्षा शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारणी आणि व्यापारी गाळ्यांच्या विक्रीवर अधिक भर देत असल्याची टीकाही संघटनेने केली आहे. या पार्श्वभूमीवर बाजार समितीच्या अधोगतीच्या कारभाराविरोधात सोमवारी सहाय्यक निबंधक (एआर) सहकारी संस्था कार्यालयात तक्रार दाखल करण्यात येणार असून आंदोलनही छेडण्यात येईल, असा इशारा शेतकरी संघटना व स्वतंत्र भारत पक्षाच्या वतीने देण्यात आला आहे.बाजार समिती प्रशासनाकडून या आरोपांबाबत अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नाही.

# आजोबांवर गोळीबार करणारा नातू गजाआड

## दोन लाखांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**


**राहुरी** : तालुक्यातील मोमीन आखाडा परिसरात आजोबांवर नातवाने गोळीबार करून फरार झालेल्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या २४ तासांत मुळा धरण परिसरातून ताब्यात घेतले. आरोपीकडून गावठी कट्टा, जिवंत काडतुसे, मोबाईल आणि इतर साहित्य असा एकूण २ लाख ४ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, (दि. २९) मे रोजी सकाळी सहाच्या सुमारास मोमीन आखाडा (ता. राहुरी) येथील दगडू गंगाराम कोहकडे यांच्यावर त्यांचाच नातू प्रविण बाबासाहेब कोहकडे (वय २५) याने गोळीबार केला होता.

यापूव गुन्हा दाखल केल्याच्या रागातून प्रविणने आजोबांचा जीव घेण्याच्या उद्देशाने गावठी कट्ट्यातून गोळी झाडल्याचा आरोप आहे. घटनेनंतर आरोपी फरार झाला होता. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक आरोपीच्या शोधासाठी रवाना करण्यात आले. तपासादरम्यान आरोपी बारागाव नांदूर ते मुळा धरण परिसरात फिरत असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली.त्यानुसार सापळा रचून संशयिताला ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने स्वतःचे नाव प्रविण बाबासाहेब कोहकडे असल्याचे सांगितले. झडतीदरम्यान आरोपीकडून ३० हजार रुपये किमतीचा गावठी कट्टा, ४ हजार रुपये किमतीची चार जिवंत काडतुसे, मोबाईल, कट्टा ठेवण्याचे लेदर पाऊच तसेच काडतुसांच्या रिकाम्या पुंगळ्या असा एकूण २ लाख ४ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यानंतर आरोपीला पुढील कारवाईसाठी राहुरी पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले असून, त्याला अटक करण्यात आली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास राहुरी पोलीस करत आहेत.

# समनापुर पाणीपुरवठा योजनेचा वीजपुरवठा सुरळीत; गावाला दररोज पाणीपुरवठा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : तालुक्यातील समनापुर गावातील पाणीपुरवठा योजनेला वेळोवेळी होणारा वीजपुरवठा खंडित होत होता. मात्र पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार अमोल खताळ यांच्या सूचनेनंतर अवघ्या चार ते पाच दिवसांत वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला. त्यामुळे भर उन्हाळ्यात गावाला दररोज पाणी मिळण्यास सुरुवात झाल्यामुळे ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला आहे.



समनापुर गावासह वाड्या-वस्त्यांवर आठ दिवस पाणी मिळत नव्हते. त्यामुळे पाण्याअभावी ग्रामस्थांचे हाल होत होते. यासंदर्भात शिवसेनेचे उपतालुकाप्रमुख रणजित जाधव यांनी संगमनेर येथे झालेल्या पाणीटंचाई आढावा बैठकीत मंत्री विखे-पाटील व आमदार खताळ भाजप सरचिटणीस संपत गेठे यांच्यापुढे व्यथा मांडली होती. त्या नंतर मंत्री विखे-पाटील यांनी तातडीने महावितरण अधिकाऱ्यांना काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

त्यानंतर समनापुरचे ज्येष्ठ नेते म्हतू शरमाळे, माजी सरपंच भाऊ साहेब शेरमाळे, रामनाथ केसकर, राजेंद्र गायकवाड, शिवसेनेचे उप तालुका प्रमुख रणजित जाधव,भाजप तालुका सरचिटणीस संपत गेठे, समन्वयक सुनिल चांडे, राहुल पकळे, युवा सेना उपतालुकाप्रमुख एकनाथ शेरमाळे तसेच संदीप शेरमाळे, राजेश शेरमाळे मेजर रावसाहेब शेरमाळे, , भागा शेरमाळे, मनोज भास्कर, मच्छिंद्र शेरमाळे, बापू दळवी आणि देवेंद्र साळवे यांनी स्वतः उपस्थित राहून पोलीस बंदोबस्तात पाईपलाईन योजनेचा वीजपुरवठा सुरळीत केला.

त्यामुळे पाणीपुरवठाही नियमित सुरू झाला आहे. पाणीपुरवठा करणाऱ्या योजनेला यापूर्वी केवळ सहा तास वीजपुरवठा होत होता. त्यामुळे सात ते आठ दिवसांनंतर एकदाच पाणी येत होते. या गंभीर बाबीची दखल घेत पालक मंत्री राधाकृष्ण विखे पा.व आमदार अमोल खताळपा. यांनी महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना वीजपुरवठा सुरळीत करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर महावितरण कर्मचाऱ्यांनी निंबाळे शिवारातून जात असणार्या समनापुर पाणीपुरवठा योजनेचा वीज पुरवठा २४ तास सुरू राहावा यासाठी युद्धपातळीवर काम केले अन अवघ्या एकाच आठवड्यामध्ये वीजपुरवठा सुरळीत केला. पाणीपुरवठा योजनेसाठी असणारा वीज पुरवठा २४ तास सुरू झाला आहे.त्यामुळे आता गावातील वाडी-वस्त्यांवर दररोज पाणीपुरवठा होत आहे. गेल्या ४० वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार अमोल खताळ यांच्या प्रयत्नातून सुटल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

# चुकून बेलापूरला उतरलेल्या तामिळनाडूच्या विद्यार्थ्याला पोलिसांची मदत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : धावपळीच्या आणि दगदगीच्या जीवनात आजही माणुसकी जिवंत असल्याचा प्रत्यय देणारी घटना श्रीरामपूर शहरात घडली. मुंबईतील सीबीडी बेलापूर येथे जाण्याऐवजी नावातील साधर्म्यामुळे चुकून श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर रेल्वे स्थानकावर उतरलेल्या तामिळनाडूच्या एका मर्चंट नेव्ही विद्यार्थ्याला श्रीरामपूर शहर पोलिसांनी मोलाची मदत करत सुरक्षितपणे त्याच्या पुढील प्रवासाची व्यवस्था करून दिली.

अँटो हर्षद (रा. तामिळनाडू) हा मर्चंट नेव्हीचे शिक्षण घेणारा विद्यार्थी मुंबईतील सीबीडी बेलापूर येथे जाण्यासाठी रेल्वेने प्रवास करत होता. मात्र, स्थानकाच्या नावातील साधर्म्यामुळे तो चुकून बेलापूर (श्रीरामपूर) रेल्वे स्थानकावर उतरला. अनोळखी परिसर, भाषेची अडचण आणि रात्रीची वेळ यामुळे तो गोंधळलेल्या अवस्थेत श्रीरामपूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात फिरत होता.

दरम्यान, २८ मे रोजी रात्री पेट्रोलिंग करत असताना श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल रोकडे यांनी मोठी बॅग घेऊन उभ्या असलेल्या या तरुणाची विचारपूस केली. मराठी व हिंदी भाषा येत नसतानाही त्यांनी संयमाने संवाद साधून त्याची अडचण जाणून घेतली. त्यानंतर संबंधित विद्यार्थी मुंबईऐवजी चुकून बेलापूर (श्रीरामपूर) येथे आल्याचे स्पष्ट झाले.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन रोकडे यांनी त्या विद्यार्थ्याला धीर दिला. त्याला आपल्या वाहनातून रेल्वे स्थानकावर नेले. तसेच स्वतः मुंबईसाठी रेल्वे तिकीट काढून देत मनमाड जंक्शनमार्गे जाणाऱ्या रेल्वेत सुरक्षितपणे बसवून दिले.

पुढील प्रवासासाठी रवाना होताना अँटो हर्षद याने थँक्स श्रीरामपूर पोलीस, थँक्स महाराष्ट्र पोलीस अशा शब्दांत कृतज्ञता व्यक्त केली. पोलिसांच्या या संवेदनशील आणि तत्पर मदतीचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, महाराष्ट्र पोलिसांचे सद्रक्षणाय खलनिग्रहणाय हे ब्रीदवाक्य पुन्हा एकदा सार्थ ठरल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# संगमनेर तालुक्याला हक्काचे पाणी मिळालेच पाहिजे : थोरात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : तालुक्याला निळवंडे धरणाचे हक्काचे पाणी मिळालेच पाहिजे, अशी ठाम भूमिका माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केली. तळेगाव दिघे येथे सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या वतीने आयोजित ऊस विकास मेळाव्यात ते बोलत होते.



थोरात म्हणाले की, चिंचोली गुरव येथे झालेल्या पाणी परिषदेपासून निळवंडे धरणासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. अनेक अडचणींना सामोरे जात धरण व दोन्ही कालवे पूर्ण करण्यात आले. सध्या कालव्यांचे अस्तरीकरण करून पाणी पुढे नेले जात असले तरी संगमनेर तालुक्याच्या हक्काच्या पाण्यावर कोणताही परिणाम होऊ देता कामा नये. पाणी व वीज हे राजकारणापलीकडचे विषय असून या प्रश्नांवर सर्वांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.निमोण, नान्नज दुमाला, पारेगाव खुर्द, पारेगाव बुद्रुक, तळेगाव, सोनोशी, काकडवाडी, पिंपळे व करुले गावांसाठी मंजूर करण्यात आलेल्या उपसा सिंचन योजना नव्या सत्ताधाऱ्यांनी रद्द केल्याचा आरोपही त्यांनी केला. भोजापूर चारीसाठी केलेल्या प्रयत्नांची आठवण करून देत पाणी प्रश्नावर मौन बाळगणाऱ्यांना जनता जाब विचारेल, असे ते म्हणाले.

काकडी विमानतळ व रेल्वे प्रकल्पांसाठी झालेल्या प्रयत्नांचाही त्यांनी उल्लेख केला. संगमनेर तालुक्याच्या विकासात राजकारण आणण्याचा प्रयत्न होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. यावर्षी कमी पावसाची शक्यता लक्षात घेता उपलब्ध पाण्याचा जपून वापर करण्याचे आवाहन करताना दूध व ऊस ही शाश्वत पिके असल्याचे सांगितले. शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून एकरी १०० टन ऊस उत्पादनाचे लक्ष्य ठेवावे, असेही त्यांनी नमूद केले.यावेळी व्हीएसआयचे शास्त्रज्ञ डॉ. अशोक जगताप यांनी आधुनिक संशोधन व ऑस्ट्रेलियातील शेती पद्धतींचा लाभ महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना होईल, असे सांगितले. डॉ. समाधान सुरवसे यांनी माती परीक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत शेतीचे आरोग्य चांगले राहिल्यास ऊस उत्पादन वाढते, असे स्पष्ट केले. कार्यक्रमास कारखान्याचे पदाधिकारी, संचालक, कृषी अधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## जाहिर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः नेवासा तालुक्यातील लोकांना या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. प्रमोद बाबुराव शिंदे रा.प्लॉट नंबर १५३, गल्ली नं. १४, एन मुकंदवाडी, रेल्वे स्टेशन रोड, विश्रांती चौक, के पास, जय भवानीनगर, जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) व धोंडीराम श्रीराम भिसे, रा. मंगळवार पेठ, हावळे गल्ली, अंबेजोगाई जि. बिड यांनी मौजे गळनिंब, ता. नेवासा जि. अहिल्यानगर येथील गट नं. १३३/१ यापैकी किरण शिवाजी आघाव यांचे नावावरील क्षेत्र ०१ हे २९ आर व त्याच गटातील महेश भिवाजी आघाव यांचे नावावरील ०१ हे २८ आर क्षेत्र, तसेच गट नंबर १३४/१/ब पैकी भिवाजी विठोबा आघाव यांचे नावावरील ०१ हे १८ आर, तसेच गट नं. १३४/१/अ पैकी भिवाजी विठोबा आघाव यांचे नावावरील ०० हे ५८ आर वर नमुद तिन्ही मिळकतीची गट नंबर १३४/अ/१ अमित सुभाष शेळके यांची शेतजमिन शिवरस्ता, दक्षिणेस गट नं. १३३ अशोक वेंकट शेळके, चर्तुसिमा पुर्वेस मिळकत, पश्चिमेस उत्तरेस :- गट नंबर १५२ दिलीप मुरलीधर शेळके असुन अशा चर्तुसिमापुर्वक मिळकतीचा खरेदी खताने विकत घेण्याचा सौदा केलेला आहे व खरेदी घेणार आहेत. सदर मिळकतीबाबत कोणाचाही खरेदी विक्री करारनामा, मृत्यूपत्र, लिज, साठेखत, भाडेपट्टा, इत्यादी स्वरुपाचा कोणत्याही प्रकारचा व्यवहार असल्यास त्वरीत नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत आमचे अशिलाशी कागदपत्र घेवुन संपर्क साधावा. १५ दिवसाच्या आत कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार न आल्यास आमचे अशिल सदरची मिळकत ही निर्वेध व निर्जोखमी असे समजुन सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही तक्रार, हरकत ऐकुन घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहिर नोटीस दिली असे.

नेवासा

दिनांक :-३०/०५/२०२६

प्रमोद बाबुराव शिंदे
मोबा नं. ९९२१४७००४०
मोबा. नं. ९८२२८७१८९८

**ॲड. मुंगसे आर.एम.**
नेवासा ता. नेवासा,जि. अहिल्यानगर
मो. नं. ९८९०७४८७७२

## जाहिर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः नेवासा तालुक्यातील लोकांना या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की,

आमचे अशिल विलास सुखदेव चव्हाण व कैलास सुखदेव चव्हाण, रा. खेडले काजळी, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर यांनी मौजे खेडलेकाजळी, ता. नेवासा जि. अहिल्यानगर येथील गट नं. ८/१/ब क्षेत्र ०० हे ८६ आर पैकी ०० हे ८४ आर ही राजेश पिता बळीराम वरंगटवार, वनसुखलाल पिता शिवाजीभाऊ पटेल, वैशाली संजय सदगुल्ले यांचे सामाईक क्षेत्र, तसेच गट नंबर ८/१/अ क्षेत्र ०१ हे ६८ आर यापैकी ०० हे ८४ आर हे राजेश पिता बळीराम वरंगटवार, वनसुखलाल पिता शिवाजीभाऊ पटेल, वैशाली संजय सदगुल्ले यांचे सामाईक या क्षेत्राचा कायमस्वरुपी खरेदी खताने विकत घेण्याचा सौदा केलेला आहे व खरेदी घेणार आहेत. सदर मिळकतीबाबत कोणाचाही खरेदी विक्री करारनामा, मृत्यूपत्र, लिज, साठेखत, भाडेपट्टा, इत्यादी स्वरुपाचा कोणत्याही प्रकारचा व्यवहार असल्यास त्वरीत नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०८ दिवसाच्या आत आमचे अशिलाशी कागदपत्र घेवुन संपर्क साधावा. ०८ दिवसाच्या आत कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार न आल्यास आमचे अशिल सदरची मिळकत ही निर्वेध व निंजोखमी असे समजुन सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही तक्रार, हरकत ऐकुन घेतली जाणार नाही

याची नोंद घ्यावी. ही जाहिर नोटीस दिली असे.

नेवासा

दिनांक :-३०/०५/२०२६

विलास सुखदेव चव्हाण
मोबा नं.८३०८४३१७२५
कैलास सुखदेव चव्हाण
मोबा नं. ८८३०९८१६२०

**ॲड. मुंगसे आर.एम.**
**नेवासा कोर्ट, ता. नेवासा**
**जि. अहिल्यानगर**
**मो. नं. ९८९०७४८७७२**

## जाहीर नोटीस

जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविण्यात येते की.

मिळकतीचे वर्णन जि. अहिल्यानगर ता. संगमनेर येथील मौजे संगमनेर बु।। येथील

**मिळकत : -**

| स. नं. / ग.नं. | क्षेत्र हे. आर | आकार रु.पै. |
|---|---|---|
| २०४/१८ | ०.००.७५ | ०.०५ |

यासी चतुःसिमा रेकॉर्ड ऑफ राईट प्रमाणेः-

येणेप्रमाणे मिळकतींचे वर्णन असे.

वर वर्णन केलेली मिळकत सलीम राजमोहंमद शेख, हलीमा सलिम शेख, सोहेल इलियासअहमद शेख सर्व रा. जुना जोर्वे रोड, मदिनानगर, गल्ली नं. १ संगमनेर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर यांचे मालकीची असुन सदर मिळकती संबंधी दि. १७/२/२०२६ रोजी नोटरी दस्त क्र. ६९/२०२६ अन्वये ॲड. आर.एस. शिंदे, नोटरी संगमनेर यांचे समोर विसारपावती झालेली असुन सदर विसारपावतीने आमचे अशिलाकडुन मोठी विसाराची रक्कमही स्विकारलेली आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणत्याही स्वरुपाचा गहाण, दान, खरेदी, विक्री, बक्षीस, भाडेपट्टा, खरेदीखत, साठेखत, वारसा हक्क अथवा तबदीलचा, हस्तांतराचा आमचे अशिलाचे संमती शिवाय करु नये. सदरचा व्यवहार आचमे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. होणारा व्यवहार बेकायदेशीर ठरेल. ही नोटीस असे. ता. २८/०५/२०२६.

अशिका राशिद पटेल
आमचे अशिल

**ॲड. एस.ए. हासे**
**इंद्रप्रस्थ लॉन्सच्या पाठीमागे, लोहे मळा,**
**कासारा दुमाला, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर**
**मो.नं. ९६२३३७७८२४**

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की.

मिळकतीचे वर्णन जि. अहिल्यानगर, ता. अकोले, पैकी मौजे गणोरे ग्रामपंचायत हद्दीतील शेतजमिन मिळकतींचे वर्णन खालील प्रमाणे.

| गट नंबर | क्षेत्र हे. आर | आकार रु. पैसे | यासी चतुः सिमा |
|---|---|---|---|
| ८७१ | ०.४० | २.२५ | गावचे रेकॉर्ड ऑफ राईटप्रमाणे |
| ८७८ | ०.८१ | ४.५० | गावचे रेकॉर्ड ऑफ राईटप्रमाणे |
| ८७९/१ | ०.७० | २.८५ | गावचे रेकॉर्ड ऑफ राईटप्रमाणे |

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन असे.

वरील मिळकती अनुक्रमे रेखा भागवत शिंदे व भागवत तुकाराम शिंदे यांचे मालकीच्या असून सदर मिळकती आमचे अशिल अनुक्रमे सिंधू दगडू शिंदे, दिनेश दगडू शिंदे व निलेश दगडू शिंदे, सर्व रा. गणोरे, ता. अकोले, जि.अ.नगर यांनी खरेदी घेण्याचे ठरवून तसा विसाराचा व्यवहार पूर्ण केलेला आहे.

सदर मिळकती निर्वेध व निर्जोखमी असलेबाबतची खात्री रेखा भागवत शिंदे व भागवत तुकाराम शिंदे यांनी आमचे अशिलांस दिली आहे. तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणाचेही कोणतेही साठेखत, विसारपावती, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, लीज, बक्षिसपत्र, कोर्ट कारवाई, मनाई हुकूम, दावा, न्यायालयीन कारवाई इ. तोंडी अथवा लेखी, अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह समक्ष भेटुन आमची खात्री करुन दयावी अन्यथा मुदतीत कोणाचीही, कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निर्जोखमी आहे असे समजून आमचे अशिल हे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही, परस्पर घेतलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची जाहीर नोंद घेण्यात यावी.

दिनांक - २८/०५/२०२६

**ॲड. एस.ए. हासे**
**इंद्रप्रस्थ लॉन्सच्या पाठीमागे, लोहे मळा,**
**कासारा दुमाला, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर**
**मो.नं. ९६२३३७७८२४**

## पान १ वरुन

### पुण्यात १९ जणांचा बळी घेणाऱ्या दारू कांडानंतर भिवंडीतून मिथेनॉलचा मोठा साठा जप्त

गोदामात तब्बल ५,९२९ किलोग्रॅम मिथेनॉलचा साठा आढळून आला. धक्कादायक बाब म्हणजे, या विषारी द्रव्याची कोणतीही नोंदवही (स्टॉक रजिस्टर) किंवा खरेदी-विक्रीचा तपशील कंपनीकडे उपलब्ध नव्हता. मिळालेल्या माहितीनुसार, फुगेवाडीत ज्यांनी प्राण गमावले त्यांनी कर्नालसिंग विरका याच्या घरी हातभट्टीची दारू पिली होती. विरकाने ही दारू योगेश वानखेडेकडून मिळवली होती, तर योगेश उरळी कांचन येथील राजू प्रजापतीकडून दारू आणून पुरवत होता. या संपूर्ण साखळीला मिथेनॉलचा पुरवठा भिवंडीच्या 'रेक्स इंटरनॅशनल' कंपनीकडून केला गेल्याचे उघड झाले आहे. मालकाविरुद्ध गुन्हा दाखल, परवाना रद्द होणार कारवाईच्या वेळी संस्थेचे मालक अरूणकुमार चौबे आणि सक्षम व्यक्ती अभिषेक चौबे हजर नव्हते. अधिक चौकशी केली असता, त्यांना राज्य उत्पादन शुल्क विभागाने आधीच ताब्यात घेतल्याचे समजले. या दोघांविरुद्ध भिवंडीतील नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, विषारीद्रव्य अधिनियमांतर्गत कारणे दाखवा नोटीस बजावून कंपनीचा परवाना रद्द करण्याची प्रक्रिया ठाणे एफडीए कार्यालयाने सुरू केली आहे.

### प्राजक्त तनपुरे यांची राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी

दुपारी मुंबई येथे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला आहे.याप्रसंगी माजी खासदार सुजय विखे पाटील हे उपस्थित होते. यावेळी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण प्राजक्त तनपुरे यांना भगवी शाल देऊन त्यांचा सन्मान करुन भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्याबद्दल त्यांचे स्वागत केले. यावेळी बोलताना प्राजक्त तनपुरे म्हणाले की, भारतीय जनता पार्टीने माझ्यावर जो विश्वास दाखवला त्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही.मी माझे कार्यकर्ते पक्षासाठी झटून काम करू.व पक्ष संघटन करु. यावेळी बोलतांना प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण म्हणाले की, अहिल्या नगर जिल्ह्यातील एक कणखर व सुशिक्षित नेतृत्व आमच्याकडे आले आहेत. राहुरी मतदार संघातील असलेली विकास कामासाठी आम्ही सरकारच्या माध्यमातून भक्कमपणे उभे राहू. प्राजक्त तनपुरे यांनी आमच्यावर जो विश्वास टाकला त्या विश्वासाला आम्ही तडा जाऊ देणार नाही व त्यांच्या पाठीमागे भारतीय जनता पक्ष भक्कमपणे उभा राहिल असे म्हणून त्यांनी प्राजक्त तनपुरे यांना विधान परिषदेची उमेदवारी देणार असल्याचे संकेत दिले. (पान ४ वर)याप्रसंगी माजी खासदार सुजय विखे पाटील यांचा यांचा प्राजक्त तनपुरे यांनी सत्कार केला. याप्रसंगी प्राजक्त तनपुरे आणि माजी खासदार सुजय विखे यांनी गळा भेट घेतली त्यावेळेस जमलेल्या सर्व कार्यकर्त्यांनी टाळ्या वाजवून समर्थन केले. प्राजक्त तनपुरे यांच्या भाजपाच्या प्रवेशामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील भाजपा पक्षाची ताकद अजूनच वाढणार आहे. या कार्यक्रम प्रसंगी राहुरी नगर परिषदेचे नगर अध्यक्ष उपाध्यक्ष नगरसेवक यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

### मुरुम चोरांचा पाठलाग करताना दुचाकीला जेसीबीने चिरडले

होती. त्यानुसार ते घटनास्थळी गेले असता, आरोपी राम म्हस्के आणि त्याचा जेसीबी चालक तेथून वाहनांसह जेऊर गावाच्या दिशेने पळून जात होते. विजय कजबे आणि त्यांचा मित्र प्रदीप चिंचने यांनी आपल्या मोटार सायकलवरून (क्रमांक एम.एच. १६ बी.जे. २१२६) या चोरांचा पाठलाग केला. अहिल्यानगर ते छत्रपती संभाजीनगर जाणाऱ्या रस्त्यावरील जरे वस्तीजवळ त्यांनी जेसीबीला अडवण्याचा प्रयत्न केला. यावेळी जेसीबी चालकाने पळून जाण्याच्या उद्देशाने आपले वाहन भरधाव वेगात चालवले. आपल्या या कृतीमुळे कोणाचा जीव जाऊ शकतो याची पूर्ण जाणीव असतानाही, त्याने कजबे यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली व त्यांना काही अंतरापर्यंत फरपटत नेले. या गंभीर अपघातात प्रदीप चिंचने यांचा मृत्यू झाला, तर विजय कजबे हे जखमी झाले असून त्यांच्यावर सुरभी रुग्णालयात

### अहिल्यानगर विधान परिषद रणसंग्राम रंगणार!

राम शिंदे यांनीही निष्ठावंत कार्यकर्त्याला संधी मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. त्यामुळे तनपुरे यांची उमेदवारी जाहीर झाल्यास भाजपमधील अंतर्गत असंतोष कितपत नियंत्रणात राहतो, हे महत्त्वाचे ठरणार आहे.

या सर्व घडामोडींमध्ये श्रीगोंद्याचे सहकार क्षेत्रातील ज्येष्ठ नेते दत्तात्रय भाऊसाहेब पानसरे यांचे नाव अचानक चर्चेत आले आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाचे माजी अध्यक्ष, जिल्हा बँकेचे संचालक आणि जिल्हा परिषद सदस्य म्हणून काम पाहिलेल्या पानसरे यांनी निवडणूक लढविण्याची तयारी सुरू केल्याने निवडणुकीला नवे परिमाण मिळाले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांतील सदस्यांशी असलेले त्यांचे दीर्घकालीन संबंध त्यांना लाभदायक ठरू शकतात, असे राजकीय जाणकारांचे मत आहे.यावेळी मतदार म्हणून केवळ महानगरपालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींचे लोकप्रतिनिधी मतदान करणार आहेत. अहिल्यानगर महापालिकेचे सर्वाधिक मतदारांना महापालिका कार्यक्षेत्रातील मात्र उमेदवार निवडणूक रिंगणात नाही. ग्रामीण भागातील मतदार या निवडणुकीत नसल्याने नगरसेवक आणि स्थानिक स्वराज्य संस्थांतील सदस्यांची भूमिका निर्णायक ठरणार आहे. या मतदारांमध्ये आपल्यातील, संपर्कात राहणारा आणि काम करणारा आमदार अशी भावना महत्त्वाची मानली जाते. एकूणच, प्रारंभी बिनविरोध होण्याची शक्यता वर्तविली जात असलेली अहिल्यानगर विधान परिषद निवडणूक आता करण ससाणे, प्राजक्त तनपुरे आणि दत्तात्रय पानसरे यांच्या संभाव्य तिरंगी लढतीम ुळे जिल्ह्याच्या राजकारणातील सर्वाधिक चर्चेची आणि प्रतिष्ठेची निवडणूक ठरण्याची चिन्हे आहेत.

### राळेगणसिद्धीला सैन्य दलाकडून 'टी-५५' रणगाडा भेट

आणि विविध शासकीय यंत्रणांशी सातत्यपूर्ण समन्वय साधत हा उपक्रम यशस्वी केला. विशेष म्हणजे, अण्णा हजारे भारतीय सैन्यात कार्यरत असताना याच प्रकारच्या रणगाड्यांचा वापर युद्ध मोहिमांमध्ये करण्यात आला होता. त्यामुळे या रणगाड्याचे अण्णांच्या जीवनाशीही भावनिक आणि ऐतिहासिक नाते जोडले गेले आहे. देश-विदेशांतून राळेगणसिद्धीला भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी आणि नवतरुणांसाठी हा रणगाडा प्रेरणास्थान ठरणार आहे. भारतीय सैन्याचे शौर्य, शिस्त आणि राष्ट्रनिष्ठा यांची जाणीव पुढील पिढीपर्यंत पोहोचावी या उद्देशाने हा रणगाडा गावातील प्रमुख दर्शनीय ठिकाणी स्थापित करण्यात येणार आहे. ऐतिहासिक कार्याबद्दल चंद्रकांत शिंदे, लेफ्टनंट जनरल आर. आर. निंबोरकर (निवृत्त) व दादा पठारे यांचे अभिनंदन होत आहे.
रणगाड्याचा पराक्रमी इतिहास - रशियन बनावटीचा 'टी-५५' रणगाडा १९६० मध्ये भारतीय सैन्यात दाखल झाला होता. ५१ वर्षे देशसेवा बजावल्यानंतर २०११ मध्ये तो सन्मानपूर्वक निवृत्त करण्यात आला. या रणगाड्याने भारत-पाकिस्तान युद्धासह १९७१च्या ऐतिहासिक बांगलादेश मुक्ती संग्रामात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. रणभूमीवर शत्रूविरुद्ध लढताना भारतीय सैन्याच्या शौर्याचा तो साक्षीदार आहे.

### एक महिन्यात मराठा आरक्षण कक्ष स्थापणार

शासनाकडून त्यात सांगण्यात आले. कुणबी प्रमाणपत्र वितरीत करण्यासाठी कार्यपद्धती तयार केली आहे. आंदोलनात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या वारसाना १५ दिवसात अर्थसहाय्य देण्यात येईल. कामाम ध्ये निष्काळजी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल, अशी लेखी आश्वासने सदर मसुद्याद्वारे देण्यात आली आहेत. मराठा आरक्षण उप समितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्वतः उपोषण स्थळी भेट देऊन त्या संदर्भात जरांगे पाटलांची व त्यांनी पाठवलेल्या प्रतिनिधींशी देखील सविस्तर चर्चा केली.

दरम्यान, जरांगे पाटील मात्र उपोषणावर ठाम असल्याचे दिसून आले. आम्ही सरकारला खूप वेळ दिला, आता आणखी वेळ देणार नाही, असे म्हणत जरांगे यांनी मसुदा लेखी स्वरूपात पाहिल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नसल्याचा पवित्रा घेतला होता. आता सरकारचा हा अधिकृत ड्राफ्ट समोर आल्यानंतर आता मनोज जरांगे पाटील हे आपले उपोषण मागे घेणार का? याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

# वैजापूर जिल्ह्यातील ६३३ ग्रामपंचायतींचे आरक्षण जाहीर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : डिसेंबर २०२५ मध्ये मुदती संपणाऱ्या जिल्ह्यातील ६३३ ग्रामपंचायतींच्या सदस्यांच्या आरक्षणाचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला असून या प्रक्रियेसाठी प्रशासन सज्ज झाले आहेत. १२ जून रोजी ही सोडत निश्चित केली जाणार आहे. दरम्यान या पार्श्वभूमीवर तालुक्याचे राजकारण पुन्हा एकदा तापण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. तालुक्यातील १०५ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा बिगुल वाजताच गावागावात राजकीय हालचालींना वेग आला आहे. नगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांनंतर आता ग्रामीण सत्तेवर कब्जा मिळवण्यासाठी मोठी लढत रंगणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने आरक्षण प्रक्रियेचा कार्यक्रम जाहीर केल्यानंतर नेते, गट आणि संभाव्य उमेदवारांनी आपल्या-आपल्या गावांत मोर्चेबांधणी सुरू केली आहे.

माहितीनुसार, डिसेंबर २०२५ पर्यंत कार्यकाळ संपणाऱ्या ग्रामपंचायतींसह सन २०२५ मध्ये नव्याने स्थापन झालेल्या आणि मुदतपूर्व बरखास्त करण्यात आलेल्या ग्रामपंचायतींचाही या निवडणूक प्रक्रियेत समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे संपूर्ण तालुक्यात निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापले आहे. चहाच्या टपरीपासून चौकापर्यंत आता केवळ निवडणुकीच्या चर्चाच ऐकायला मिळत आहेत.

> राज्य निवडणूक आयोगाने कार्यकाळ संपलेल्या ग्रामपंचायतींच्या सदस्य पदांच्या आरक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. हा कार्यक्रम राज्यातील ग्रामपंचायतीसाठी लागू आहे. यापूर्वी सरपंच पदांचे आरक्षण निश्चित करण्यात आले होते. त्यानंतर प्रभागरचना करण्यात आली.
> **- सुनील सावंत, तहसीलदार, वैजापूर**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एकूण ६३३ ग्रामपंचायतींच्या निवडणुका होणार आहेत. यामध्ये सर्वाधिक १०५ ग्रामपंचायती वैजापूर तालुक्यात आहेत, तर सर्वात कमी ४२ ग्रामपंचायती सोयगाव तालुक्यात आहेत. वैजापूरमध्ये इतक्या मोठ्या संख्येने निवडणुका होत असल्याने येथे राजकीय तापमान इतर तालुक्यांच्या तुलनेत अधिक वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**आरक्षण प्रक्रियेचा कार्यक्रम**
८ जून : विशेष ग्रामसभेची सूचना जाहीर होणार.
१२ जून : तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली विशेष ग्रामसभा घेऊन एससी, एसटी, ओबीसी आणि महिला आरक्षणाची सोडत काढली जाईल.
१७ जून : प्रभागनिहाय आरक्षण प्रारूपाला जिल्हाधिकाऱ्यांची मंजुरी.
१९ जून : आरक्षण प्रारूप प्रसिद्ध केले जाईल.
१९ ते २५ जून : आरक्षणावर हरकती आणि सूचना मागविण्यात येतील.
३ जुलै : उपविभागीय अधिकारी हरकतींवर निर्णय देतील.
८ जुलै : जिल्हाधिकारी अंतिम मंजुरी देतील.
१० जुलै : अंतिम प्रभाग रचना आणि आरक्षण यादी प्रसिद्ध होईल.

ग्रामीण राजकारणात ग्रामपंचायत निवडणुका या प्रतिष्ठा आणि वर्चस्वाची लढाई मानल्या जातात. त्यामुळे अनेक गावांमध्ये जुने राजकीय वाद पुन्हा उफाळून येऊ लागले आहेत. काही ठिकाणी गटबाजी, आरोप-प्रत्यारोप आणि शक्तिप्रदर्शनालाही सुरुवात झाली आहे. राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता लक्षात घेता गावागावात बैठका, रात्रीच्या सभा आणि गुप्त रणनीतींचे सत्र वेगाने सुरू झाले आहे. अनेक गावांमध्ये समर्थकांमध्ये तणावाचे वातावरणही निर्माण होताना दिसत आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, पावसाळ्याचा काळ लक्षात घेऊन मतदान दिवाळीच्या सुमारास घेण्यात येण्याची शक्यता आहे. आरक्षणाचे चित्र स्पष्ट होताच संभाव्य उमेदवार उघडपणे मैदानात उतरतील. त्यानंतर गावागावात बॅनर, पोस्टर, मिरवणुका, बैठका आणि शक्तिप्रदर्शन पाहायला मिळू शकते. राजकीय जाणकारांच्या मते, यंदाच्या ग्रामपंचायत निवडणुका केवळ गावच्या सत्तेपुरत्या मर्यादित राहणार नाहीत, तर आगामी मोठ्या निवडणुकांची दिशाही ठरवणार आहेत. त्यामुळे स्थानिक नेत्यांपासून मोठ्या राजकीय चेहऱ्यांपर्यंत सर्वांचे लक्ष आता वैजापूर तालुक्यातील गावांकडे लागले आहे.

**सरपंच पदांचे आरक्षण निश्चित**

गेल्या काही दिवसांपूर्वी ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांचे आरक्षण निश्चित करण्यात आले होते. आता सदस्य पदांसाठी आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. दरम्यानच्या काळात प्रभागरचना करण्यात आली होती.

# ३९ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांच्या तयारीला वेग; ईशान्य भारत सज्ज

**गौरव डेंगळे । राष्ट्र सह्याद्री**

**शिलाँग** : येथे २०२७ मध्ये होणाऱ्या ३९ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांच्या तयारीला आता अधिकृतपणे वेग आला आहे.केंद्रीय युवा व्यवहार व क्रीडा मंत्री डॉ.मनसुख मांडविया यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित आढावा बैठकीत स्पर्धांच्या आयोजनासंदर्भातील विविध बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला.या महत्त्वपूर्ण बैठकीस मेघालयचे मुख्यमंत्री कॉनराड के. संगमा,केंद्रीय युवा व्यवहार व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे,मेघालयचे क्रीडा व युवा व्यवहार मंत्री वेलाडमिकी शायला,भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्षा डॉ. पी. टी. उषा, युवा व्यवहार व क्रीडा मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी तसेच ईशान्येकडील विविध राज्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.बैठकीदरम्यान क्रीडा पायाभूत सुविधांच्या उभारणीची प्रगती, स्पर्धा स्थळांची तयारी, विविध यंत्रणांमधील समन्वय, खेळाडूंना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सुविधा आणि इतर महत्त्वाच्या तयारीचा आढावा घेण्यात आला. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे यशस्वी आयोजन सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व घटकांवर सखोल चर्चा करण्यात आली.

यावेळी ३९ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांसाठी मेघालय राज्य आणि संबंधित संस्थांदरम्यान 'होस्ट स्टेट ॲग्रीमेंट'वर स्वाक्षरी करण्यात आली. हा केवळ एका मोठ्या क्रीडा स्पर्धेच्या आयोजनाचा करार नसून ईशान्य भारतातील वाढत्या क्रीडा क्षमतेचा, महत्त्वाकांक्षेचा आणि विकासाचा प्रतीकात्मक टप्पा मानला जात आहे.या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा प्रादेशिक स्वरूपाचा सहभाग. मेघालय हे मुख्य यजमान राज्य असले तरी ईशान्येकडील इतर राज्यांनाही त्यांच्या प्रदेशात आयोजित होणाऱ्या काही क्रीडा प्रकारांच्या आयोजनात सहभागी होण्याचा अधिकार असेल. त्यामुळे या स्पर्धा केवळ एका राज्यापुरत्या मर्यादित न राहता संपूर्ण ईशान्य भारताच्या एकात्मता, सहकार्य आणि क्रीडा उत्कृष्टतेचे दर्शन घडविणाऱ्या ठरणार आहेत.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली आणि केंद्रीय क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांच्या मार्गदर्शनाखाली ३९ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमधून जागतिक दर्जाच्या क्रीडा सुविधा, खेळाडू विकासासाठी नवीन संधी आणि ईशान्य भारतातील युवकांसाठी उज्ज्वल क्रीडा भविष्य निर्माण करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.२०२७ मध्ये होणाऱ्या या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांद्वारे ईशान्य भारत आपली समृद्ध संस्कृती, उत्कृष्ट पाहुणचार, क्रीडा परंपरा आणि अमर्याद क्षमता संपूर्ण देशासमोर सादर करण्यास सज्ज झाला आहे. भारतभरातील हजारो खेळाडूंचे स्वागत करण्यासाठी ईशान्य भारत उत्सुक असून या स्पर्धा भारतीय क्रीडा इतिहासातील एक संस्मरणीय पर्व ठरण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




# यांत्रिकीकरणाच्या जमान्यात बैल जोड्या दुर्मिळ

**शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर** : कधीकाळी शेतीचा आधारस्तंभ मानली जाणारी बैल जोडी आता हळूहळू दुर्मिळ होत चालल्या आहेत. कृषी क्षेत्रात वाढलेल्या यांत्रिकीकरणामुळे पारंपरिक शेतीपद्धती मागे पडत असून, गावागावांत दिसणाऱ्या बैलजोड्या आता मोजक्याच उरल्या आहेत. अलीकडील पशुगणनेतही बैलांच्या संख्येत मोठी घट झाल्याचे चित्र समोर आले आहे.

पूर्वी शेतीत नांगरणी, वखरणी, पेरणी यांसारखी सर्व कामे बैलांच्या सहाय्याने केली जात होती. शेतकरी म्हटला की त्याच्या गोठ्यात किमान एक बैलजोडी असायचीच. मात्र, आधुनिक तंत्रज्ञानाच्या आगमनानंतर शेतीत ट्रॅक्टर, पॉवर टिलर आणि विविध यंत्रांचा वापर वाढला. कमी वेळ, कमी श्रम आणि अधिक उत्पादन या कारणांमुळे शेतकऱ्यांचा कल यंत्रांकडे वळला.

> **ट्रॅक्टरांकडे वाढता कल**
> अनेक ठिकाणी पूर्वी बैलांच्या सहाय्यानेच नांगरणी केली जात होती. मात्र, आता लहान आकाराचे ट्रॅक्टर उपलब्ध झाल्याने दुर्गम भागातही यंत्रांचा वापर वाढू लागला आहे. वेळ आणि श्रमाची बचत होत असल्याने मोठ्या शेतकऱ्यांकडून ट्रॅक्टरला अधिक पसंती दिली जात आहे शेतीतील बदल, तरुणांची शेतीकडे असलेली उदासीनता आणि वाढते यांत्रिकीकरण यामुळे पशुधनात घट झाली आहे. तरीही शेतीसाठी पूरक व्यवसाय म्हणून पशुधनाची गरज कायम आहे, अरुण कवडे, भेर्डापूर

लहान शेतकऱ्यांसाठी वर्षभर बैलजोडी सांभाळणे आर्थिकदृष्ट्या सध्या परवडणारे राहिलेले नाही. चारा, पाणी, औषधोपचार आणि देखभालीचा वाढता खर्च यामुळे अनेकांनी बैल पाळणे बंद केले आहे. परिणामी, गावात एखाद-दुसरीच बैलजोडी दिसून येते. काही शेतकरी गरजेनुसार इतरांकडील बैलजोडी भाड्याने घेऊन शेतीची कामे करत आहेत.

पावसाच्या लहरीपणामुळे शेती तोट्यात जात असल्याने आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना पशुधनाचा खर्च झेपेनासा झाला आहे. दुसरीकडे, शेतीतील बहुतांश कामे यंत्रांद्वारे होत असल्याने बैलांचे महत्त्व कमी होत चालले आहे.



## निधन वार्ता

### रेवती नवले



**मिरजगाव** : कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथील शिवसेनेचे (उबाठा) पक्षाचे कर्जत तालुका उपप्रमुख व ज्येष्ठ नेते शिवाजीराव नवले यांच्या पत्नी रेवती शिवाजी नवले (वय ५५) यांचे शुक्रवारी, दि.२९ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे.
त्यांच्या पश्चात पती, मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे.

### हक्काच्या पाण्यासाठी नमुना क्रमांक ७ चे अर्ज भरा : जिल्हाध्यक्ष अनिल औताडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील महांकाळवाडगाव येथे शेतकरी संघटनेच्या वतीने आयोजित शेतकरी मेळावा उत्साहात पार पडला. शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल औताडे व तालुकाध्यक्ष युवराज जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या मेळाव्याचे अध्यक्षस्थान प्रगतशील शेतकरी प्रकाशराव वानखेडे यांनी भूषविले. भंडारदरा सिंचन प्रणालीच्या एन.बी. शाखेअंतर्गत चारी क्रमांक डी-२ वर उंदीरगाव, माळेवाडी, सरला आणि महांकाळवाडगाव या गावांतील शेतकऱ्यांची शेती व पिण्याच्या पाण्याची गरज अवलंबून आहे. शेतकरी संघटनेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे या भागाला पाणी उपलब्ध झाल्याबद्दल स्थानिक शेतकऱ्यांनी जिल्हाध्यक्ष अनिल औताडे व तालुकाध्यक्ष युवराज जगताप यांचा सत्कार केला. यावेळी बोलताना अनिल औताडे म्हणाले की, हा शेतकऱ्यांच्या कायदेशीर हक्कांसाठी उभारलेला लढा असून शेतकरी संघटना गेल्या दोन दशकांपासून शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करत आहे. आजही शेतकऱ्यांना वीज, पाणी, बियाणे, खते आणि इंधन यांसारख्या मूलभूत गरजांसाठी संघर्ष करावा लागत आहे. उत्पादन खर्च वाढत असताना शेतीमालाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. ते पुढे म्हणाले की, माळेवाडी, सरला आणि महांकाळवाडगाव येथील शेतकरी संघटित झाल्यामुळे त्यांना हक्काचे पाटपाणी मिळू शकले. भंडारदरा सिंचन प्रणालीचे उपकार्यकारी अभियंता संजय कल्हापुरे यांनी नमुना क्रमांक ७ चे अर्ज भरलेल्या शेतकऱ्यांना नियमानुसार पाणी उपलब्ध करून देत थकीत वसुलीतही मोठी कामगिरी केली आहे. खरीप, रब्बी आणि उन्हाळी हंगामासाठी सिंचनाचे पाणी मिळविण्यासाठी शेतकऱ्यांनी नमुना क्रमांक ७ चे अर्ज नियमितपणे भरावेत, असे आवाहन औताडे यांनी केले. काही शेतकरी अधिकृत प्रक्रियेऐवजी अनधिकृत मार्गाने पाणी घेत असल्याने सिंचनाच्या मागणीची नोंद शासनाच्या अभिलेखात होत नाही, ही बाब चुकीची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पाटपाण्याच्या संदर्भात तालुक्यातील कोणत्याही शेतकऱ्यावर अन्याय झाल्यास शेतकरी संघटना त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील, अशी ग्वाहीही औताडे यांनी दिली.

### ब्राह्मणी हत्याकांड : आरोपीला पाच दिवसांची कोठडी

(दि.२८) मे रोजी मा.न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने आरोपीस (दि.१ ) जुनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. पोलीस अधीक्षक मुम्मका एम. सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या म ार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्यासह पोलिस उपनिरीक्षक समाधान फडोळ, पोलीस कॉन्स्टेबल रविद्र कांबळे, पोलीस हवालदार, पो.कॉ. राठोड, कुदळे पोलिस पो.कॉ.जिने, पो.कॉ. निकम पो.कॉ. सुरज गायकवाड यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# ईपीएस-९५ पेन्शनधारक कार्यकर्त्यांची बाभळेश्वर येथे बैठक

## हायर पेन्शनसाठी संघटना सर्वतोपरी प्रयत्न करणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव** : ईपीएस-९५ पेन्शनधारक कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक बाभळेश्वर येथील संत एकनाथ महाराज पतसंस्था सभागृहात उत्साहात पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हा सहकारी बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी अण्णासाहेब म्हस्के हे होते.





या बैठकीस श्रीरामपूर, नेवासा, राहाता, कोपरगाव, संगमनेर आणि राहुरी तालुक्यातील जिल्हा सहकारी बँकेचे सेवानिवृत्त पेन्शनधारक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नानासाहेब रेपाळे, भोई, भोसले, खिलारी, कवडवाले, गोकुळ मेहेर आणि विठ्ठल खांडरे यांनी मनोगत व्यक्त करत पेन्शनधारकांच्या विविध समस्या मांडल्या. तसेच हक्काची पेन्शन मिळविण्यासाठी संघटितपणे प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

बैठकीत जिल्हाध्यक्ष संपत समिंदर, जी. के. चिंतामणी (पुणे जिल्हा समन्वयक), महाराष्ट्र राज्य समन्वयक अजितकुमार घाडगे, शिर्डी अध्यक्ष दशरथ पवार तसेच उत्तर महाराष्ट्र संघटक बापूराव बहिरट यांनी मार्गदर्शन केले.

पश्चिम भारत संघटक सुभाष पोखरकर यांनी ईपीएस-९५ पेन्शनधारकांच्या प्रश्नांवर सविस्तर माहिती देताना सांगितले की, जिल्हा सहकारी बँकेच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना हायर पेन्शन मिळवून देण्यासाठी संघटना सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. यासाठी सर्व सदस्यांनी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष कमांडर अशोकराव राऊत यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून एकजुटीने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.जिल्हा सहकारी बँकेकडून अपेक्षित सहकार्य मिळाले नाही तर बँकेसमोर धरणे आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. किमान पेन्शन वाढीसाठी कमांडर अशोकराव राऊत यांच्या नेतृत्वाखाली देशभर सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती देत, पेन्शनधारकांच्या मागण्यांना लवकरच न्याय मिळेल, असा विश्वासही वक्त्यांनी व्यक्त केला.बैठकीत पेन्शनधारकांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली आणि संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

आज ३१ मे, आज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती. ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चोंडी या गावी माणकोजी व सुशिलाबाई शिंदे या दाम्पत्यापोटी अहिल्यादेविंचा जन्म झाला. अतिशय छोट्या आणि सामान्य कुटूंबात जन्मलेल्या अहिल्यादेवी यांनी इतिहासात मानाचे स्थान प्राप्त केले आहे. ज्या काळात स्त्रियांना शिक्षणास बंदी होती, चूल आणि मूल हेच स्त्रियांचे जीवन होते, स्त्रियांनी घराचा उंबरठा ओलांडणे म्हणजे पाप समजले जात त्याकाळात त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहायला, वाचायला शिकवले. मराठ्यांच्या इतिहासातील पराक्रमी समजल्या जाणाऱ्या होळकर घराण्यातील सुभेदार खंडेराव होळकर यांच्याशी वयाच्या आठव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. खंडेरावांपासून त्यांना मालेराव आणि मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. पण वयाच्या अवघ्या २८ व्या वर्षी त्यांना वैधव्यास सामोरे जावे लागले. पती खंडेराव हे कुंभेरीच्या लढाईत धारातीर्थी पडल्यावर त्यावेळच्या सनातनी लोकांनी त्यांच्यावर सती जाण्यासाठी दबाव आणला पण सासरे सरदार मल्हारराव होळकर यांनी या अमानवी, सनातनी परंपरेला विरोध करून अहिल्यादेवींना सती जाण्यापासून परावृत्त केले. आपल्या सासऱ्यांच्या इच्छेनुसार त्यांनी सती जाण्याचा विचार सोडून दिला. अहिल्यादेवींची राजकीय कारकीर्द




तेंव्हापासूनच सुरू झाली. खंडेरावांची जागा अहील्यादेवींनी घेतली. मल्हारराव देशभर मोहिमांवर व्यस्त असत त्यावेळी मल्हारराव आणि अहिल्यादेवींमध्ये पत्रव्यवहार होत. सासरा - सुनेमधील पत्रव्यवहार हा अहिल्यादेवींच्या राजकीय विचारकतेचा उत्कृष्ट नमुना होय. मोहीमेवर असताना मल्हारराव प्रजा रक्षणाच्या सूचना अहिल्यादेवींना जसे देताना दिसतात तसेच अहिल्यादेवी आपल्या सासऱ्यांना देताना दिसतात. सासरा सुनेचे ऐकल असा तो काळ नव्हता.... आता ही नाही... पण मल्हाररावांसारखा मुत्सद्दी अहिल्यादेवींचा सल्ला अंमलात आणत यावरुनच अहिल्यादेवींची योग्यता लक्षात येते. मल्हारराव मोहिमेवर असत तेंव्हा स्वतः अहिल्यादेवी राज्याचा बंदोबस्त चोख राखीत. मल्हाररावांच्या सूचनेप्रमाणे त्या कारभार करीत. १७६६ साली मल्हाररावांचे वृद्धापकाळाने निधन झाले. दरम्यानच्या काळात अहिल्यादेवींनी स्त्रियांना लष्करी प्रशिक्षण देणारे महाविद्यालय सुरू केले. ज्या काळात स्त्रियांना घराबाहेर पडायला बंदी होती त्याकाळात त्यांनी स्वतःची ५०० महिलांची पलटण उभी केली. अहिल्यादेवींचे प्रशासन ब्रिटिशांनाही आदर्शभूत ठरले. सर्व देशात जेंव्हा दांडगाईचे राज्य होते, कोणाचा कोणाला पायपोस नव्हता त्याकाळात सुरळीत चालणारे एकमेव राज्य म्हणजे अहिल्यादेवींचे राज्य. अहिल्यादेवी या दानशूर, कर्तृत्वत्वान, धर्मपारायण व कार्यक्षम राज्यकर्त्या म्हणून ओळखल्या जात असल्या तरी त्यांची राज्यकारभारावर प्रशासकीय पकड घट्ट होती. त्यांच्या वडिलांनी लहानपणी दिलेल्या शिकवणुकीचा आणि सासरे मल्हारराव यांनी दिलेल्या राजकीय कारभाराच्या तालमीचा त्यांना उपयोग झाला. त्या सामान्य कुटुंबातील असल्यामुळे त्यांना प्रजेच्या अडीअडचणीची जाणीव होती. त्यांचे राहणे अतिशय साधे व सात्विक होते म्हणूनच त्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर असे नाव पडले. अहिल्यादेवींनी देशभर भ्रमंती केली. देशभ्रमण करताना तिर्थक्षेत्रांच्या जागी त्यांनी धर्मशाळा बांधल्या. शेकडो मंदिरांचा जिर्णोद्धार केला. जवळपास २८ वर्ष त्यांनी राज्यकारभाराचा गाडा सैन्याच्या सहकार्याने अतिशय कुशलपणे चालवला. कोणतेही कर्ज न काढता राज्याची तिजोरी भक्कम करून त्यांनी प्रजाहिताकडे लक्ष दिले. आदर्श राज्यकारभार कसा करावा याचा वस्तुपाठच अहिल्यादेवींनी घालून दिला. अहिल्यादेवी होळकर हे नाव इतिहासात अमर झाले. बाई काय राज्यकारभार करणार ही सनातनी अटकळ त्यांनी खोटी ठरवली. १३ ऑगस्ट १७९५ रोजी अहिल्यादेवींचे निधन झाले. प्रजाहितदक्ष, आदर्श राजकर्ती म्हणून इतिहासात अजरामर झालेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# पेट्रोल, डिझेल, गॅस दरवाढीविरोधात भाकपचे आंदोलन

## महागाईने होरपळलेल्या जनतेला दिलासा देण्याची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर : पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसच्या सतत वाढत असलेल्या दरांमुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक गणित पूर्णपणे विस्कळीत झाले असून जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीही मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. वाढत्या महागाईमुळे आधीच त्रस्त असलेल्या जनतेवर इंधन दरवाढीचा अतिरिक्त बोजा पडत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय कम्युनिस्ट पक्ष (भाकप) आणि विविध जनसंघटनांच्या वतीने येत्या १ जून रोजी राज्यव्यापी निषेध आंदोलन पुकारण्यात आले.**

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालय व तहसील कार्यालया समोर निदर्शने करण्यात येणार आहे. या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव ॲड. सुभाष लांडे, जिल्हा सचिव बन्सी सातपुते, सहसचिव ॲड. सुधीर टोकेकर, संतोष खोडदे आणि आयटकचे सतीश पवार यांनी केले आहे.

### इंधन दरवाढ मागे घ्या, शेतकरी व विद्यार्थ्यांना विशेष सवलती द्या

भाकपच्या पदाधिकाऱ्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या काही दिवसांत पेट्रोल, डिझेल आणि गॅसच्या दरांमध्ये वारंवार वाढ करण्यात आली आहे. अवघ्या आठ दिवसांत चार वेळा इंधन दरवाढ झाल्याने वाहतूक खर्चात वाढ झाली असून त्याचा परिणाम थेट बाजारपेठेतील सर्वच वस्तूंच्या किंमतींवर होत आहे. यामुळे सर्वसामान्य



नागरिक, कामगार, शेतकरी, विद्यार्थी आणि मध्यमवर्गीय कुटुंबांचे जगणे अधिकच कठीण झाले आहे.

इंधन दरवाढीमुळे शेती उत्पादनाचा खर्च वाढत असून शेतकऱ्यांना ट्रॅक्टर, पंपसेट आणि इतर कृषी कामांसाठी अधिक खर्च करावा लागत आहे. तसेच खतांच्या वाढत्या किंमतींमुळे शेती व्यवसाय आर्थिकदृष्ट्या अडचणीत येत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सरकारने तातडीने हस्तक्षेप करून महागाई नियंत्रणात आणण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी आंदोलनाच्या माध्यमातून पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसच्या वाढीव किंमती तात्काळ मागे घ्याव्यात, वाढत्या महागाईवर नियंत्रण ठेवून सर्वसामान्य जनतेला दिलासा द्यावा, शेतकऱ्यांना ट्रॅक्टरसाठी सवलतीच्या दरात आवश्यक तेवढे डिझेल उपलब्ध करून द्यावे, रासायनिक खतांचा स्वस्त दरात पुरवठा करून शेती उत्पादन खर्च कमी करावा, नीट (छएएढ) परीक्षेच्या नव्याने होणाऱ्या परीक्षेसाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना रेल्वे व एस.टी. प्रवासात मोफत किंवा विशेष सवलत द्यावी तसेच त्यांच्या राहण्याची व भोजनाची व्यवस्था शासनाने करण्याची मागणी करण्यात आली आहे. पेट्रोल, डिझेल आणि गॅस दरवाढीमुळे निर्माण झालेल्या आर्थिक संकटाविरोधात जनतेचा आवाज शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी हे आंदोलन महत्त्वाचे ठरणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# दखल

## जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्यावतीने खेळाडूंचे वाढदिवस साजरे



**अहिल्यानगर :** मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुले बुद्धिबळ स्पर्धेत केवळ बुद्धिबळाच्या चुरशीच्या लढतीच नव्हे, तर खेळाडूंसाठी आपुलकीचे वातावरणही अनुभवायला मिळत आहे. स्पर्धेच्या कालावधीत ज्या खेळाडूंचे वाढदिवस होते, त्यांचा अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी यांच्या हस्ते पेढे भरवून सत्कार करण्यात आला. यामुळे खेळाडूंमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. याप्रसंगी संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी देशातील विविध राज्यांमधून तसेच परप्रांतातून स्पर्धेसाठी आलेल्या खेळाडूंचे विशेष कौतुक केले. त्यांनी सांगितले की, अशा राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमुळे विविध भागांतील खेळाडूंना एकमेकांशी संवाद साधण्याची, अनुभवांची देवाणघेवाण करण्याची आणि मैत्रीपूर्ण वातावरणात खेळण्याची संधी मिळते. स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी पारुनाथ ढोकळे, संजय सपकाळ, प्रकाश गुजराथी, पंच प्रवीण ठाकरे, पवन राठी, प्रशांत धगेकर, देवेंद्र ढोकळे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व स्वयंसेवक परिश्रम घेत असून त्यांच्या प्रयत्नांमुळे स्पर्धेचे नियोजन सुरळीतपणे पार पडत आहे. बुद्धिबळप्रेमी आणि पालकांकडूनही या उपक्रमाचे कौतुक करण्यात येत आहे.

## जागेच्या वादातून व्यावसायिकाला मारहाण

**अहिल्यानगर :** शहरातील लालटाकी भागातील मिसगरचाळ येथे जागेच्या कारणावरून झालेल्या वादातून एका आकाश कंदील व्यावसायिकाला धारदार शस्त्राने आणि लाथाबुक्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी चार जणांविरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मोसिन वसिम खान (वय ३८, रा. मिसगरचाळ, लालटाकी, अहिल्यानगर) हे आपल्या कुटुंबासह राहून आकाश कंदील बनवण्याचा व्यवसाय करतात. त्यांचा सलमान अब्दुल शेख याच्यासोबत जागेचा जुना वाद सुरू आहे. याच वादाच्या कारणावरून ही मारहाणीची घटना घडली. मोसिन खान हे बाजार आणण्यासाठी रस्त्याने जात असताना, रिक्षातून सलमान अब्दुल शेख हा तिथे आला. त्याच्यासोबत आधीच तिथे उभे असलेले इरफान इक्बाल शेख, हुजेब युसुफ सय्यद आणि अनिस इक्बाल शेख हे सर्वजण फिर्यादीजवळ आले. 'तुला घर द्यायचे की नाही' असे म्हणून सलमान याने फिर्यादीला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. खान यांनी शिवीगाळ करण्यास विरोध केला असता, त्याचा राग येऊन सलमानने त्यांच्या उजव्या गालावर जोरात चापट मारली. तसेच त्याच्या कमरेला असलेल्या एका धारदार वस्तूने खान यांच्या हातावर वार करून त्यांना जखमी केले. त्यानंतर त्याच्यासोबत असलेल्या इरफान शेख, हुजेब सय्यद आणि अनिस शेख यांनी फिर्यादीला लाथाबुक्यांनी बेदम मारहाण केली आणि जीवे मारण्याची धमकी देऊन सर्वजण तिथून पसार झाले. मारहाणीत जखमी झालेल्या खान यांना पोलिसांनी उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठवले. उपचार घेतल्यानंतर खान यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी सलमान अब्दुल शेख, इरफान इक्बाल शेख, हुजेब युसुफ सय्यद आणि अनिस इक्बाल शेख (सर्व रा. लालटाकी, अहिल्यानगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस सहाय्यक फौजदार थोरवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल इनामदार करत आहेत.

## तरुणावर प्राणघातक हल्ला; चौघांविरुद्ध गुन्हा

**अहिल्यानगर :** शहरातील कापसे हॉस्पिटल परिसरात एका तरुणाला ३ ते ४ अनोळखी व्यक्तींनी कोणतीही पूर्वकल्पना नसताना बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत. वाळकी परिसरातील आरणगाव रोडवर राहणारे नदीम मुर्तुजा शेख (वय ३२) हे शेळी खरेदी-विक्रीचा व्यवसाय करतात. २८ मे रोजी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास नदीम हे त्यांचे काम संपवून घरी परतत होते. रात्री सव्वानऊ वाजेच्या सुमारास जुन्या कोर्टाच्या पाठीमागील कापसे हॉस्पिटल जवळून जात असताना, त्यांच्या परिचयातील एक महिला त्यांना भेटली. नदीम हे त्या महिलेसोबत बोलत थांबले होते. त्याच वेळी अचानक तिथे तीन ते चार अनोळखी तरुण आले. त्यांनी नदीम आणि त्या महिलेला त्यांचे नाव विचारले. नाव सांगताच काहीही कारण नसताना या गुंडांनी नदीम यांना अश्लील शिवीगाळ आणि दमदाटी करण्यास सुरुवात केली. वाद एवढ्यावरच थांबला नाही, तर त्या अनोळखी इसमांनी नदीम यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर सोबत आणलेल्या लाकडी दांडक्याने आणि लोखंडी फायटरने नदीम यांच्या डोक्यावर आणि शरीरावर गंभीर वार केले. या हल्ल्यात नदीम यांच्या डोक्याला मोठी दुखापत झाली आणि रक्तस्त्राव सुरू झाला. सोबत असलेल्या महिलेने प्रसंगावधान राखून आरडाओरडा सुरू केला. लोकांच्या भीतीने हे सर्व अनोळखी हल्लेखोर तिथून पळून गेले. यानंतर जखमी नदीम यांनी तात्काळ कोतवाली पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी त्यांना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात पाठवले. रुग्णालयात प्रथमोपचार घेतल्यानंतर नदीम मुर्तुजा शेख यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात हजर राहून फिर्याद दिली. पोलिसांनी या प्रकरणी तीन ते चार अज्ञात हल्लेखोरांविरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे.

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग कोतवालीत गुन्हा दाखल



**अहिल्यानगर :** कल्याण बायपास रस्ता परिसरातील मारुती मंदिर शेजारी एका अकरा वर्षांच्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पीडित मुलगी घरात एकटीच असताना आरोपी मिनीनाथ चव्हाण याने घरात प्रवेश केला. आरोपीने पीडितेशी अश्लील चाळे करून तिचा विनयभंग केला व तिला लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. हा प्रकार घडल्यानंतर पीडितेच्या मजुरी करणाऱ्या पालकांनी तात्काळ कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून आरोपी मिनीनाथ चव्हाण याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड आणि साहाय्यक पोलीस निरीक्षक तेजस्विनी थोरात यांनी घटनास्थळी भेट दिली. या प्रकरणाचा पुढील तपास साहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सपकाळे करत आहेत.

# चिखलीत पारधी कुटुंबावर हल्ला

## एसपींच्या आदेशानंतर फेरतपासणी; आरोपींवर गुन्हा दाखल करावा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** श्रीगोंदा तालुक्यातील चिखली येथे पारधी समाजातील काळे कुटुंबावर झालेल्या कथित जीवघेण्या हल्ला प्रकरणाला नवे वळण मिळाले असून, जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या हस्तक्षेपानंतर या प्रकरणाची फेरतपासणी सुरू करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. पीडित कुटुंबाने मुख्य आरोपींना संरक्षण दिल्याचा आरोप करत न्यायासाठी लढा उभारला असून, संबंधित आरोपींवर तात्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

मनीषा अंकुश काळे (रा. चिखली) यांनी दिलेल्या जबाबानुसार, त्यांनी गट क्रमांक ६७/१ मधील शेतजमीन करारनाम्याद्वारे घेतली असून त्या आपल्या कुटुंबासह तेथे वास्तव्यास आहेत. २२ मे २०२६ रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास ज्ञानेश्वर जगन्नाथ लंके, पांडुरंग भास्कर गाडेकर, महादेव मुकिंदा झेंडे, प्रवीण प्रकाश शिंदे, संतोष संपत झेंडे आदी जण त्यांच्या राहत्या पालावर आले. यावेळी जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण करण्यात आली तसेच त्यांच्या अल्पवयीन मुलीशी गैरवर्तन करत तिच्या अंगावरील कपडे फाडून लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. पीडित कुटुंबाने या घटनेची तक्रार देण्यासाठी बेलवंडी पोलीस ठाण्यात धाव घेतली. मात्र, मुख्य आरोपींविरुद्ध योग्य कारवाई न करता अन्य एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आल्याचा आरोप त्यांनी यापूर्वी केला होता. या पार्श्वभूमीवर आदिवासी व पारधी समाजातील कार्यकर्त्यांनीही संताप व्यक्त करत निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे.

दरम्यान, २७ मे रोजी कर्जत येथे आयोजित कार्यक्रमादरम्यान पीडितांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांची प्रत्यक्ष भेट घेतली. यावेळी त्यांनी उपोषणाचा इशाराही देत संपूर्ण प्रकरण मांडले. त्यानंतर पोलीस अधीक्षकांनी संबंधित अधिकाऱ्यांना प्रकरणाची चौकशी करून आवश्यक ती कारवाई करण्याचे तोंडी निर्देश दिल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर २८ मे रोजी डेप्युटी पोलीस अधिकाऱ्यांसमोर मनीषा काळे यांचा सविस्तर जबाब नोंदविण्यात आला. या जबाबामध्ये आरोपींनी केलेल्या कथित मारहाणीचा, जातीवाचक शिवीगाळीचा तसेच अल्पवयीन मुलीवरील गैरवर्तनाचा उल्लेख करण्यात आला आहे. या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करून अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यासह संबंधित गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करावा, अशी मागणी पीडित कुटुंबीय व समाजबांधवांकडून करण्यात येत आहे.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये स्त्रीरोग शिबिरास प्रतिसाद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** आमच्या मातोश्री स्वातंत्र्य सैनिका स्व. मानकुवरबाई कांकरिया यांनी स्वातंत्र्यसंग्रामात महात्मा गांधी व विनोबा भावे यांच्यासोबत काम केले आहे.तसेच स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी नऊ महिन्यांचा तुरुंगवास भोगला आहे.स्वातंत्र्य सैनिका म्हणून त्यांचा भारत सरकारने गौरव केला आहे.त्यांची सून असल्याचे भाग्य मला लाभले आहे.स्त्री ही सृष्टीचा आधार आहे. कुटुंबाचा आधारस्तंभ आहे.आई ही पाठशाळा व पहिली गुरु असते.वास्तल्य नावाच्या जागतिक विद्यापीठाचे कुलगुरू आई हीच असते.एक स्त्री शिकली तर कुटुंब साक्षर होते. त्याचप्रमाणे एक स्त्री निरोगी राहिली तर परिवारा सोबतच समाज निरोगी बनवते.निरोगी आरोग्य संपन्न समाजाची गुरुकिल्ली एक स्त्रीच असते. घराला घरपण देणारी ही देखील एक स्त्रीच असते.या शिबिराच्या माध्यमातून महिलांच्या विविध आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. तसेच गर्भवती मातांची देखील तपासणी होणार आहे. आईचा गर्भ हे तीर्थक्षेत्र आहे.आईच्या गर्भात मुलगा किंवा मुलगी असो त्यांचे मनापासून स्वागत झालेच पाहिजे.जन्माला येण्यापूर्वीच मुलगी आहे म्हणून ती ची हत्या केली.तर यासारखे महापाप कोणतेच नाही.गर्भात असलेल्या बाळाचे रक्षण करणे.हे ध्येय बाळगून स्त्री जन्माचे स्वागत करावे. असे प्रतिपादन समाजसेविका डॉ.सुधाताई कांकरिया यांनी केले आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये स्त्रीरोग,गर्भवती महिला तपासणी व सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन स्वातंत्र्य सैनिका स्व.मानकुवरबाई कन्हैयालालजी कांकरिया यांच्या स्मरणार्थ कांकरिया परीवाराच्यावतीने करण्यात आले होते.या शिबिराचे उद्घाटन प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ.प्रकाश कांकरिया व डॉ.सुधाताई कांकरिया यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.याप्रसंगी जैन सोशल फेडरेशनचे डॉ.वसंत कटारिया, माणकचंद कटारिया,अभय गुगळे,सुभाष मुनोत,वसंत चोपडा,प्रकाश छल्लाणी,डॉ. आशिष भंडारी तसेच शिबिराचे तज्ञ डॉ.रवींद्र मुथा,डॉ. कृतिका पाटील आदी उपस्थित होते. प्रास्ताविकात डॉ.वसंत कटारिया म्हणाले,डॉ.प्रकाश कांकरिया हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे नेत्रतज्ञ आहेत.या शिबिराचे त्यांनी प्रायोजकत्व स्वीकारले आहे.आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या उभारणीपासूनच डॉ. कांकरिया यांचे मोलाचे योगदान लाभत आहे.

# चॅम्पियनशिप २०२५-२६ फुटबॉल लीगचा टप्पा यशस्वीरित्या पूर्ण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन आयोजित अहिल्यानगर लीग चॅम्पियनशिप २०२५-२६ चा लीग टप्पा यशस्वीरित्या पूर्ण झाला. जिल्ह्यातील एकूण १२ संघांनी स्पर्धेत सहभाग घेतला. अहमदनगर क्लब शेजारील भुईकोट किल्ला मैदान येथे १८ दिवस चाललेल्या या स्पर्धेत एकूण ३६ सामने खेळविण्यात आले. सर्व संघांनी उत्कृष्ट खेळभावना आणि स्पर्धात्मक फुटबॉलचे दर्शन घडविले. लीग फेरीअंती पुढील संघांनी सुपर लीगसाठी पात्रता मिळविली. पूल - फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल क्लब, बाटा फुटबॉल क्लब पूल इ सुमन एंटरप्रायझेस फुटबॉल क्लब, गुलमोहर फुटबॉल क्लब सुपर लीग सामने ३० जून पासून सुरू होणार असून, २ जुलै रोजी होणारा अंतिम सुपर लीग सामना अहिल्यानगर लीग चॅम्पियनशिप विजेता निश्चित करणार आहे. स्पर्धेतील सर्व सामने यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल फुटबॉल असोसिएशन रेफरी पॅनेलचेही विशेष आभार मानण्यात आले. या पॅनेलमध्ये जॉय जोसेफ, प्रकाश कनोजिया, वैभव मनोदिया, शशांक वाल्मिकी, अक्षय बोराडे, रितेश रणमाळे, महेश पाटेकर, अभिषेक सोनवणे, अभय साळवे, जॉय शेळके, सुमित कुमारसिंह, भूषण गवळी, प्रियंका अवारे, सोनिया दोसानी, पूजा भिंगारदिवे, आणि मनीष कुमार सिंह यांचा समावेश होता. अहिल्यानगरमधील फुटबॉलप्रेमींनी सुपर लीगच्या रोमांचक सामन्यांना उपस्थित राहावे असे आवाहन असोसिएशनतर्फे करण्यात आले आहे.

# राष्ट्रीय पल्स पोलिओ डोस मोहीम २८ जून रोजी

## महानगरपालिका स्तरीय कृती दलाची बैठक संपन्न

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** राष्ट्रीय पल्स पोलिओ निर्मूलन मोहिमेअंतर्गत रविवार, दिनांक २८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत शून्य ते पाच वर्षे वयोगटातील सर्व बालकांना पल्स पोलिओचा डोस देण्यात येणार असल्याची माहिती अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपायुक्त मेहर लहारे यांनी दिली. शहरातील एकही बालक पल्स पोलिओच्या डोसपासून वंचित राहणार नाही, यासाठी प्रशासनामार्फत व्यापक नियोजन करण्यात आले असून शेवटच्या घटकातील बालकापर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय पल्स पोलिओ डोस मोहिमेच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने महानगरपालिका स्तरीय कृती दलाची नियोजन बैठक उपायुक्त मेहर लहारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी विविध विभागांच्या समन्वयावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, शिक्षण अधिकारी पठाण सर, डॉ. दिलीप बागल, डॉ. वृषाली आरु, रोटरी



क्लब ऑफ अहिल्यानगरचे माजी अध्यक्ष सुनील कटारिया, डॉ. उज्वला शिरसाट, डॉ. रणजीत सत्रे, डॉ. समीर होळकर, जायंटस ग्रुप ऑफ अहिल्यानगरचे संजय गुगळे, प्रतिभा राऊत, सुमित जाधव, शिल्पा ठोंबरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत मार्गदर्शन करताना उपायुक्त मेहर लहारे म्हणाले की, पोलिओमुक्त भारताचे उद्दिष्ट कायम राखण्यासाठी प्रत्येक बालकापर्यंत पल्स पोलिओचा डोस पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी महानगरपालिका, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संघटनांच्या समन्वयातून प्रभावी जनजागृती मोहिम राबविण्यात येणार आहे. शहरातील सर्व पोलिओ बूथ, फिरती पथके आणि विशेष मोहिमांद्वारे लाभार्थी बालकांपर्यंत पोहोचण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर म्हणाले की, राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम ही बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मोहीम आहे. महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत शहरातील सर्व पोलिओ बूथचे नियोजन पूर्ण करण्यात आले असून आरोग्य कर्मचारी, आशा सेविका व स्वयंसेवकांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. शहरातील एकही बालक पल्स पोलिओच्या डोसपासून वंचित राहू नये यासाठी विशेष भर दिला जाणार आहे.

## अनुसूचित जाती अ-ब-क-ड उपवर्गीकरण विरोधात

# सकल चर्मकार समाज आळंदीत एकवटला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महाराष्ट्र शासनाने मागासवर्गीय समाजातील आरक्षणाचे अ-ब-क-ड उपवर्गीकरणाचा प्रस्ताव पुढे आणला असून या निर्णयाला महाराष्ट्रातील सकल चर्मकार समाजाकडून तीव्र विरोध व्यक्त करण्यात येत आहे. या उपवर्गीकरणाच्या विरोधात महाराष्ट्रभरात जनजागृती व प्रचार-प्रसार करण्याचा निर्धार मुख्य प्रवर्तक विजय घासे यांनी नुकत्याच झालेल्या आळंदी येथील राज्यव्यापी बैठकीत व्यक्त केला. शासनाच्या प्रस्तावामुळे अनुसूचित जातींमध्ये संभ्रम निर्माण होत असून समाजात तेढ वाढविण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

चर्मकार समाजाचे म्हणणे आहे की, शासनाने हे उपवर्गीकरण धोरण नेमके काय आहे, याचा समाजावर काय परिणाम होईल, याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती समाजासमोर मांडलेली नाही. कोणताही अभ्यास, सखोल चर्चा किंवा समाज बांधवांचे मत जाणून न घेता शासन हा निर्णय घाईत लागू करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप बैठकीत करण्यात आला. त्यामुळे समाजामध्ये अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले असल्याचे वक्त्यांनी सांगितले.

या उपवर्गीकरणामुळे मागासवर्गीयांच्या सुमारे ५९ जातींमध्ये आरक्षण विभाजन करण्याचा प्रयत्न सुरू असून, यामुळे



मांग, महार, चांभार यांसारख्या समाजांमध्ये फूट पाडण्याचा कट असल्याची भावना समाजातून व्यक्त होत आहे. सामाजिक ऐक्य धोक्यात आणणारे आणि समाजविरोधी ठरणारे हे धोरण असल्याचे आरोप समाजाकडून करण्यात आले.

समाजहिताच्या दृष्टीने हा विषय अत्यंत गंभीर असून शासनाने तात्काळ हा निर्णय थांबवून सकल चर्मकार समाजाशी चर्चा करावी, अशी ठाम मागणी समाज बांधवांकडून करण्यात आली. शासनाने एकतर्फी निर्णय न घेता सर्व घटकांशी संवाद साधूनच पुढील भूमिका घ्यावी, असे मत अनेक मान्यवरांनी मांडले.

उपवर्गीकरणाच्या विरोधातील या बैठकीचे आयोजन समस्त हराळे वैष्णव समाज धर्मशाळा संस्थानचे अध्यक्ष तथा युवा नेते बाबा कांबळे यांनी देवाची आळंदी येथे केले होते. राज्यभरातील विविध जिल्ह्यांतून मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित राहिल्याने ही बैठक ऐतिहासिक ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

बैठकीदरम्यान शासनाच्या निर्णयाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करत लवकरच मुंबई येथे राज्यव्यापी आंदोलन उभारले जाईल, अशी घोषणा सकल चर्मकार समाजाच्या वतीने करण्यात आली. समाजाच्या हक्कांसाठी एकजुटीने संघर्ष करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

या राज्यव्यापी बैठकीस अध्यक्षस्थानी बबनराव घोलप तर तसेच प्रमुख अतिथी म्हणून अखिल भारतीय रविदासिया धर्म संघटनेचे संस्थापक सुखदेव महाराज वाघमारे, ज्येष्ठ नेते मा. आ. बाबुराव माने, मा. आ. भाऊसाहेब कांबळे, ॲड. नारायणराव गायकवाड, राम कदम, संजय खामकर, चंद्रकांत कांबळे, सूर्यकांत गवळी, सुरेश पोटे आदी मान्यवर उपस्थित होते.

# आंबेगावच्या पूर्व भागात हातभट्टी, ताडी विक्रीचे वाढते प्रमाण चिंताजनक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वळती :** पुणे जिल्ह्यात नुकत्याच घडलेल्या विषारी दारू दुर्घटनेने संपूर्ण राज्याला हादरवून सोडले आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात सुरू असलेल्या हातभट्टी दारू आणि ताडी विक्रीबाबत नागरिकांमधून तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे.

पूर्व भागातील काही गावांमध्ये हातभट्टी दारू निर्मिती व विक्री सुरू असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत आहेत. या अवैध व्यवसायामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असून नागरिकांच्या आरोग्यालाही गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. भेसळयुक्त किंवा निकृष्ट दर्जाच्या दारूमुळे जीवितहानी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तसेच परवानाधारक ताडी विक्री केंद्रांवर विक्रीसाठी ठेवण्यात येणाऱ्या मालाची नियमित तपासणी करूनच विक्रीस परवानगी द्यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. ताडीची गुणवत्ता, साठवणूक, स्वच्छता व नियमांचे पालन याबाबत राज्य उत्पादन शुल्क विभागाने वेळोवेळी पाहणी करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. पुणे जिल्ह्यातील दुर्दैवी घटनेतून धडा घेत राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि पोलिस प्रशासनाने संयुक्तपणे विशेष मोहीम राबवून हातभट्टी दारू अड्डे, अवैध मद्यविक्री केंद्रे तसेच नियमभंग करणाऱ्या ताडी विक्री केंद्रांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. विशेष म्हणजे आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील ग्रामीण परिसरात काही ठिकाणी अवैध मद्यविक्रीबाबत नागरिकांकडून वारंवार तक्रारी केल्या जात असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे कोणतीही अनुचित घटना घडण्यापूर्वीच संबंधित यंत्रणांनी प्रभावी उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत.नागरिकांच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी अवैध हातभट्टी व्यवसायावर कायमस्वरूपी आळा घालणे आणि ताडी विक्रीवर प्रभावी नियंत्रण ठेवणे ही काळाची गरज असल्याची भावना सर्वसामान्य नागरिकांमधून व्यक्त होत आहे.




## महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या डिझेल बचतीच्या अनुषंगाने उपाययोजना

द • ख • ल

**पुणे :** माहे मे २०२६ पासून पेट्रोल, डिझेल व सीएनजी इंधनामध्ये झालेल्या दरवाढीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या पुणे विभागाने आगार पातळीवर डिझेल बचतीसाठी उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत, विभागात १०५ इलेक्ट्रिक वाहने असून दैनंदिन ४६ हजार २३२ किलोमीटर चालनात येतात, त्यामुळे जवळपास १० हजार ९८१ लिटर डिझेलची दैनंदिन बचत होत आहे. येत्या काळात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर पूर्णक्षमतेने करण्याबाबत नियोजन करण्यात येत आहे, अशी माहिती विभाग नियत्रंक अरुण सिया यांनी दिली आहे. पुणे विभागातील आगारांना आगार पातळीवर उद्दिष्टे निश्चित करुन देण्यात आलेली आहे. प्रत्येक आगाराने मागील वर्षाच्या तुलनेत १ ने किलोमीटर प्रति १०लिटरमध्ये (केपीटीएल) वाढ करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. ज्या फेऱ्यांचे उत्पन्न कमी झालेले आहेत त्या फेऱ्या तात्पुरत्या स्वरुपात स्थगित करण्यात आल्या आहेत. विभाग किंवा आगार पातळीवर चालकांच्या केपीटीएलमध्ये वाढ होण्याकरीता त्यांना प्रबोधन करण्यात येत आहे तसेच वरिष्ठ पातळीवरुन मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत, अशी माहिती श्री. सिया यांनी दिली आहे.

## लोणी सोसायटीच्या चेअरमनपदी रुक्मिणी वाळुंज व्हाईस चेअरमनपदी तान्हाजी वाळुंज यांची निवड

**लोणी धामणी :** आंबेगाव तालुक्यातील लोणी सोसायटीच्या चेअरमनपदी रुक्मिणी वाळुंज तर व्हाईस चेअरमनपदी तान्हाजी वाळुंज यांची बिनविरोध निवड झाली आली. मावळते चेअरमन ज्योती जगन लंके व व्हाईस चेअरमन खंडू भिवा माकरे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागांवर ही निवड प्रक्रिया पार पडली. निवडीनंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपसरपंच राजेंद्र गायकवाड, माजी चेअरमन शरद वाळुंज, दीपक वाळुंज, उद्योजक महेंद्र वाळुंज, जयेश वाळुंज, राजू वाळुंज, बाबाजी वाळुंज आदी मान्यवर उपस्थित होते. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे परिसरातून अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या निवडीमुळे सोसायटीच्या विकासकामांना अधिक गती मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.


चेअरमन


व्हा. चेअरमन

## महिलांच्या कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया नियमितपणे व्हावेत

**लोणी धामणी :** आंबेगाव तालुक्यात सीझर (उशीरअॅशरप) झालेल्या स्त्री लाभार्थींना कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया नियमितपणे व्हावेत अशी मागणी आंबेगाव तालुका राष्ट्रवादी ( श .प. पक्ष.) युवक अध्यक्ष विशाल वाबळे यांनी केली आहेवाबळे यांनी जिल्हाधिकारी पुणे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आंबेगाव तालुक्यात सीझर झालेल्या स्त्री लाभार्थ्यांना कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया नियमितपणे उपलब्ध होत नसल्याची गंभीर समस्या समोर आली आहे. यामुळे अनेक महिलांना मानसिक, आर्थिक तसेच आरोग्यविषयक अडचणींचा सामना करावा लागत असल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे. वाबळे यांनी या संदर्भात २९ ऑगस्ट २०२५ रोजी तालुका आरोग्य अधिकारी तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी यांना लेखी निवेदन देण्यात आले होते. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने लाभार्थी महिलांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. ग्रामीण भागातील महिलांना शस्त्रक्रियेसाठी वारंवार दवाखान्याचे फेरे मारावे लागत असून आर्थिक खर्चासह शारीरिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. शासनाच्या कुटुंब कल्याण योजनेचा लाभ पात्र महिलांना वेळेवर मिळत नसल्याने आरोग्य विभागाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. संबंधित आरोग्य विभागाने तातडीने लक्ष घालून आंबेगाव तालुक्यात सीझर झालेल्या महिलांसाठी कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया नियमित व सुरळीतपणे सुरू कराव्यात, तसेच यामधील अडचणी दूर करून योग्य नियोजन करावे, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष विशाल वाबळे यांनी जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडे केली आहे.

## चारंगबाबा महाराज यात्रा उत्सव व बैलगाडा शर्यती उत्साहात संपन्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :** – शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथे तीन दिवशीय श्री चारंगबाबा महाराज यात्रा उत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य बैलगाडा शर्यती मोठ्या उत्साहात व जल्लोषपूर्ण वातावरणात संपन्न झाल्या. माळवदे वस्ती, वाळुंज,वागदरे वस्ती परिसरात आयोजित या शर्यतींना पंचक्रोशीतील हजारो नागरिक, शेतकरी व बैलगाडा शौकिनांनी मोठी उपस्थिती लावली.

यात्रा उत्सवाच्या निमित्ताने पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या बैलगाडा शर्यतींमध्ये विविध गावांतील स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. उत्कृष्ट नियोजन, शिस्तबद्ध आयोजन आणि उत्साही वातावरणामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.घाटाचा महाराजा चा मानकरी दुर्योधन मामा शिंगाडे हे ठरले



स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक रोख बक्षिसे व ट्रॉफी प्रदान करण्यात आल्या. प्रथम क्रमांकासाठी ५१,००१, द्वितीय क्रमांकासाठी ४१,००१ तर तृतीय क्रमांकासाठी २१,००१ चे बक्षीस ठेवण्यात आले होते. तसेच फळीफोड स्पर्धांसाठीही विशेष बक्षिसांची व्यवस्था करण्यात आली होती. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामस्थ, युवक मंडळे, आयोजक मंडळ तसेच देणगीदारांनी मोलाचे सहकार्य केले. उपस्थितांनी बैलगाडा शर्यतींचा थरार अनुभवत पारंपरिक ग्रामीण संस्कृतीचे जतन करणाऱ्या या उपक्रमाचे कौतुक केले.

कार्यक्रमाच्या शेवटी विजेत्यांचा सत्कार करण्यात आला व पुढील वर्षीही अधिक भव्य स्वरूपात यात्रा उत्सव आणि बैलगाडा शर्यती आयोजित करण्याचा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला.यावेळी बक्षीस वितरणासाठी शिरूर पंचायत समिती सदस्या कांचनताई राजेश सांडभोर,सुनील वागदरे, गुलाब वागदरे, सामाजिक कार्यकर्ते राजेश सांडभोर,आबासाहेब वागदरे, वैभव बच्चे,माजी उपसरपंच उत्तम मामा जाधव, संतोष जाधव,कैलासराव बच्चे,रामदास इचके ग्रा.पं सदस्य,रामदास माळवदे मा.ग्रा. सदस्य, बाळासाहेब जाधव व अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. वस्तीवरील सर्वच तरुण मित्र मंडळींनी यात्रोत्सव शांततेत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडावा म्हणून योग्य ते सहकार्य केल्याने यात्रोत्सव व बैलगाडा शर्यती यशस्वी वाशांतेत पार पडल्या.

## रांजणी येथील १७ वर्षीय कृष्णल गायकवाड बेपत्ता

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**वळती :** आंबेगाव तालुक्यातील रांजणी येथील कृष्णल सोमनाथ गायकवाड (वय १७) हा युवक ३ मे २०२६ रोजी सकाळी घरातून निघून गेल्यापासून बेपत्ता झाला आहे. याबाबत मंचर पोलीस ठाण्यात हरवल्याची नोंद करण्यात आली आहे. कृष्णल हा भैरवनाथ विद्यालय, शिगवे येथे इयत्ता बारावीमध्ये शिक्षण घेत असून तो रांजणी येथे आपल्या कुटुंबासोबत राहत होता. घरातून निघाल्यानंतर त्याचा परिसरात तसेच नातेवाईकांकडे शोध घेण्यात आला. मात्र त्याचा अद्याप कोणताही ठावठिकाणा लागलेला नाही. बेपत्ता कृष्णलची उंची सुमारे ४ फूट ९ इंच असून केस काळे व लहान आहेत. रंग सावळा असून तो मराठी भाषा बोलतो. घरातून जाताना त्याने पिवळ्या रंगाचा शाळेचा शर्ट, राखाडी रंगाची फुल पॅन्ट आणि तपकिरी रंगाच्या चप्पला परिधान केल्या होत्या. कृष्णल गायकवाड याच्याबाबत कोणास काही माहिती मिळाल्यास तात्काळ मंचर पोलीस ठाण्याशी किंवा त्याच्या कुटुंबीयांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## शिरूर पोलिसांची धडाकेबाज कारवाई,२४ लाखांचा चोरीचा मुद्देमाल हस्तगत, आरोपी जेरबंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :-** पुणे जिल्ह्यातील शिरूर पोलिस स्टेशनच्या डी.बी. पथकाने उत्कृष्ट तपासकौशल्य दाखवत तब्बल २४ लाख रुपये किंमतीचा चोरीचा मुद्देमाल हस्तगत करून एका आरोपीस अटक केली आहे. या कारवाईमुळे परिसरातील घरफोडीच्या गुन्ह्याचा यशस्वी उलगडा झाला आहे.

शिरूर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शिरूर तालुक्यातील आनंद सोसायटी परिसरातील एका घरातून फेब्रुवारी २०२६ दरम्यान सोन्या-चांदीचे दागिने, चांदीची भांडी व इतर मौल्यवान वस्तू चोरीस गेल्या होत्या. याप्रकरणी फिर्यादी यांनी शिरूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक शुभम चव्हाण यांनी तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू केला. तपासादरम्यान आरोपी विलास आनंदा खोसडे (रा. भायेगाव, ता. मुखेड, जि. नांदेड) याचा ठावठिकाणा मिळाल्यानंतर पोलिस पथकाने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर त्याच्याकडून सुमारे ७ किलो १३४ ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने व वस्तू तसेच ३६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा एकूण २४ लाख रुपये किंमतीचा चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक संदीप सिंह गिल,अपर पोलिस अधीक्षक डॉ. शुभमकुमार सो, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत ढोले आणि पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या मोहिमेत पोलिस उपनिरीक्षक शुभम चव्हाण यांच्यासह डी.बी. पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या यशस्वी कारवाईबद्दल शिरूर पोलिसांच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.




## गावडेवारी डेरेआंबा एसटी बस थांबा लगत विहिरीस कठडे बसवण्याची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर :** अवसरी खुर्द ते गावडेवाडी रस्त्यालगत डेरेआंबा बस थांबाजवळ कठडे नसलेली विहिर आहे, विहीर रस्त्या लगत असल्याने रात्रीच्या वेळी दोन मोठी वाहने समोरासमोर आल्यास मोठे दुर्घटना होऊ शकते. त्यामुळे संबंधित विभागाने विहिरीला कठडे किंवा संरक्षण जाळी बसवावी अशी मागणी गावडेवाडीचे माजी उपसरपंच किरण गावडे यांनी केली आहे. अवसरी खुर्द, गावडेवाडी, अवसरी बुद्रुक हा रस्ता १५ ते २० वर्षांपूर्वी अरुंद होता त्यावेळी वाहनांची संख्याही कमी होती. आता वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे या रस्त्यावर पहाटे पाच ते रात्री एक वाजेपर्यंत अडीच ते तीन हजार वाहनांची ये-जा असते या रस्त्यावरून भीमाशंकर साखर कारखान्याचे ऊसाच्या साखरेचे ट्रक, दुधाचे टँकर, ट्रॅक्टर, खडी वाहतूक करणारे हायवा, ट्रक, भाजीपाल्याचे टेम्पो, खाजगी वाहने, एसटी बस यांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते पूर्वी ढेरेआंबा येथील वीहिर शेतात होती. मात्र रस्ता वाढत वाढत चालल्याने शेतातील विहीर रस्त्यालगत आल्याने रात्रीच्या वेळी दोन वाहने समोरासमोर आल्यास मोठे दुर्घटना होऊ शकते. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने डेरे आंबा येथील विहिरीला संरक्षण जाळी किंवा कठडे बसवावे अशी मागणी वाहन चालक करत आहे.



## वन्यजीवांची तहान भागवत साजरा केला लग्नाचा वाढदिवस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री


**जेजुरी :** नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा लताताई दोडके आणि सामाजिक कार्यकर्ते दिलीप दोडके यांनी आपल्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त अनोखा सामाजिक उपक्रम राबवत जयाद्री अभयारण्यात वन्यजीवांची तहान भागवून वाढदिवस साजरा केला.

दरवर्षीप्रमाणे यंदाही पारंपरिक पद्धतीला फाटा देत त्यांनी जयाद्री डोंगर परिसरातील हरीण, सायाळ, कोल्हे, रानडुक्करे, मोर, विविध पक्षी तसेच इतर वन्यजीवांसाठी पाणी, चारा आणि धान्य उपलब्ध करून दिले. या उपक्रमात सुप्रभात जयाद्री ग्रुपचे सदस्यही सहभागी झाले होते.

सध्या वाढत्या उन्हामुळे डोंगराळ भागात पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली असून, अन्न व पाण्याच्या शोधात अनेक वन्यजीव मानवी वस्तीकडे येत आहेत. त्यामुळे रोड किलिंग, भटक्या कुत्र्यांचे हल्ले आणि इतर कारणांमुळे अनेक प्राण्यांचा जीव जात असल्याची चिंताजनक परिस्थिती आहे. ही बाब लक्षात घेऊन दोडके दांपत्याने डोंगर परिसरात टँकरद्वारे पाणीपुरवठा करत वन्यजीवांसाठी पाणवठे भरले तसेच धान्य व चारा वाटप केले.

यावेळी लताताई दोडके म्हणाल्या, वाढदिवस किंवा इतर आनंदाचे क्षण पर्यावरण आणि वन्यजीव संवर्धनासाठी उपयोगात आणले तर समाजात सकारात्मक संदेश जाईल. प्रत्येकाने अशा उपक्रमांद्वारे पर्यावरण संरक्षणासाठी योगदान द्यावे.

यापूर्वीही दिलीप दोडके यांनी मित्रमंडळींसह रेल्वे स्वच्छता अभियान राबवून वाढदिवस साजरा केला होता. त्यांच्या या सामाजिक बांधिलकीचे जयमल्हार फाउंडेशनचे अध्यक्ष विशाल बारभाई यांनी कौतुक केले.



या उपक्रमात, प्राचार्य ताकवले सर दरेकर सर , नगरसेवक तानाजी खोमणे, डॉ. आगम, महेश पेशवे, नंदू सोनवणे, चंद्रकांत नलवडे, संदीप झगडे, किसन झगडे, चांदेकर, गणेश सोनवणे, बाळासाहेब जगताप, गजानन बयास, राजेंद्र पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

## कुकडी प्रकल्प डावा कालवा वितरिका स्तरीय पाणीवापर संस्था महासंघाची नवीन कार्यकारणी जाहीर



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :** - कुकडी प्रकल्प डावा कालवा वितरिका स्तरीय पाणीवापर संस्था महासंघ, नारायणगाव या संस्थेच्या सन २०२६-२७ या वर्षासाठी नवनिर्वाचित कार्यकारिणी गठित करण्यात आली असून शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नी मागील २० वर्षांपासून सातत्याने आपल्या लेखणीतून आवाज उठविणारे वरिष्ठ पत्रकार प्रा.सुभाष अण्णा शेटे यांच्या उत्कृष्ट कार्याची दाखल घेत त्यांची महासंघाच्या तज्ञ संचालक पदी नियुक्ती करण्यात आल्याची माहिती कार्याध्यक्ष प्रकाश वायसे यांनी दिली. सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार व स्वागत समारंभ नुकताच निघोज ता.पारनेर येथे उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुकडी कालवा सदस्य प्रकाश वायसे हे होते. यावेळी महासंघाच्या विविध पदांवरील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. अध्यक्षपदी दिलीपराव मदने यांची तर कार्याध्यक्षपदी प्रकाश वायसे यांची निवड झाली. उपाध्यक्षपदी पांडुरंग ढवळे यांची तर कार्यकारी संचालकपदी रविंद्र शिंदे व रघुनाथ निचित यांची निवड करण्यात आली.

संचालक मंडळात चंद्रकांत लामखडे, अमोल कातोरे, संपतराव पानमंद, अमृताशेठ रसाळ, बाळासाहेब शिंदे,रामभाऊ शेळके, सुभाष शेटे,साहेबराव लोखंडे,प्रविण गायकवाड तर सचिवपदी अरुण सोमवंशी यांची निवड करण्यात आली. यावेळी शेतकऱ्यांसाठी पाणी वेळेवर कसे मिळेल, पाणी पट्टी वसुली व परतावे वेळेत करणे संस्थेचे आर्थिक लेखापरीक्षण तसेच चाऱ्यांची दुरुस्ती,भराव करणे, पाणी वापर संस्थांना पाणी मिळणे तसेच जलसिंचन योजना राबवत पाण्याची बचत करण्यासाठी मार्गदर्शन करणे या साठी काम करणे आवश्यक असल्याचे मत वायसे यांनी व्यक्त केले.कार्यक्रमास पाणीवापर संस्थांचे पदाधिकारी, चेअरमन, संचालक मंडळ सदस्य तसेच परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## द•ख•ल

### लोणी व्यंकनाथ येथील भूमिपुत्रांचा सेवानिवृत्तीबद्दल सन्मान सोहळ्याचे आयोजन

**लिंपणगाव :** आयुष्यभर विविध क्षेत्रांत प्रामाणिकपणे सेवा बजावून समाजासाठी मोलाचे योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान व गौरव सोहळा ग्रामस्थांच्या वतीने रविवार, दि. १ जून २०२६ रोजी सायंकाळी सात वाजता लोणी व्यंकनाथ येथील सह्याद्री हॉटेल येथे भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आला आहे. सदरचे आयोजन हे युवक व ग्रामस्थांकडून करण्यात आल्याचे संयोजकांकडून सांगण्यात आले. युवक कार्यकर्ते या सोहळ्यात देशसेवा, शिक्षणक्षेत्र आणि औद्योगिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी सत्कार करण्यात येणार आहे. प्रामुख्याने भारतीय सैन्य दलात प्रदीर्घ काळ देशसेवा करून निवृत्त झालेले श्री. नितीन शिवाजी काकडे, शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान देणारे श्री. डी. आर. आबा काकडे, देवदैठण साखर उद्योग कारखान्यात औद्योगिक क्षेत्रात उल्लेखनीय सेवा बजावणारे .श्री. शिवाजी अण्णा जाधव तसेच शिक्षण क्षेत्रातील आदर्श कार्यामुळे ओळखले जाणारे.श्री.रामदास साळवे सर (मुख्याध्यापक, घोटवी), .श्री.रामदास फटाकडे सर (मुख्याध्यापक, निमगाव खालू) आणि .श्री.राजेंद्र गायकवाड सर (उपशिक्षक, वांगदरी) यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. पत्रकार व राज्य प्रसिद्धीप्रमुख शिक्षकेतर महासंघ मुंबई. नंदकुमार कुरुमकर सर, या सर्व मान्यवरांनी आपल्या कार्यकाळात निष्ठा, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यपरायणतेचा आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या सेवेचा लाभ हजारो विद्यार्थी, नागरिक, शेतकरी आणि समाजातील विविध घटकांना झाला आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घेत हा सोहळा आयोजित केला आहे. दरम्यान गावच्या सामाजिक, शैक्षणिक आणि विकासात्मक वाटचालीत या सर्व मान्यवरांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे राहिले आहे.

### घोटणला शेतकऱ्यांचा रास्ता रोको



**शेवगाव :** शेवगाव तालुक्यातील घोटण येथे शेवगाव-पैठण मार्गावर शनिवारी सकाळी वीजपुरवठ्याच्या प्रश्नावर संतप्त शेतकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन केले. सुमारे दोन तास चाललेल्या या आंदोलनानंतर महावितरणकडून लेखी आश्वासन मिळाल्याने आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले. गेल्या काही दिवसांपासून शेतीपंपांसाठी केवळ सहा तास वीजपुरवठा केला जातो. शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती. अपुऱ्या वीजपुरवठ्यामुळे ऊस पिकांना पुरशे पाणी मिळत नाही. अनेक भागांमध्ये उसाची पिके जळण्याच्या स्थितीत आहे. येत्या दोन दिवसांत शेतीसाठी आठ तास नियमित वीजपुरवठा सुरळीत करण्याचा प्रयत्न करण्यात येईल, असे लेखी आश्वासन महावितरणकडून दिले. त्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आल्याचे शेतकरी नेते संजय टाकळकर यांनी सांगितले. यावेळी पोलिसांनी चोक बंदोबस्त ठेवला होता. या आंदोलनात राऊसाहेब लवांडे, संजय टाकळकर, बाळासाहेब फटांगडे, अशोक भोसले, अंबादास भागवत, हरिभाऊ कब्बाडी, सुधीर पवार, अमोल देवढे, लक्ष्मण टाकळकर, कुंडलीत घुगे, नामदेव घुगे, रणजित घुगे, बापू शेळके, ज्ञानेश्वर कुलट, गोकूळ भागवत, रामहरी घुले, महादेव शिंदे, तुकाराम थोरवे, भारत निकम, संभाजी क्षिरसागर, बाबासाहेब गाढे, भारत मोटकर, अनिल शेळके यासह शेतकरी सहभागी झाले होते.

### ३६० वा साप्ताहिक शिव अभिषेक सोहळा संतोषकुमार दहातोंडे यांच्या हस्ते संपन्न



**शेवगाव :** शेवगाव शहरांमध्ये गेल्या आठ वर्षापासून दर शुक्रवारी वेगवेगळ्या मान्यवरांच्या हस्ते साप्ताहिक अभिषेक होत असतो. दि २९.०५.२०२३ चा अभिषेक हिंदवी स्वराज्याचे पहिले सरसेनापती माणकोजी दहातोंडे यांचे वंशज संतोषकुमार दहातोंडे यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी शिवअभिषेक समितीच्या वतीने त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना सन्मान चिन्ह देऊन समितीचे चंद्रकांत महाराज लबडे यांनी सन्मानित केले. हिंदवी स्वराज्याचे पहिले सरसेनापती माणकोजी दहातोंडे यांचे नाव काही वर्षापूर्वी बऱ्याच लोकांनी ऐकलेही नव्हते. परंतु श्री संतोषकुमार दामोधर दहातोंडे यांनी हे नाव आज घराघरात पोहोचवले आहे. सरसेनापती माणकोजी दहातोंडे यांच्यावर ऐतिहासिक व्हिडिओ बनवणे, ऐतिहासिक पोस्ट बनवणे, त्यांचे चित्र बनवणे, रक्तदान शिबिर आयोजित करणे, शिवराज्याभिषेक सोहळा आयोजित करणे, ऐतिहासिक स्थळांना भेटी देणे, ॊिळरश्र ाशवळर व जमेल त्या सर्व माध्यमातून त्यांनी सरसेनापती माणकोजी दहातोंडे यांचा इतिहास जगासमोर आणला आहे. आपल्या सर्व शिवप्रेमी साठी अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी लोकवर्गणीतून सरसेनापती माणकोजी दहातोंडे यांची ऐतिहासिक कमान उभी केली.

### मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात सारोळा सोमवंशी प्रथम

**देवदैठण :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात येळपणे गटातील सारोळा सोमवंशी गावाने श्रीगोंदा तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. 'लोकसहभागातून होणार ग्रामीण समृद्धी' हे प्रमुख सूत्र डोळ्यांसमोर ठेवून राबवलेल्या या अभियानात श्रीगोंदा तालुक्यातील सारोळा सोमवंशी ग्रामपंचायतीने प्रशासकीय पारदर्शकता आणि विकासकामांच्या जोरावर तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. तर या स्पर्धेत कोळगाव ग्रामपंचायतीने द्वितीय आणि मुंगुसगाव ग्रामपंचायतीने तृतीय क्रमांक मिळविला. शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत या अभियानांतर्गत विविध कडक निकषांच्या आधारे या 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' अंतर्गत ग्रामपंचायतींचे काटेकोर मूल्यांकन करण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत वैयक्तिक आणि सार्वजनिक योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे. आर्थिक शिस्त व पारदर्शकता, ग्रामपंचायत दप्तर अद्ययावत असणे, करवसुलीचे शंभर टक्के उद्दिष्ट आणि डिजिटल कारभार, स्वच्छ भारत अभियान, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, वृक्षारोपन, सौर ऊर्जेचा वापर व दर्जेदार रस्ते निर्मिती, गावाच्या निर्णय प्रक्रियेत आणि ग्रामसभांमध्ये ग्रामस्थांचा, विशेषतः महिलांचा सक्रिय सहभाग या सर्वच आघाड्यांवर उत्कृष्ट कामगिरीची नोंद घेण्यात आली. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान सुरू झाल्यापासून गावचे युवा नेतृत्व राहुल आढाव यांच्या नेतृत्वाखाली उपसरपंच संदीप ननवरे, ग्रामपंचायत सदस्य शितल लोंढे, सविता नवले, सुप्रिया आढाव, महेबूबी सय्यद, अंजाबापू कवाष्टे, ग्रामसेवक स्वप्निल आंबेटकर आदींनी विशेष मेहनत घेतली.

# नागमठाणला उष्णतेच्या तडाख्याने कांदा सडला

## लाखोंचे नुकसान; शासनाने अनुदान द्यावे शेतकऱ्यांची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मिरजगाव :** कर्जत तालुक्यातील नागमठाण (खुळ्याचा गोठा) येथील शेतकरी उमाजी अण्णा खुळे यांच्या शेतातील साठवलेला कांदा वाढत्या अतिउष्णतेच्या तडाख्याने मोठ्या प्रमाणात सडला असून खराब झाला आहे.

शेतकरी खुळे यांच्या शेतात काढणी करून साठवलेल्या कांद्यापैकी तब्बल ४०० हून अधिक गोण्या कांदा सडला आहे. यामध्ये त्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. या नैसर्गिक नुकसानीचे पाहणी करून शासनाने सडलेल्या कांद्याची नुकसान भरपाई म्हणून अनुदान स्वरूपात मदत द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

**कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान !**

तालुक्यात गेल्या दीड महिन्यांपासून कायम असलेल्या तीव्र उष्णतेच्या लाटेचा फटका कांदा उत्पादक शेतकऱ्यांना बसत आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. वाढत्या तापमानाचा थेट परिणाम उन्हाळी कांद्याच्या उत्पादनावर व साठवणुकीवर होत असून, उभ्या पिकासोबतच काढून ठेवलेला कांदाही खराब होऊ लागल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

यंदा राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला असून बाजारात कांद्याचे दर उत्पादनापेक्षाही खाली गेल्याने वाहतूक आणि मजुरीचा खर्चही निघत नाही. अवकाळी पाऊस आणि वाढत्या उत्पादन खर्चामुळे आधीच अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्याला वारंवार बदलणाऱ्या निर्यात बंदीच्या धोरणाचा मोठा फटका आधीच बसला आहे. मागील काही महिन्यापासून राज्यात उष्णतेने कहर केला आहे. अतिउष्णतेमुळे कांदा पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहेत. शासनाने नाफेड खरेदी कांद्याला १५ रुपये ८० पैसे भाव जाहीर केला आहे. अनुदानही देण्याचा निर्णय केला असून मात्र, बाजारात कांद्याला आज भाव मिळेल, उद्या भाव मिळेल, म्हणून मोठ्या अपेक्षेने शेतकऱ्यांनी कांदा साठवून केली



आहे. आजमितिला शेतकरी मेटाकुटीस आला आहे.

नागमठाण खुळ्याचा गोठा येथील शेतकरी उमाजी अण्णा खुळे यांनी आपल्या शेतात एक हेक्टर कांदा पिकाची लागवड केली होती. त्यांना अडीचशे क्विंटल कांदा पिकाचे उत्पादन मिळाले. लागवडीपासून काढणी पर्यंतचा खर्च आणि कांद्याला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी खुळे यांनी बाजार भावाची वाट पाहत काही निवडक कांदा मार्केटला पाठवला. त्यांना तीन रुपये ते चार रुपये दर मिळाला होता.

शेतात वाहन जाण्यास अडचणी असल्याने रस्त्याअभावी उर्वरित कांदा शेतातच साठवण करून ठेवला आहे. तो कांदा वाढत्या उष्णतेमुळे पूर्णता सडला गेला आहे. त्यामध्ये लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. अशीच परिस्थिती इतरही शेतकऱ्यांची झाली आहे. तर अनेक शेतकऱ्यांच्या वखारी मधील कांदा देखील उष्णतेमुळे मोठ्या प्रमाणात सडला आहे. सडलेल्या कांद्याबाबत शासनाने नैसर्गिक नुकसान म्हणून अनुदान द्यावे, या शेतकऱ्यांच्या मागणीबाबत विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे तसेच कर्जत जामखेड मतदारसंघाचे आमदार रोहित पवार यांनी विशेष लक्ष घालून शेतकऱ्यांच्या या प्रश्नाला वाचा फोडावी, अशी मागणी शेतकऱ्यांमधून केली जात आहे.

पाणी वापर महासंघाची नवनिर्वाचित कार्यकारीणी जाहीर

## अध्यक्ष दिलीप मदगे : प्रकाश वायसे कार्याध्यक्ष

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निघोज :** कुकडी प्रकल्प डावा कालवा वितरीका स्तरीय पाणीवापर संस्था महासंघ नारायणगाव २०२६-२७ या वर्षासाठी नवनिर्वाचित कार्यकारिणी निवड करण्यात आली. पाणीवापर महासंघ अध्यक्षपदी दिलीप मदगे व कार्याध्यक्ष पदावर प्रकाश वायसे यांच्यासह संचालक मंडळाची निवड बिनविरोध करण्यात आली. निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्थेच्या सभागृहात कुकडी कालवा समीतीचे सदस्य प्रकाश वायसे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक घेण्यात आली. यावेळी उपाध्यक्ष पदी पांडुरंग ढवळे, कार्यकारी संचालकपदी रवींद्र शिंदे, रघुनाथ निचीत यांची निवड झाली.



पाणीवापर महासंघ संचालक पदावर संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत लामखडे, उपाध्यक्ष तथा मळगंगा कंट्रक्शन कंपनीचे अध्यक्ष अमृताशेठ रसाळ, प्रगतीशील शेतकरी अमोल कातोरे, संपतराव पानमंद, बाळासाहेब शिंदे, रामभाऊ शेळके, शिरुर तालुका ग्रामीण पत्रकार संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक सुभाष शेटे, शिरुर ग्रामीण पत्रकार संघाचे पदाधिकारी साहेबराव लोखंडे यांची बिनविरोध निवड झाली. अध्यक्ष दिलीप मदगे व कार्याध्यक्ष प्रकाश वायसे यावेळी म्हणाले की, पाणी वापर संस्थांचा कारभार कार्यक्षमपणे सुरु राहण्याची गरज आहे. कुकडी डावा कालवा असो किंवा शिरुर तालुक्यातील मिना कालवा असो सरकारच्या माध्यमातून या योजनेवर मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून विकासकामे होत आहे. या योजनेचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाल्यास पाण्याची उपलब्धता कमी होईल याचा अर्थ सर्वाधिक शेतकऱ्यांना पाणी अग्रक्रमाने दिले जाईल मात्र जी पाणीवापर संस्था अतिशय चांगले काम करुण पाटबंधारे विभागाला सहकार्य करील त्याच पाणीवापर संस्थेला पाणी मिळण्यासाठी अग्रक्रम दिला.

## श्रीगोंदा तालुक्यात 'हातभट्टी' राजरोस!

दादा सोनवने । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** नगर जिल्ह्यातील पांगरमल येथे विषारी दारूमुळे झालेली जीवितहानी अजून लोक विसरलेले नाहीत. त्यातच फुगेवाडी परिसरातील विषारी दारू प्रकरणाने राज्य हादरले. निष्पाप लोकांचे जीव गेले, संसार उद्ध्वस्त झाले; पण या घटनांनंतरही श्रीगोंदा तालुक्यात हातभट्टीचा काळाबाजार मात्र पूर्वीइतकाच बिनधास्त सुरू असल्याची संतापजनक चर्चा आता गावोगावी रंगू लागली आहे.

तालुक्यातील अनेक गावांमध्ये अक्षरशः चव्हाट्यावर हातभट्टी विकली जात असल्याचे नागरिक उघडपणे बोलू लागले आहेत. दारू मिळत नाही अशी तक्रार कुणी करत नाही; उलट कोणत्या वाडीत, कोणत्या गल्लीमध्ये आणि कोणत्या वेळेला मिळते याची माहिती पोरांनाही आहे, अशी उपरोधिक प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत. हे जर सर्वसामान्यांना माहिती असेल, तर राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि स्थानिक पोलीस प्रशासनाला माहिती नाही का? असा रोखठोक सवाल उपस्थित होत आहे.

स्थानिक पातळीवर तयार होणारी हातभट्टी नगर जिल्ह्यातून पुणे जिल्ह्याकडे पाठवून तेथे तिचे बॉटलिंग होत असल्याची धक्कादायक माहिती समोर येत असल्याने या रॅकेटची व्याप्ती किती मोठी आहे, याची चर्चा सुरू झाली आहे. दारूचा व्यवसाय नाही, हा तर मृत्यूचा पुरवठा आहे, अशी संतप्त भावना नागरिक व्यक्त करत आहेत. विशेष म्हणजे, श्रीगोंदा पोलिसांच्या आशीर्वादाशिवाय हा धंदा शक्यच नाही, अशी कुजबूज आता उघड चर्चेत बदलत असल्याचे चित्र आहे. काही ठिकाणी कारवाया होतात; पण त्या केवळ दिखावा तर नाहीत ना? मोठ्या माशांना अभय आणि छोट्या विक्रेत्यांवर कारवाई, असा आरोपही नागरिक करत आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभागाची भूमिका तर अधिकच संशयाच्या भोवऱ्यात सापडत आहे. पांगरमल आणि फुगेवाडीसारख्या दुर्घटनांनंतरही जर तालुक्यात हातभट्टीचे अड्डे सुरूच असतील, तर प्रशासन आणखी किती मृतदेहांची वाट पाहत आहे? असा संतप्त प्रश्न उपस्थित होत आहे. चिरीमिरीसाठी लोकांच्या जीवाशी खेळ थांबवा नाहीतर जनतेचा उद्रेक अटळ आहे, असा इशाराही संतप्त नागरिकांकडून दिला जात आहे. गावोगावी उकळणाऱ्या या संतापाची वाफ आता थेट प्रशासनाच्या दारात पोहोचू लागली आहे. आता पाहायचे एवढेच कारवाई खऱ्या आरोपींवर होणार, की पुन्हा फक्त कागदावरच धडाकेबाज मोहीम राबवली जाणार?

## खळदकर यांच्याकडून सेवा संस्थांचा उत्कृष्ट कारभार : नागवडे



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** दत्तात्रय खळदकर यांनी सेवा संस्थेचे सचिव म्हणून काम पाहत असताना शेतकरी व सभासद हित डोळ्यासमोर ठेवून उत्कृष्ट कारभार पाहिला असे गौरवोद्गार नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे यांनी व्यक्त केले.

लिंपणगाव, जंगलेवाडी व ज्योतिर्लिंग या सेवा संस्थेचे सचिव दत्तात्रय खळदकर हे संस्थेच्या प्रदीर्घ सेवेतून सेवानिवृत्त झाले. सेवा संस्थेच्यावतीने कार्यालयात गौरव समारंभ आयोजित केला होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे होते. व्यासपीठावर ज्योतिर्लिंग संस्थेचे चेअरमन झुंबरराव रोडे, माजी संचालक अंजली रोडे उपस्थित होते.

यावेळी नागवडे म्हणाले खळदकर यांनी सेवा संस्थेत सचिव म्हणून काम पाहताना स्व. बापूंच्या विचारधारेतून व स्व. गणपतराव जंगले यांच्या मार्गदर्शनाखाली सचिव म्हणून सेवेत रुजू झाले. सेवानिवृत्त सचिव तरटे भाऊसाहेब यांच्याकडून खळदकरांना काम करण्याची प्रेरणा मिळाली. सहकार महर्षी बापूंनी त्यांना तालुक्यातील सेवा संस्थेचा कार्यकारी अधिकारी म्हणून काम करण्याची संधी दिली. याप्रसंगी नागवडे कारखान्याचे संचालक सुभाषराव शिंदे, विठ्ठलराव जंगले, सुनील सूर्यवंशी, अनिल घनवट, ॲड. अशोक रोडे, निळकंठ जंगले, काका रोडे, गुंड यांनी मनोगत व्यक्त केले.

बेलवंडी व्यापारी पतसंस्थेची सामाजिक बांधिलकी

## अपघात विमा दाव्यापोटी १.२० लाखांचे धनादेश वाटप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बेलवंडी :** सभासद, कर्जदार आणि ठेवीदारांच्या हिताला प्राधान्य देत बेलवंडी व्यापारी पतसंस्थेने सामाजिक बांधिलकी जपत अपघात विमा योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना आर्थिक मदतीचे धनादेश वितरित केले. संस्थेच्या वतीने ओरिएंटल कंपनीमार्फत उतरविण्यात आलेल्या अपघाती विमा योजनेतून दिवंगत ठेवीदाराच्या वारसास १ लाख रुपये तर अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीस २० हजार रुपयांचा वैद्यकीय खर्चाचा धनादेश देण्यात आला.



काही दिवसांपूर्वी संस्थेचे ठेवीदार राजाराम प्रभू खेडकर यांचा दुर्दैवी अपघातात मृत्यू झाला. त्यांच्या निधनामुळे कुटुंबावर आलेल्या आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर पतसंस्थेने विमा योजनेअंतर्गत त्यांचे वारसदार यमुना राजाराम खेडकर यांना १ लाखाचा धनादेश दिला. अपघातात गंभीर दुखापत झालेल्या राम गोपाळ घोडेकर यांना उपचारासाठी २० हजाराचा धनादेश देण्यात आला. संस्थेचे चेअरमन उत्तम डाके व सोपान हिरवे यांच्या हस्ते लाभार्थ्यांना धनादेशांचे वितरण केले. यावेळी संचालक अर्जुन हिवरकर, बादल पितळे, प्रमोद क्षीरसागर, लाला हिरवे, राजू साळवे, मनसुख शेलार, अमोल घोडेकर, बाळू साबळे, कैलास खेडकर, किसन वऱ्हाडे उपस्थित होते.

## रयतच्या उत्तर विभागीय अध्यक्षपदी निवडीबद्दल आ. पवार यांचा सत्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** कर्जत-जामखेड यासह परिसरातील रयत संकुलाच्या प्रलंबित प्रश्नांसाठी काम केले म्हणूनच रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागीय अध्यक्षपदी निवड झाली याचा आनंद आहे. आगामी काळात नक्कीच मिळालेल्या या संधीचे सोने करीत पालकांच्या मनातील स्वप्न मुलांच्या माध्यमातून पूर्ण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न



राहील. मनात व्हिजन ठेवत काम केल्यास शैक्षणिक क्षेत्रात आमूलाग्र बदल करण्याचा मानस आहे. यासाठी आपल्या शुभेच्छा आणि पाठबळाची नितांत आवश्यकता आहे असे प्रतिपादन आ. रोहित पवार यांनी केले. दादा पाटील महाविद्यालय व कर्जतकरांच्यावतीने नागरी सत्कार समारंभ आयोजित केला होता.

आ. रोहित पवार यांची रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागीय अध्यक्षपदी निवड झाली. यावेळी शैक्षणिक, राजकीय, सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार उपस्थित होते. प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. संजय नगरकर म्हणाले, आ. पवार यांची रयतच्या उत्तर विभाग अध्यक्ष म्हणून झालेली निवड कर्जतकरांसाठी अभिमानास्पद आहे.

# भगवानगडासाठी ढाकणे परिवाराकडून ५१ लाखांची देणगी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** तालुक्यातील अकोले येथे अधिक मासानिमित्त आयोजित राष्ट्रसंत भगवान बाबा यांनी प्रारंभ केलेल्या २२ व्या भव्य अखंड हरीनाम सप्ताहाची शुक्रवारी भक्तिमय वातावरणात काल्याचे किर्तनाने सांगता झाली. सप्ताहाच्या अंतिम दिवशी ह.भ.प. डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांच्या रसाळ वाणीतून झालेल्या कीर्तनाने उपस्थित हजारो भाविक मंत्रमुग्ध झाले. सप्ताहभर भागवत कथा, कीर्तन आणि विविध धार्मिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात नाहुन निघाला. या कार्यक्रमात भगवानगडासाठी स्व. बबनराव ढाकणे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रतापराव ढाकणे यांनी ५१ लाख रुपयांची देणगी जाहीर केली.

या सप्ताहात ह.भ.प. प्रकाश महाराज साठे यांच्या अमृतमय वाणीतून श्रीमद्भागवत कथा पार पडली. तसेच ह.भ.प. कृष्णा महाराज भगवानगड, विलास महाराज गजगे, सोपान महाराज शास्त्री, ज्ञानेश्वर महाराज जळकेकर, निवृत्ती महाराज



इंदुरीकर, तुकाराम महाराज मुंडे आणि जगन्नाथ महाराज यांच्या हरिकीर्तनांनी वातावरण अधिकच भक्तिमय झाले.

सप्ताहाच्या सांगता सोहळ्यात बोलताना डॉ. नामदेव शास्त्री म्हणाले की, मुलावर विश्वास ठेवा, जगन्नाथ महाराज अत्यंत उत्तम नियोजन करत आहेत. नवीन महाराजही चांगले कार्य करत असून दसऱ्यानंतर कृष्णा महाराज भगवानगडाचा कारभार सांभाळणार आहेत. खर्डा ते बुलढाणा परिसरापर्यंत भगवानगडाचे कार्य अधिक व्यापक आणि प्रभावी स्वरूपात उभे राहणार आहे. इतिहासातील आठवणींना उजाळा देत त्यांनी. भगवानगड येथे साजरा झालेला शताब्दी महोत्सव हा राज्यभरातील भक्तांसाठी ऐतिहासिक पर्व ठरल्याचेही त्यांनी नमूद केले. भविष्यात भगवानगडाच्या माध्यमातून गावोगावी ज्ञानेश्वर पारायण, ज्ञानदान, अन्नदान आणि विविध धार्मिक-सामाजिक उपक्रम प्राधान्याने राबविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. लाखो रुपयांची विकासकामे आणि समाजोपयोगी उपक्रम राबवून भगवानगडाचे कार्य अधिक व्यापक करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. सप्ताहाचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल जगन्नाथ महाराज यांचे विशेष कौतुक करण्यात आले. पंढरपूर ते थेट लंडनपर्यंत विठ्ठल भक्तीचा संदेश पोहोचविणारे चिंचपूर इजदे येथील अशोक खेडकर यांचाही यावेळी गौरव करण्यात आला.

संत भगवान बाबांच्या पुण्यतिथी उत्सवाची विदेशातही नव्याने सुरुवात करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

यावेळी केदारेश्वरचे माजी अध्यक्ष प्रतापराव ढाकणे यांनी भगवानगडासाठी स्व. बबनराव ढाकणे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ५१ लाख रुपयांची देणगी देण्यात येणार असल्याचे जाहीर केले. ढाकणे परिवार आणि भगवानगड हे एक वेगळेच नाते आहे, असे भावनिक उद्गार त्यांनी व्यक्त केले. त्यांच्या या घोषणेनंतर उपस्थित भाविकांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले. कार्यक्रमास कृष्णा महाराज भगवानगडकर, जगन्नाथ महाराज यांच्यासह पंचक्रोशीतील हजारो भाविक, महिला वर्ग, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कीर्तनानंतर चौथे मठाधिपती कृष्णा महाराज भगवानगड यांच्या हस्ते दहीहंडी फोडण्यात आली. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. भगवान बाबा की जयच्या जयघोषात आणि हरिनामाच्या अखंड गजरात या भव्य अखंड हरीनाम सप्ताहाची भक्तिमय वातावरणात उत्साहपूर्ण सांगता झाली.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

रविवार दि.३१ मे २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८



राजमाता अहिल्यादेवी होळकर
यांच्या ३०१ वी जयंती निमित्त हार्दिक
शुभेच्छा...
* शुभेच्छुक *
श्री किसन बापूराव कोल्हटकर
सेक्रेटरी - सहकार महर्षी शिवाजीराव नारायणराव
नागवडे सहकारी साखर कारखाना
सांस्कृतिक व क्रीडा मंडळ श्रीगोंदा फॅक्टरी, तालुका
श्रीगोंदा, जिल्हा अहिल्यानगर




# संस्था मोठी होणे हे संस्थापकांच्या कष्टाचे व त्यागाचे चीज : आ. काळे

## मान्यवरांच्या उपस्थितीत सोनेवाडी सोसायटीचा नामकरण सोहळा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : कोणतीही सहकारी संस्था स्थापन करणे अतिशय अवघड असून त्यापेक्षा संस्था स्थापन केल्यानंतर ती संस्था योग्य पद्धतीने चालविणे तर त्याहीपेक्षा अवघड आहे.त्यामुळे संस्था कोणतीही असो ती फक्त इमारतीने मोठी होत नाही, तर त्या संस्थेमागे उभे असलेले कार्यकर्ते, त्यागी माणसांच्या कष्टातून ती संस्था मोठी होते व त्या संस्थेचा फायदा सर्वसामान्य नागरीकांना होतो. त्यावेळी ज्या उद्देशातून संस्था स्थापन करण्यात आली,त्यासाठी ज्यांनी कष्ट सोसले, त्याग केला त्या संस्थापकांच्या कष्टाचे आणि त्यागाचे खऱ्या अर्थाने चीज होते असे प्रतिपादन आमदार आशुतोष काळे यांनी केले आहे.




कोपरगाव तालुक्यातील सोनेवाडी येथे कै. अर्जुनराव पंढरीनाथ पा.माळशिकारे विविध कार्यकारी सेवा सोसायटीचा नामकरण सोहळा माजी आमदार अशोकरावजी काळे यांच्या अध्यक्षतेखाली व आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते पार पडला याप्रसंगी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, सहकारी संस्थांचा आदर्श कारभार कसा करायचा याचा वस्तुपाठ कर्मवीर शंकररावजी काळे साहेबांनी आपल्याला घालून दिला असून रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी राज्यात मोठे काम केले आहे.

त्याप्रमाणे ज्येष्ठ कार्यकर्ते काकासाहेब जावळे यांनी देखील सोनेवाडीमध्ये शाळा सुरु करून त्या शाळेला कर्मवीर शंकररावजी काळे साहेबांचे नाव दिले. त्यामुळे त्यांनी सोनेवाडी व परिसराला कधीही कर्मवीर शंकररावजी काळे समाजकारणाचा विसर पडू दिला नाही व काळे परिवार देखील काकासाहेब जावळे यांना कधीही विसरणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी सहकारी संस्था सहाय्यक निबंधक संदीपकुमार रुद्राक्ष, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रविण शिंदे, माजी उपाध्यक्ष विश्वासराव आहेर, बाळासाहेब कदम, कारभारी आगवन, नारायणराव मांजरे, ज्ञानदेव मांजरे, राजेंद्र गिरमे, बाळासाहेब बारहाते, भास्करराव चांदगुडे, सुनिल शिंदे, अरुण चंद्रे, कारखान्याचे संचालक सुधाकर रोहोम, सूर्यभान कोळपे, डॉ.मच्छिन्द्र बर्डे, दिलीपराव बोरनारे, शंकरराव चव्हाण, राहुल रोहमारे, गंगाधर औताडे, पद्मविभुषण डॉ. शरदचंद्रजी पवार पतसंस्थेचे चेअरमन देवेन रोहमारे, संचालक रावसाहेब चौधरी, गौतम बँकेचे व्हा.चेअरमन विजयराव रक्ताटे, संचालक बाबुराव थोरात, भाऊसाहेब गावडे (बारामती), कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीचे संचालक किसनराव पाडेकर, रामनाथ आव्हाड, गंगाधर खोमणे, तुकाराम गुडघे, बाळासाहेब जपे, बाबासाहेब फटांगरे, शिवाजीराव जावळे, व्यंकटराव राऊत, सोपानराव गुडघे, सोसायटीचे चेअरमन यमाजी जावळे, व्हा.चेअरमन प्रविण जायपात्रे, सचिव विठ्ठलराव जावळे, संचालक भाऊसाहेब माळशिकारे आदींसह संस्थेचे संचालक, पंचक्रोशितील सरपंच, उपसरपंच, विविध क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ आदी उपस्थित होते.

> जिरायती भागातील गावांना पाणी आणण्यासाठी मला पाटकऱ्यासारखे उन्हातान्हात फिरावे लागले हे आपणा सर्वांना माहिती आहे. त्याची फलश्रुती म्हणून कडक उन्हाळ्यात देखील एकाही गावाची पाण्याच्या टँकरची मागणी नाही. परंतु काहींना पाणी कोणत्या पॉइंट मधून सोडायचे हे माहिती नाही. कोणत्या बंधाऱ्यातून कोणत्या बंधाऱ्यात पाणी जाते याची पूर्ण माहिती नाही तरी देखील श्रेय घेण्यासाठी काहींनी निवेदन स्वीकारून आम्हीच बंधारे भरून दिले असल्याचे लोकांना भासवत आहे. तेच उद्या आम्हीच सह्यांचे निवेदन दिल्यामुळे एमआयडीसी आली असे म्हणायला मागे पुढे पाहणार नाही.
> **आ. आशुतोष काळे**

# शुल्लक कारणावरून शिरसगावात एकास मारहाण

## चौघांविरुद्ध ॲट्रॉसिटीसह गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासे** : शुल्लक कारणावरून एका शेतकऱ्यास शिवीगाळ, दमदाटी करीत जातीवाचक अपशब्द वापरून बेदम मारहाण केल्याची घटना शनिवारी सकाळी शिरसगाव (ता. नेवासे) येथे घडली. याप्रकरणी नेवासे पोलिसांनी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत सुनिल योहान वाघमारे (वय ५९, रा. शिरसगाव, ता. नेवासे) यांनी नेवासे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, शनिवारी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास वाघमारे हे गावातील वेल्डिंग दुकानासमोर लक्ष्मण लंघे यांच्याशी बोलत उभे होते. त्यावेळी बाळासाहेब भिकाजी गाडेकर व शिवाजी भिकाजी गाडेकर यांनी तेथे येऊन तुमचा भाचा अमोल मोरे रस्त्याच्या कडेला चिपाटे का टाकतो? असा जाब विचारला.



यावेळी वाघमारे हे समजावून सांगत असताना आरोपींनी हातोडा व लाकडी दांडा घेऊन त्यांच्या अंगावर धाव घेतल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. उपस्थित नागरिकांनी मध्यस्थी करून वाद शांत केला. त्यानंतर वाघमारे हे घरी जात असताना त्यांच्या घराजवळ बाळासाहेब गाडेकर, शिवाजी गाडेकर, सुरज शिवाजी गाडेकर व ऋषभ बाळासाहेब गाडेकर यांनी त्यांना अडविल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. आरोपींनी जातीवाचक शिवीगाळ करून जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या तसेच खाली पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, अमोल राम मोरे, सचिन दत्तात्रय देशमुख तसेच परिसरातील नागरिकांनी हस्तक्षेप करून वाघमारे यांची सुटका केली. या प्रकरणी वाघमारे यांनी दिलेल्या तक्रारीवरून नेवासे पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध मारहाण, धमकी तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# राजमाता जिजाऊ पतसंस्थेच्या संचालकाच्या मालमत्ता जप्त करण्याची प्रक्रिया सुरु

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यातील राजमाता जिजाऊ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादितच्या बहुचर्चित ठेवी घोटाळ्यात महाराष्ट्र शासनाने मोठी कारवाई करत संस्थेच्या व संचालकांच्या मालमत्ता जप्त करण्याचे आदेश जारी केले आहेत. महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंध संरक्षण अधिनियम १९९९ (एमपीआयडी) अंतर्गत ही कारवाई करण्यात आली असून, ठेवीदारांना दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ११५५/२०२२ दाखल करण्यात आला आहे. भारतीय दंड संहितेच्या कलम ४०९,४२०,४६५,४७७-अ ,३४ तसेच चझखऊ कायद्याच्या कलम ३ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून, मुदतपूर्तीनंतर ठेवीदारांना ठेवी व परतावा न दिल्याचा गंभीर आरोप संस्थेवर ठेवण्यात आला आहे. दरम्यान, पतसंस्थेच्या स्थापनेपासून म्हणजे सन २००३ पासून संस्थेतील विविध आर्थिक गैरव्यवहार आणि भ्रष्टाचाराचे ठोस पुरावे ठेवीदारांनी जिल्हा न्यायालयात सादर केल्याची माहिती समोर आली आहे. या पुराव्यांमध्ये संस्थेच्या इतर संचालकांच्या कथित भ्रष्टाचाराचीही माहिती समाविष्ट असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे आगामी फौजदारी खटल्यात उर्वरित सर्व संचालकांनाही आरोपी करण्यात येण्याची शक्यता व्यक्त होत आहे. शासनाने जप्त केलेल्या मालमत्तांमध्ये राहुरी तालुक्यातील तसेच राहाता तालुक्यातील शेतजमिनी आणि सदनिकांचा समावेश आहे. मौजे टाकळीमिया येथील कारभारी बापुसाहेब फाटक यांच्या नावे असलेली शेतजमीन, राहुरी बुद्रुक येथील भाऊसाहेब तुकाराम येवले व सुरेश मंजू पवार यांच्या दोन शेतजमिनी, तसेच दत्तात्रय विठ्ठल बोंबले यांच्या नावावरील सदनिका जप्त करण्यात आली आहे. याशिवाय राहाता तालुक्यातील अस्तगाव येथील शरद लक्ष्मण निमसे यांच्या दोन शेतजमिनींवरही जप्ती आणण्यात आली आहे. तसेच कारभारी फाटक, भाऊसाहेब येवले, सुनिल भोंगळ, सुरेखा सांगळे, सुरेश पवार आणि दत्तात्रय बोंबले यांच्या नावावरील नगर अर्बन बँक आणि अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील एकूण ११ बँक खाती गोठविण्यात आली आहेत.

# ‘भिलट्या जास्त माजलास् का’

## जातीवाचक शिवीगाळ करून धमकी, गुन्हा दाखल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील टाकळीभान एका शेतकऱ्यांस अतिशय खालीपातळीवर जाऊन जातीवाचक शिवीगाळ करून तुला व तुझ्या घराच्यांना संपवून टाकू,जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली.याप्रकरणी बाळासाहेब गागुर्डे यांनी तालुका पोलिसांना (दि.२९) मे रोजी फिर्याद दाखल केली. शेतकरी गांगुर्डे हे टाकळीभान येथील रहिवाशी असून, कुटूंबासह पत्नी, प्रमिला,मुलगा राहुल,सून,नातवंडे कुटुंब एकत्र राहत आहे.शेती व्यवसाय करून कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो.शेती गट (नं.८४ )हे शेतजमीन क्षेत्र माझ्या मालकीचे नावावर आहेत.गावातील इसम नामे मधू हिरा रणनवरे, प्रविण सोमनाथ बनकर, यांना सदरचे बांधकाम करण्याचे काम दिले होते.

मात्र ते दोघे माझ्यावर गटात बेकायदेशीररित्या काम करण्याचा प्रयत्न करत असताना त्यांना विरोध केला.इसमांनी मला विविध प्रकारे त्रास देण्याचे काम चालू केले. त्यावेळेस त्यांच्याविरुद्ध श्रीरामपूर येथील दिवाणी न्यायालयात मनाई हुकुमाचा दावा केला. या दाव्यामध्ये न्यायालयाने बेकायदेशीर बांधकामास (दि.१७) ऑक्टोबर २०२२अन्वये मनाई हुकुम दिलेला असताना (दि.६) फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास घरी आले असता त्यावेळी प्रविण सोमनाथ बनकर, मधू हिरा रणनवरे, अमोल मधू रणनवरे व २ अनोळखी व्यक्ती घरी आले, माझ्या घरात घुसून मला भिलट्या तु जास्त माजलास का, तु जर, आमच्या बाधंकामाला विरोध केला तर, तुला व तुझ्या घरातील लोकांना संपवून टाकू. अशी जातीवाचक शिवीगाळ करून धमकी दिली. त्यावेळी मी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता त्यावेळी माझ्या घरातील भांड्याची व वस्तुची फेकफेकी करून सामानाचे नुकसान केले होते. त्यांनी त्याचा गैरफायदा घेऊन तेथे मंडळी जमवून जातीवाचक शिवीगाळ करून धक्काबुक्की करून जीवे मारण्याची धमकी दिली.

घटनेनतर तात्काळ तक्रार देण्यास पोलीस ठाण्यात आलो नाही.त्यानंतर मुख्यमंत्री आदिवासी मंत्री,अहिल्यानगर जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक व अप्पर पोलीस अधीक्षक व उपविभागीय पोलीस अधीक्षक या लोकांवर कायदेशीर कारवाईकामी अर्ज दाखल करून श्रीरामपूर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. बाळासाहेब राधाजी गांगुर्डे यांच्या फिर्यादीवरून प्रविण सोमनाथ बनकर ( वय ३६ ) मधू हिरा रणनवरे (वय ५१ ) अमोल मधू रणनवरे ( वय ३०) व अन्य दोन अनोळखी (सर्व रा.टाकळीभान ) इसमाविरुद्ध तालुका पोलीस ठाण्यात भा.दं.वि बी.एन.एस,(२०२३) ३३३,१८९ (२), १८९ (३), १९१ (२), १९१ (३) १९०, २२३, ३२४ (४), ३२४ (५), ११५ (२) ३५२, ३५१( २),३५१ (३),या नुसार अनुसुचित जाती आणि अनुसुचित जमाती ३ (१)(ी ), अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९, ३ (१) (ी) गुन्हा दाखल करण्यात आला.अधिक तपास उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर हे करीत आहेत.

# श्रीरामपुरात गोवंशीय जनावरे व गोमांस पकडले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : येथील शहरात पोलिसांनी दोन ठिकाणी कारवाई करत कत्तलीसाठी आणलेली गोवंशीय जनावरे आणि गोमांस पावणे तीन लाखांचा मुद्देमाल जप्त केला. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी सम्राटनगर, सूतगिरणी परिसरात कारवाई करत त्या ठिकाणी पत्र्याच्या शेडमध्ये गोमांस विकले जात असताना छापा टाकत ५०० किलो गोमांस, किंमत १ लाख रूपये पकडले. तर, ५० हजार रू. किमतीच्या दोन गावरान गायी, १० रू. किं. चे एक वासरू तसेच २० हजारांची एक जर्शी गाय, लोखंडी सुरा असा १ लाख ८० हजार १०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करत फिरोज यासीम मन्सुरी, रमजान यासीम मन्सुरी,शाहरूख खलील कुरेशी ( रा.श्रीरामपूर ) यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे. मात्र, दुसऱ्या कारवाईत परिसरात पोलिसांनी ८० हजारांच्या चार जर्शी गायी आणि १० हजारांचे वासरू असे ९० हजारांचे गोवंशीय जनावरं पोलिसांनी ताब्यात घेवून नजीर शब्बीर सय्यद (रा.श्रीरामपूर ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. पुढील तपास शहर पोलीस करीत आहेत.

# धोंडा खायला न बोलावल्याने वकील पत्नीस मारहाण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : माहेरी एकटीच गेली, तसेच धोंडा खायला बोलावले नाही म्हणून वकील पत्नीला शिवीगाळ करत लाकडी दांड्याने मारहाण करण्यात आली.याप्रकरणी पतीसह तिघांविरुद्ध श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत व्यावसायाने वकील असलेल्या कावेरी अभिजित शिंगोटे (रा.जुने काळभैरव मंदिराजवळ, कसबापेठ, पुणे) यांनी फिर्याद दिली.या फिर्यादीनुसार, (दि.२५) मे रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास त्या माहेरी, श्रीरामपूर येथील पूर्णवाद पथ, मुळा-प्रवरा जवळ वॉर्ड क्र. ७ श्रीरामपूर येथे असताना पती अभिजित शिंगोटे यांनी मोबाईलवर संपर्क साधला. तू माहेरी एकटी का गेलीस, मला धोंडा खायला का बोलावले नाही, असा जाब विचारत त्यांनी शिवीगाळ केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

यानंतर पती अभिजित शिंगोटे, सासू मंदा शिंगोटे व भाया अतुल शिंगोटे हे माहेरी आले.त्यावेळी वाद वाढल्यानंतर अभिजित शिंगोटे यांनी घरासमोर पडलेला लाकडी दांडा उचलून फिर्यादीच्या उजव्या पायावर व डोक्यावर मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या मारहाणीत फिर्यादी जखमी झाल्याचे सांगण्यात आले.दरम्यान, वाद सोडविण्यासाठी फिर्यादीची आई व शेजारी धावून आले असता, अतुल शिंगोटे यांनी शिवीगाळ करत तू नांदायला येऊ नको, आलीस तर जिवंत सोडणार नाही,अशी धमकी दिल्याचाही आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

तसेच मुलगा व मुलीला जबरदस्तीने घेऊन गेल्याचेही तक्रारीत नमूद केले आहे.याप्रकरणी अभिजित शंकरराव शिंगोटे,मंदा शंकरराव शिंगोटे व अतुल शंकरराव शिंगोटे (सर्व रा. पाचेगाव, ता. नेवासा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

# श्रीरामपूरातून अल्पवयीन मुलगी पळवली

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : साडे सतरा वर्षे वयाच्या अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेण्याचा धक्कादायक प्रकार श्रीरामपूर तालुक्यातील कमालपूर येथे घडला. याबाबत सविस्तर माहिती अशी की,तालुक्यातील कमालपूर परिसरातील एका साडेसतरा वर्षे वयाची मुलगी रहिवाशी असून गेल्या दोन दिवसांपूर्वी मुलगी घरच्यांसोबत रात्री १० वा.जेवण करून झोपी गेली होती.पहाटे ४ वाजता आई व मुलगी हे लघुशंकेसाठी उठले आणि पुन्हा झोपी गेले. त्यानंतर आई सकाळी ६ वा. नेहमीप्रमाणे उठली असता, सदरचे मुलगी ही घरामध्ये दिसली नाही.तेव्हा तिचा घराच्या आसपास शोध घेतला मात्र ती आढळून आली नाही. त्यामुळे कोणीतरी या मुलीच्या अज्ञानाचा काहीतरी फायदा घेऊन तिला कशाचे तरी आमिष दाखवून तिला पळवून नेल्याची तक्रार मुलीच्या आईने पोलिसात दिली.याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# बेलापूर ग्रामसभेत ड्रोन आणि चोरट्यांच्या अफवांचा मुद्दा गाजला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : बेलापूर व परिसरात होत असलेल्या चोरांच्या उठणाऱ्या अफवा तसेच आकाशात फिरणारे ड्रोन यामुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले असून पोलिसांनी याबाबत योग्य ते खूलासा करून नागरिकांना दिलासा द्यावा,अन्यथा बेलापूर चौकात रस्तारोको आंदोलन करण्यात येईल,असा इशारा बाजार समितीचे माजी उपसभापती अभिषेक खंडागळे यांनी बेलापूरगावच्या ग्रामसभेत दिला.




तालुक्यातील बेलापूर येथे महाराष्ट्र दिनानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रांगणात प्रशासक मीना साळवी यांच्या अध्यक्षतेखालील आयोजित ग्रामसभेत बोलताना अभिषेक खंडागळे ते पुढे म्हणाले की, सध्या गाव व परिसरात वाड्या वस्त्यांवर भितीचे वातावरण आहे. सायंकाळीच चार -चार ड्रोन आकाशात घिरट्या घालतात हे नेमके कशाची टेहाळणी करतात, यांचा खूलासा होणे आवश्यक आहे.त्याचबरोबर पोलिसांचा वचक राहिलेला नाहीत असं सध्यातरी दिसतं, परंतू काही लोक आम्हीच पोलीस स्टेशन चालवितो, अशा आविर्भावात वावरत असतात, पोलीस चौकीत येवून दोन गट मारामारी करतात, हत्यार दाखवतात पण काहीच कारवाई होत नाही.

आज अवैध व्यवसाय करणाऱ्या व्यतीरिक्त पोलीस स्टेशनला कुणीही जात नाही.गावातील पुढारी ही पोलीस स्टेशनला कधीच हस्तक्षेप करत नाहीत. त्यामुळे अवैध व्यवसाय करणाऱ्या वाटते, आम्हीच चौकी चालवितो.सध्या गावचे गावपण हरवत चालले असल्याची खंत भाजपाचे प्रफुल्ल डावरे, विक्रम नाईक व देविदास देसाई यांनी व्यक्त केली.याप्रारंभी ग्रामपंचायत अधिकारी निलेश लहारे यांनी ग्रामसभेच्या विषय पत्रिकेचे वाचन केले.विषय पत्रिकेवरील सर्व विषय सविस्तर चर्चा करून मंजूर करण्यात आले.यावेळी संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष शरद नवले म्हणाले की, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील पटसंख्या कमी होणे ही धोक्याची घंटा आहे. जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये सर्वसामान्य गोरगरीब नागरिकांची मुले शिकतात.या शाळा बंद झाल्यास सर्वसामान्य नागरिकांची अडचण होणार आहेत. या शाळा चालू राहणे गरजेचे आहे.त्यामुळे गावातील सर्वांनी जिल्हा परिषद शाळेतील पटसंख्या कशी वाढेल व त्या विद्यार्थ्यांना सुख सुविधा कशा मिळतील यासाठी सामूहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. पालकांनी आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये न घालता मराठी शाळेत पाठवावे.गावातील सत्यमेव जयते सुप्रभात ग्रुपने भर उन्हाळ्यामध्ये बेलापूर श्रीरामपूर रोडवरील झाडांना टँकरद्वारे पाणी देऊन ती झाडे जगवली याबद्दल सत्यमेव जयते ग्रुपचे व त्यांना मदत करणारे सर्व दानशूर व्यक्तींचे नवले यांनी आभार मानले.

महाराष्ट्र राज्य शिक्षक-शिक्षकेत्तर सेनेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी शशिकांत थोरात यांची निवड झाल्याबद्दल तसेच आशासेविका म्हणून उत्कृष्ट काम करून सेवानिवृत्त झालेल्या श्रीमती कल्पना दरेकर यांचाही ग्रामसभेत सत्कार करण्यात आला. ग्रामसभेत विष्णुपंत डावरे,संजय भोंडगे,अँड. अजिंक्य साळुंके,सचिन अमोलिक,मयुर खरात,विक्रम नाईक यांनी विविध सुचना केल्या.यावेळी उपसरपंच चंद्रकांत नवले, माजी उपसरपंच मुस्ताक शेख,सदस्य रमेश अमोलिक,तंटामुक्ती अध्यक्ष बाळासाहेब दाणी,पोलीस पाटील जालिंदर कुऱ्हे, भाऊसाहेब कुताळ,हाजी इस्माईल शेख,रावसाहेब अमोलिक,भैय्या शेख,तस्वार बागवान, बाबुराव पवार,सचिन वाघ,शहानवाज सय्यद,भाऊसाहेब तेलोरे, विशाल आंबेकर, दादासाहेब कुताळ,महेश कुऱ्हे,गोपी दाणी,पोपट पवार,बाळासाहेब शेलार,राहुल माळवदे,रफिक शहा,आदित्य जाधव, आदित्य कर्डीले,तुषार कुऱ्हे, सौरभ कापसे यांच्यासह बेलापूर पोलीस स्टेशनचे अधिकारी कर्मचारी व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.